रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक १३१ । पृष्ठे १० ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल
रायगड, शनिवार, दि. १८ ऑक्टोबर २०२५
किंमत ४ ₹

दिवाळी आली सोनपावली,
उधळण झाली सौख्याची,
धनधान्यांच्या भरल्या राशी,
घरी नांदू दे सुख समृद्धी..
धनत्रयोदशीच्या शुभेच्छा!

## मुरुडमध्ये अल्पवयीन मुलीची आत्महत्या

**मुरुड :** तालुक्यातील खारमजगाव येथील एका अल्पवयीन मुलीने विवाहित पुरुषाच्या धमक्या आणि मानसिक छळाला कंटाळून गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी घडली. या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ माजली असून, पालकवर्गातून संताप व्यक्त करण्यात येत आहे. आरोपीने सतत तिला फोन करुन ङ्गमाझ्याशी बोलली नाहीस तर तुझी बदनामी करीन, कॉलेजमध्ये सांगेन, तुला जगू देणार •›पान २ वर

# रिझर्व्ह बँकेने जमा केलेले पैसे परत मिळणार

## विशेष मोहिमेतून ठेवी पुन्हा देण्यासाठी बँकाचा प्रयत्न

**प्रमोद जाधव**
। रायगड ।

दहा वर्षांपासून बँकेशी कोणताही आर्थिक व्यवहार केला नाही. त्यामुळे या ठेवी रिझर्व्ह बँकेन जमा केल्या होत्या. परंतु, आता बँकेतील ही रक्कम परत मिळण्याची संधी उपलब्ध झाली आहे. त्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत रायगड जिल्हा अग्रणी बँक, बँक ऑफ इंडिया यांच्या पुढाकाराने आणि सर्व सदस्य बँकांच्या सहकार्याने बँकानी विशेष जनजागृती मोहीम हाती घेतली असल्याची माहिती जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक विजयकुमार कुलकर्णी यांनी दिली. रायगड जिल्ह्यातील चार लाख ७५ हजार १२७ खातेदारांना दावा न केलेल्या १५७ कोटी रुपयांच्या ठेवी परत मिळणार आहेत.

पूर्वी खात्यामध्ये किती रक्कम आहे, याची माहिती घेण्यासाठी बँकेत जावे लागत होते. काही वेळा बँकेत फोन करून माहिती विचारावे लागत होते. रायगड जिल्ह्यात बँकाचे जाळे प्रचंड वाढले आहे. शहरी भागापासून ग्रामीण भागात वेगवेगळ्या संस्था, बँकांच्या शाखा कार्यान्वित झाल्या आहेत. त्यामुळे खेड्यापाड्यात राहणाऱ्या नागरिकांना बँकेत खाते उघडण्यासाठी तालुका, जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागत नाही. बँकेचा कारभार ऑनलाईन झाल्याने घरबसल्या आर्थिक व्यवहार करण्याची व्यवस्थादेखील बँकांमार्फत करण्यात आली आहे. आपल्या खात्यामध्ये किती रक्कम शिल्लक आहे, किती रक्कम •›पान २ वर

### देशात एक लाख २५ हजार कोटींच्या ठेवी

देशभरात सुमारे एक लाख ३५ हजार कोटी रुपयांच्या दावा न केलेल्या ठेवी विविध बँकांमध्ये शिल्लक आहेत. त्यापैकी महाराष्ट्र राज्यात ५८६६ कोटी रुपये, ज्यात वैयक्तिक खात्यांच्या ४६१२ कोटी, संस्थांच्या १०८२ कोटी, आणि सरकारी योजनांतील १७२ कोटी रुपयांच्या ठेवी समाविष्ट असल्याची माहिती समोर येत आहे.

### आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नियमानुसार, १० वर्षांपासून निष्क्रिय असलेल्या खात्यांतील ठेवी ठेवीदार शिक्षण आणि जागरूकता निधी मध्ये हस्तांतरित केल्या जातात. तथापि, खातेदारांना आपले पैसे परत मिळवण्याचा पूर्ण हक्क आहे. ठेवी परत मिळविण्यासाठी संबंधित खातेदारांनी आपल्या बँकेत संपर्क साधून आवश्यक कागदपत्रे व अद्ययावत सादर करणे आवश्यक आहे.




**जिल्ह्यातील प्रमुख बँकांवर दृष्टीक्षेप**

| बँकेचे नाव | ग्राहक संख्या | रक्कम (कोटीमध्ये) |
|---|---|---|
| बँक ऑफ इंडिया | १,७४,८८३ | ४५.२६ |
| बँक ऑफ महाराष्ट्र | २५०४ | ८.६८ |
| कॅनरा बँक | २६,९३९ | ६.७४ |
| एसबीआय | ७९,३११ | ३५ |
| युनियन बँक | ५,१४२ | ११७९ |
| आयसीआयसीआय बँक | ६,३१८ | २.२७ |
| एम.एस.को. बँक्स | १,०२,१८३ | ३०.५८ |

## वेधक

### ‘हक्कावर गदा येत असेल, तर टक्कर द्या’

**बीड :** आपल्या हक्कावर गदा येत असेल तर टक्कर देणं गरजेचं आहे, अशा शब्दांत छगन भुजबळ यांनी यांनी घणाघात केला. गेल्या काही महिन्यांपासून राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. या पार्श्वभूमीवरच शुक्रवारी बीड जिल्ह्यात ओबीसींचा मेळावा पार पडला. या मेळाव्याला ओबीसी नेते छगन भुजबळ, धनंजय मुंडे, लक्ष्मण हाके, गोपीचंद पडळकर यांच्यासह आदी नेते उपस्थित होते. यावेळी छगन भुजबळ यांनी सूचक इशारा दिला. त्यांच्याकडे एकच समाज आहे. पण, आपल्याकडे ३७४ जाती आणि समाज आहेत. यांची नावं घेतली तरी अर्धा तास जाईल आणि यांना जर बोलायला वेळ दिला तर येथेच रात्र होईल, असे भुजबळ म्हणाले.

### भारतीय बनावटीचे तेजस देशसेवेत

**नवी दिल्ली :** संपूर्ण भारतीय बनावटीचे अत्याधुनिक लढाऊ तेजस लढाई विमान शुक्रवारी देशसेवेत दाखल झाले. केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते या विमानाचे उद्घाटन करण्यात आले. सर्वात हलके लढाऊ विमान, ताशी २००० किलोमीटर वेग आणि हवेतच इंधन भरण्याची क्षमता असलेले हे विमान आहे. भारतीय हवाई दलासाठी आजचा दिवस गौरवाचा आहे, असे राजनाथ सिंह म्हणाले. ध्वनीच्या वेगाच्या १.६ पट म्हणजेच सुमारे २,००० किमी प्रतितास वेगाने उड्डाण करण्यास सक्षम असून, ५०,००० फूट उंचीपर्यंत सहज उड्डाणाची क्षमता असल्याचे सिंह यांनी सांगितले.

### बेस्ट कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस

**मुंबई :** बेस्टच्या कर्मचाऱ्यांना शुक्रवारी दिवाळी बोनसची गुड न्यूज मिळाली. बेस्ट उपक्रमातील कर्मचाऱ्यांना बोनस देण्याबाबत प्रशासनाची चालढकल सुरू होती. त्याविरोधात शिवसेनेने गुरुवारी वडाळ्यात तीव्र निदर्शने केली. शिवसेनेच्या त्या दणक्यानंतर बेस्ट कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड झाली आहे. बेस्ट कामगार सेनेच्या आंदोलनाची दखल घेत बेस्ट कर्मचाऱ्यांना बोनसचे वाटप करण्यात आले आहे. कर्मचाऱ्यांच्या खात्यात ३१००० रुपये बोनस म्हणून जमा करण्यात आले आहेत. बेस्ट कामगार सेनेचे अध्यक्ष, शिवसेना उपनेते आमदार सचिन अहिर यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी वडाळा आगाराबाहेर आंदोलन करण्यात आले होते. त्यानंतर प्रशासनाने कार्यवाहीला गती दिली.

## अलिबाग बनावट नोटा प्रकरण

# भूषण पतंगेचा पोलिसांकडून गेम?

- मारहाणीमुळेच मृत्यू झाल्याचा होतोय आरोप
- अधीक्षक काय भूमिका घेणार याकडे लक्ष

। अलिबाग । प्रतिनिधी ।



तालुक्यात लाखो रुपयांच्या बनावट नोटाप्रकरणी अलिबाग पोलिसांनी अटक केलेल्या ३५ वर्षीय आरोपी भूषण पतंगेचा मुंबईतील जे.जे. रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. पोलीस कोठडीत असताना पोलिसांनी बेदम मारहाण केल्यामुळेच आरोपीचा मृत्यू झाल्याचा आरोप कुटुंबियांनी केला आहे. परंतु, पोलिसांनी हा आरोप खोडून काढला असून, आरोपीला फीट येण्याचा गंभीर आजार होता, त्यावर उपचार सुरू असल्याचे म्हटले आहे. परंतु, बनावट नोटा प्रकरणातील मुख्य सूत्रधाराला वाचविण्यासाठी पोलिसांनी पतंगेचा गेम केल्याची चर्चा जोरात सुरू आहे. दरम्यान, या प्रकरणातील बनावट नोटा तपासिक अधिकाऱ्याच्या लेकीकडून समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्याने जप्त मालाच्या संवेदनशीलतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, अलिबाग शहरातील भूषण पतंगेच्या घरातून पाचशे रुपयांच्या बनावट नोटांचा लाखो रुपयांचा साठा अलिबाग पोलिसांनी जप्त केला होता. ही कारवाई शुक्रवार, दि. ३ ऑक्टोबरदरम्यान अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर साळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पतंगेला न्यायालयात हजर केले असता, चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. दरम्यानच्या काळात त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली होती. परंतु, त्याला फीट येण्याचा गंभीर आजार असून, सीटीस्कॅन करण्यासाठी मुंबईतील जे.जे. रुग्णालयात हलविण्यात आले होते, तेथे त्याला व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते, असे पोलिसांनी सांगितले. जिल्हा रुग्णालयात सीटीस्कॅन होत नसल्याचे कारण पुढे केल्याने पुन्हा एकदा आरोग्य यंत्रणेचे धिंडवडे निघाले आहेत.

दरम्यान, भूषण पतंगेच्या नातेवाईकांनी त्याला चौकशीदरम्यान पोलिसांनी बेदम मारहाण केल्यामुळेच तो दगावल्याचा आरोप केला. भूषणच्या नातेवाईकांनी या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक किशोर साळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दिपक मोरे यांच्याकडे होता. तर, चौकशीदरम्यान आरोपी भूषण पतंगेची तब्येत बिघडल्याने त्याला जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, •›पान २ वर

> “भूषण पतंगेला याआधी २०१९ मध्ये श्रीवर्धन येथील दरोडा प्रकरणात अटक करण्यात आली होती. त्यावेळी त्याला वैद्यकीय तपासणीत फीटचा आजार असल्याचे निदर्शनास आल्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले होते. त्यामुळे आजाराची पार्श्वभूमी आधीपासूनच आहे. यावेळीसुद्धा चौकशीदरम्यान त्याची तब्येत बिघडल्याने त्याला आधी जिल्हा रुग्णालयात आणि त्यानंतर मुंबईतील जे.जे. रुग्णालयात उपचार करण्यात येत होते. परंतु, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला आहे.
> – किशोर साळे, पोलीस निरीक्षक, अलिबाग पोलीस ठाणे”

### आरोपीला बेदम मारहाण?

भूषण पतंगेला पोलिसांचा खबऱ्या ‘कादर’ याने पोलीस कोठडीत मारहाण केल्याची चर्चा पोलीस ठाण्याच्या परिसरात सुरू आहे. दरम्यान, पोलिसांकडूनही बेदम मारहाण केल्याचा आरोप त्याच्या नातेवाईकांनी केला आहे. अटक करण्यात आल्यावर आरोपीची रुग्णालयात तपासणी होते. त्यावेळेस तो चांगला हिंडता-फिरता होता. परंतु, अचानक असे काय झाले? त्याचा असा कोणता आजार एकदम बळावला की त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार होऊ शकले नाहीत? त्याला तात्काळ मुंबईतील जे.जे. रुग्णालयात हलविण्यात आले. असे अनेक प्रश्न आ वासून उभे आहेत. मुख्य सूत्रधारापर्यंत पोहोचू नये, यासाठी पोलिसांचा हा सर्व खटाटोप नाही ना? असा प्रश्नही नागरिकांनी उपस्थित केला आहे.

### जप्त केलेल्या नोटा सोशल मीडियावर व्हायरल



या प्रकरणात जप्त केलेल्या नोटा तपासिक अधिकारी म्हणून काम पाहणारे दिपक मोरे यांच्या कायद्याचे ज्ञान असणाऱ्या लेकीकडून समाजमाध्यमात व्हायरल झाल्या आहेत. न्यायप्रविष्ठ प्रकरणात अशा पद्धतीने वागून आपले अज्ञान जगासमोर दाखवणाऱ्यांबद्दल आता उलटसुटल चर्चा सुरू आहे. पोलीस उपनिरीक्षक दिपक मोरे यांना जप्त केलेली संपत्ती खेळण्यातील असल्याचे वाटले का? आपल्या मुलीला त्या खेळायला तर दिल्या नाही ना, याची चर्चा सध्या जोरात सुरू आहे. कारण, त्याच बनावट नोटांसोबत काढलेले फोटो त्या मुलीने आपले फोटो समाजमाध्यांवर टाकले असून, ते चांगलेच व्हायरल झाले आहेत. कायद्याचे रक्षक समजणारे मोरे आणि कायद्याचे ज्ञान असणारी आपली मुलगी यांना याचे जरासुद्धा गांभीर्य कळू नये, याबाबत संताप व्यक्त करण्यात येत आहे. जप्त केलेला माल ही संवेदनशील बाब आहे. अशा प्रकारे त्याचे सार्वजनिक प्रदर्शन करणे, या अधिकाऱ्याला भोवणार असल्याची चर्चा आहे. दरम्यान, मुलीचे लाड पुरवणाऱ्या पोलीस पित्यावर कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून अल्पावधीत नाव कमावलेल्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल काय कारवाई करणार, याकडे रायगडवासियांचे लक्ष लागून राहिले आहे.

**कादर नेमका कोण? भूषणशी त्याचे नेमकं कनेक्शन काय? वाचा उद्याच्या अंकात**

## महाडमध्ये ग्राहकांच्या जीवाशी खेळ

। महाड । प्रतिनिधी ।

महाड शहरातील एस.जी. रोडवरील प्रसिद्ध असणाऱ्या सिद्धी स्वीट या दुकानातून १६ ऑक्टोबर रोजी एका इसमाने सामोसे खरेदी केली. मात्र, ही व्यक्ती सामोसे घरी नेऊन खात असता सामोसे खराब लागल्याचे आढळून आले. मात्र, लक्षात येण्यापूर्वी घरातील काहींनी सामोसे खाल्ले होते. खरेदीदार यांच्या पत्नी व आई यांनी सामोसे खाल्ल्याने त्यांना पोटदुखीसह जुलाबाचा त्रास झाला. ही गंभीर बाब लक्षात येताच घरातील सदस्य जुनेद तांबोळी यांनी दुकानात धाव घेऊन दुकानदाराच्या ही बाब लक्षात आणून दिली. मात्र, दुकानदाराने ही बाब गांभीर्याने न घेता, चुकून झाले असेल, अशी उलटसुलट उत्तरे दिली. त्याचप्रमाणे उलटपक्षी खरेदीदार यांना धमकी देण्यासाठी सहकारी मित्रमंडळींद्वारे भ्रमणध्वनी द्वारे संपर्क करत त्रास •›पान २ वर






**दुकानदाराकडून खराब मिठाई, समोसे विक्री**

## २० किलोचा जिताडा जाळ्यात



**तब्बल 24 हजार रुपयांना विक्री**

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेलजवळील खाडीत कोल्ही कोपर सत्यवान पाटील, चंद्रकांत म्हात्रे, पारगाव गावचे अंकुश गायकवाड या मच्छिमारांनी वाणा लावल्या होत्या. त्या वाणेला तब्बल २० किला वजनाचा जिताडा मासा मिळाल्याची घटना शुक्रवारी घडली. हा जिताडा मासा तालुक्यातील पारगावातील एका दर्दी खवय्याने तब्बल २४ हजार रुपये विकत घेतल्याची माहिती सत्यवान पाटील यांनी दिली.

रायगड जिल्ह्यासह पनवेल तालुक्यात जिताडा मासा म्हणजे अगदी पापलेट, हलव्यालादेखील बाजूला ठेवणारा मासा म्हणून ओळखला जातो. •›पान २ वर

## आजपासून सहा दिवस सुट्टी

। मुंबई । वृत्तसंस्था ।

दिवाळीनिमित्त यंदा सहा दिवस सलग सुट्टी राहणार आहे. सुट्ट्यांच्या या दिवाळीने सहा दिवस कामकाज खोळंबण्याची शक्यता आहे. शासकीय कर्मचारी मात्र सलग सुट्ट्यांमुळे खुश आहेत. शुक्रवारी वसुबारने दिवाळीस सुरुवात होत आहे. शनिवार व रविवार शासकीय सुट्टी, सोमवारी नरकचतुर्दशीनिमित्त अनेक ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांनी सुट्टी जाहीर केली आहे. या दिवशी बँका मात्र सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले. मंगळवार लक्ष्मीपूजन •›पान २ वर

## सुके खोबरे ५०० रुपये किलो

। पुणे । प्रतिनिधी ।

दक्षिणेकडील राज्यांत नारळाची लागवड कमी प्रमाणात झाल्याने चार महिन्यांपासून नारळ, तसेच गोटा खोबऱ्याचे दर तेजीत आहेत. दिवाळीत खोबऱ्याला मागणी वाढली असल्याने पुणे, मुंबई, ठाण्यासह राज्यातील सर्व प्रमुख बाजारपेठांमध्ये एक किलो खोबऱ्याचे भाव ५०० रूपयांपर्यंत पोहोचले आहेत. चार महिन्यांपासून खोबऱ्याचे दर तेजीत आहेत. दिवाळीत सुक्या खोबऱ्याला मागणी असून, किरकोळ बाजारात पाव किलो गोटा खोबऱ्यासाठी १२० रुपये मोजावे लागत आहेत.

## खाद्यतेलाच्या ट्रकला आग

। पनवेल । प्रतिनिधी ।

तळोजा औद्योगिक वसाहतीत पडघे फाटा परिसरात खाद्य तेलाने भरलेल्या एका ट्रकला शुक्रवारी अचानक आग लागली. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी पोहोचत सदर आग विझवली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

पनवेल तळोजा रस्त्यावर आज तलोजा एमआयडीसीहद्दीत पडघे फाटा परिसरात जात असलेल्या एका तेलाच्या कंटेनरला अचानक भीषण आग लागली. स्थानिकांनी या घटनेची माहिती तळोजा वाहतूक पोलिसांना दिली. वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत अग्निशमन दलाला पाचारण केले. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी पोहोचत सदर आगीवर नियंत्रण मिळवले.



**दिवाळी सुट्ट्यांमध्ये पर्यटनस्थळे बहरली | धार्मिक स्थळांवर होतेय मोठी गर्दी**

# रायगडात पर्यटनाला उधाण

**धम्मशील सावंत**
। पाली/बेणसे ।

जैवविविधतेने नटलेले विलोभनीय निसर्ग सौंदर्य व विस्तीर्ण समुद्रकिनारा तसेच ऐतिहासिक व धार्मिक स्थळे यामुळे सुट्ट्यांमध्ये पर्यटकांची पावले रायगड जिल्ह्याकडे वळतात. अवेळी पावसामुळे पर्यटकांचा हिरमोड झाला. आता पावसाने थोडी उसंत घेतली आहे, तसेच शुक्रवार, शनिवार, रविवार सलग सुट्ट्यांबरोबर दिवाळीच्या सुट्ट्या आल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यामधील पर्यटनस्थळे पर्यटकांनी बहरली आहेत. चार ते पाच दिवसांनी पर्यटकांची पावले या मार्गाला लागतील.

पुणे-मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्र व राज्याबाहेरील निरनिराळ्या ठिकाणच्या पर्यटकांची पावले जिल्ह्यातील पर्यटन •›पान २ वर

### समुद्रकिनारे फुल्ल

अलिबाग-नागाव, वरसोली, मुरुड-काशिद, श्रीवर्धन-दिवेआगर, हरिहरेश्वर येथील समुद्रकिनारे पर्यटकांना भुरळ घालत आहेत. हे सर्व समुद्रकिनारे पर्यटकांनी हाऊसफुल्ल झाले आहेत. घोडागाडी, एटीव्ही राईड्स, घोडा व उंट सफारी पर्यटक याचा आनंद घेत आहेत.

### रिसॉर्ट व फार्महाऊस

शहरातील मंडळींना ग्रामीण भागात असलेले रिसॉर्ट, फार्महाऊस व ॲग्रो टुरिझमचे आकर्षण आहे. निसर्गरम्य वातावरण, शुद्ध हवेचा व सात्विक खाण्याचा ते आनंद घेतात. शिवाय, काही काळ मोबाईल नेटवर्कपासून दूर गेल्याने रिफ्रेश होतात. स्विमिंगपूल असलेल्या रिसॉर्ट अधिक पसंती आहे.

> “पावसामुळे मे महिन्यामध्ये बरेच दिवस पर्यटकांनी पाठ फिरवली होती. मात्र, आता दिवाळी सुट्ट्यांचा हंगाम सुरू झाला आहे. त्यामुळे पर्यटकांची खूप गर्दी होत आहे. पर्यटक समुद्र किनारी राहणे व मजा करणे पसंत करतात. त्यामुळे समुद्रकिनारे फुल्ल आहेत. अनेकांनी आगाऊ बुकिंग केली आहे. राहण्या-खाण्याच्या किमतीमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत थोडीच वाढ झाली आहे.
> – सिद्धेश कोसबे, सरपंच व व्यावसायिक, दिवेआगर”



(छायाचित्र : धम्मशील सावंत)



अलिबाग : क्लासिक - 99702 88702, पेण : मेनहूड - 86009 45123, महाड : चिंतामणी ट्रेडर्स - 94233 83020,
रायगड : खोपोली : शुभम कलेक्शन - 88056 33001, रत्नागिरी : आकृती कलेक्शन - 95616 12322,
कुडाळ : श्री तुळजाभवानी ॲपेरल्स् - 91302 00907 / 73787 12969
For Franchise Enquiries ✆ 9372870673 | 9594672424 | 8080990265 | Shop online on cambridgeapparels.com

# न.प. अधिकारी-कर्मचाऱ्यांची सामाजिक बांधिलकी

## पूरग्रस्तांच्या मदतीसाठी दिला एक दिवसाचा पगार

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली नगरपरिषदेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दाखवले सामाजिक जबाबदारीचे भान राखत पूरग्रस्तांना मदत म्हणून आपले एक दिवसाचे वेतन दिले आहे. याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

संपूर्ण महाराष्ट्रात यावर्षी सप्टेंबर महिन्यात पूरस्थिती उद्भवली. अनेकांचे संसार वाहून गेले, तर कित्येकांची कापणीला आलेली उभी पिकं अतिवृष्टीमुळे आडवी झाली. या अस्मानी संकटाचा सामना करण्यासाठी एक खारीचा वाटा खोपोली नगरपरिषदेच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उचलला आहे. त्यांनी सामाजिक भान जपून आपले एका दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीसाठी दिलेले आहे.

ही एकूण रक्कम रु. ४.१४ लाख इतकी आहे. खोपोली नगरपरिषदेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या या सामाजिक जबाबदारीच्या भानाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# स्वच्छतेच्या जनजागृतीसाठी छोटी पावले

## ग्लोबल हँडवॉशिंग दिनानिमित्त जनजागृती उपक्रम

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

'हँड इन हँड इंडिया' संस्थेच्यावतीने दि. १५ ऑक्टोबर रोजी ग्लोबल हँडवॉशिंग दिन शैक्षणिक आणि सामाजिक उत्साहात साजरा करण्यात आला. मायनी कोयना, फणशीचीवाडी, वावोशी, गोरठण आणि परखंदे या पंचक्रोशीतील झेडपी शाळांमध्ये एकूण १७५ विद्यार्थी आणि ११ शिक्षकांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

या अभियानाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबद्दल जागरूकता वाढवणे, योग्य हात धुण्याच्या सात पद्धती शिकवणे आणि दैनंदिन जीवनात आरोग्यदायी सवयी रूजवणे हा होता. कार्यक्रमाची सुरुवात झेडपी शाळा मायनी कोयना येथे विद्यार्थ्यांच्या स्वच्छता रॅलीने झाली. 'स्वच्छ हात, निरोगी जीवन' आणि 'हात धुवा, आजार टाळा' अशा घोषणांनी परिसरात स्वच्छतेचा संदेश पोहोचवला.




यानंतर शिक्षक व 'हँड इन हँड इंडिया'च्या प्रतिनिधींनी हात धुण्याच्या टप्प्यांचे प्रात्यक्षिक दाखवीत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सराव करवून घेतला. फणशीची वाडी, वावोशी, गोरठण आणि परखंदे शाळांमध्येही समान उपक्रम राबवण्यात आला. शिक्षकांनी हात धुण्याचे महत्त्व जेवणापूर्वी, शौचालयानंतर व खेळानंतर समजावले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबद्दल जागृती निर्माण झाली असून, त्यांनी शाळा व घरात स्वच्छतेची सवय पाळण्याचा संकल्प केला. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांमध्ये ही सवय सातत्याने रुजवण्याचा निर्धार व्यक्त केला. हा उपक्रम यशस्वी ठरून शाळांमध्ये स्वच्छ, निरोगी आणि आनंददायी वातावरण निर्माण करण्यास हातभार लावणारा ठरला.

पान १ वरून

## मुरुडमध्ये अल्पवयीन मुलीची आत्महत्या

नाहीफ अशा धमक्या दिल्या. या सततच्या मानसिक छळाला कंटाळून पीडित मुलीने आपल्या राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली.

या घटनेची तक्रार मुरुड पोलिसात दाखल होताच तात्काळ मुरुड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षकानी पोलीस कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन फॉरेन्सिक टीमसह घटनास्थळी पोहोचून सविस्तर माहिती घेऊन गुन्हा दाखल केला आहे. पीडित मुलगी महाविद्यालयात शिकत होती. त्याच गावातील एक रहिवासी हा विवाहित असून, सदर मुलगी अल्पवयीन असल्याचे माहीत असतानादेखील तिच्याशी वारंवार फोनवरून चॅटिंग करीत तिचा मोबाइलवर पाठलाग करून कॉलवर बोलली नाहीस तर तुझ्या कॉलेजमध्ये मित्र-मैत्रिणींना आपल्या दोघांच्या संबंधाबद्दल सांगून तुझी बदनामी करेन, तुला जगू देणार नाही, अशी धमकी देऊन प्रेमसंबंध नसतानादेखील गावात त्यांचे प्रेमसंबंध असल्याची बतावणी करीत असल्याने या मुलीने गळफास घेऊन आपले जीवन संपविले. मुलीला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याबद्दल आरोपीविरोधात मुरुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती मुरुड पोलिसांनी दिली आहे.

## रिझर्व्ह बँकेने जमा केलेले पैसे परत मिळणार

काढली, अशी सर्वच प्रकारची माहिती वेगवेगळ्या ॲप्सद्वारे मिळत आहे. ग्राहकांना जास्तीत जास्त चांगली सुविधा कधी मिळेल, याकडे संस्थांसह बँका बघत आहेत. त्यामुळे बँक आणि ग्राहकांचे नाते अगदी घनिष्ट होऊ लागले आहे. परंतु, अनेक वर्षांपूर्वी काही ग्राहकांनी बँक खाते उघडले. मात्र, नंतर बँकेशी व्यवहारच ठेवला नाही, असे चित्र काही प्रमाणात आहे. बँकेच्या व्यवहारापासून अनेकजण दूरच राहिले. त्यामुळे काही ग्राहकांची रक्कम खात्यातच पडून राहिली. बँकेत ठेवलेले पैसे घेण्यासाठी खातेदार बँकेत दहा वर्षे फिरकलेच नाही. त्यामुळे ती रक्कम रिझर्व्हे बँकेने जमा केली आहे. मृत खातेदारांचे वारस किंवा जिवंत असलेल्या खातेदारांनी बँकेशी संपर्क साधावा. कागदपत्रे सादर करून आपली रक्कम काढून घ्यावी. रिझर्व्हे बँकेने दिलेल्या तीन महिन्यांच्या मुदतीमध्ये बँकेला कागदपत्रे सादर करावी. बँकामध्ये बचत, चालू खाते व ठेवी स्वरुपात असलेल्या दहा वर्षापेक्षा जास्त काळ दावा न केलेल्या ठेवी तथा पैसे काढण्यासाठी जे खातेदार बँकेत फिरकलेच नाहीत. अशा स्वरुपातील रकमा परत मिळविण्यासाठी जनजागृती व दावा मोहीम हाती घेण्यात आल आहे.

खातेदारांना त्यांच्या खात्यावरील रक्कम काढता येणार असून, पुढे नूतनीकरण करून खाते चालू ठेवता येणार आहे. या मोहिमेद्वारे सर्व बँकांकडून जनजागृती शिबिरे व ग्राहक भेटी तसेच तालुक्याच्या ठिकाणी पंचायत समितीमध्ये १३ ऑक्टोबरपासून शिबीर आयोजित केले आहेत. खातेदारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अग्रणी व्यवस्थापक विजयकुमार कुलकर्णी यांनी केले आहे.

## भूषण पतंगेचा पोलिसांकडून गेम?

परंतु, पुरेशी यंत्रणा नसल्याने त्याला मुंबईतील जे.जे. रुग्णालयात हलवण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणात अधिकचे गौडबंगाल काय आहे, याची 'कृषीवल' पुराव्यानिशी उद्याच्या अंकात पोलखोल करणार आहे. कायदा पोलिसांना पोलीस कोठडीत किंवा चौकशीदरम्यान लोकांना जीव जाईपर्यंत मारहाण करण्याची परवानगी देत नाही. कोणत्याही गुन्हेगारी कृत्याची शिक्षा कायद्याच्या न्यायालयाद्वारे निश्चित केली आहे. गुन्ह्याचा तपास करण्यासाठी पोलीस आहेत, निवाडा करण्यासाठी नाही. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या व्यक्तींकडून कधीही उदासीनता किंवा अतिप्रतिक्रियेत एखादी दुर्घटना घडू नये, असे न्यायालय सांगते, कायदा सांगतो.

**पुरावे नष्ट होण्याची शक्यता**

पोलिसांनी जप्त केलेला माल अन्य कोणी हाताळल्यास पुराव्याचा नाश, बदल किंवा गायब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जप्त करण्यात आलेला माल न्यायालयीन देखरेखीत सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात आलेला असतो. त्यामुळे संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांनी कायद्याच्या चौकटीचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. परंतु, लेकीवरील प्रेमाखातर पोलीस पित्याने हे सर्व केल्याची चर्चा आहे. कारण, तसे नसेल तर तिथे जाऊन तिची बनावट नोटांसोबत फोटो काढण्याची हिंमत झालीच कशी? ती अशा संवेदनशील ठिकाणी पोहोचलीच कशी? हा मुद्दा आहेच. याबाबत चौकशी होणे गरजेचे आहे.

## महाडमध्ये ग्राहकांच्या जीवाशी खेळ

देण्याचा प्रकार सिद्धी स्वीट मालक व चालक यांच्याकडून करण्यात आला.महाड शहरात येणारे बहुतांश गिऱ्हाईक हे ग्रामीण भागातून येत असतात. ग्रामीण भागातील काही नागरिक कमी शिकलेले, साधे भोळे असतात. हे सर्व दुकानदारांवर विश्वास ठेवून मिठाई, स्वीट्स, पाव यांसारखे खाद्यपदार्थ नेत असतात. बहुतांशी वेळा ग्रामीण भागातील जनतेला पदार्थांचे एक्सपायरी डेट म्हणजे काय हेच माहीत नसते. मात्र, ही भोळी जनता दुकानदारावर विश्वास ठेवून वस्तू खरेदी करत असतात. महाड शहर व तालुक्यातील महामार्गावरील स्वीट दुकाने मिठाईचे खाद्यपदार्थ कोठे बनवतात? तेथे स्वच्छता राखली जाते का? ही जागा खाद्यपदार्थ बनवण्यासाठी योग्य आहे का? खाद्यपदार्थ बनवत असताना कोणत्या दर्जाचे पदार्थ वापरले जातात, या सर्व गोष्टींची तपासणी करणे अन्न आणि औषध प्रशासनाला क्रमप्राप्त बनले आहे.मागील वर्षी महाड येथील एका नामांकित स्वीट व्यावसायिकांनीदेखील खराब खाद्यपदार्थ विकल्याने या दुकानावर कारवाई झाली होती. मात्र, अन्न प्रशासन ठोस कारवाई करत नसल्याने मिठाईसह फास्टफूड विक्रत्यांचे फावले आहे. अन्न प्रशासनाने ठोस कारवाई करावी, अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## २० किलोचा जिताडा जाळ्यात

त्याचबरोबर मासळीचा राजा म्हणूनही जिताडा ओळखला जातो. मासेमारी अनेक प्रकाराने करता येते. त्यातील एक प्रकार म्हणजे वाणा. खाडी किनारी सुमारे एक ते दोन किमीच्या परिघात काठ्या गाडून त्याला जाळे बांधले होते. आणि पूर्ण भरती झाल्यावर जाळे खाडीच्या बाजूने काठीच्या उंचीवर उभे केले होते. त्यामुळे जाळे आणि किनारा यांच्यामध्ये अडकलेली मासळी या वाणा प्रकारच्या खाजणी मासे पकडणीत मिळत असते.

## आजपासून सहा दिवस सुट्टी

तसेच बुधवार पाडव्यानिमित्त राज्य शासनाची सुट्टी आहे. लाडक्या बहिणींमुळे राज्य शासनाने यंदा भाऊबीजेला सुट्टी जाहीर केली आहे. परिणामी, शनिवारपासून गुरुवारपर्यंत सलग सहा दिवस शासकीय सुट्टी असेल. शुक्रवार, २४ ऑक्टोबरला कार्यालये उघडणार असली तरी अनेक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शुक्रवारची रजा टाकून पुढचे शनिवार आणि रविवारदेखील बुक केले आहेत. त्यामुळे थेट सोमवार, २७ ऑक्टोबरपासूनच खऱ्या अर्थाने कामकाज सुरळीत होईल.

## रायगडात पर्यटनाला उधाण

स्थळांकडे वळतात. यंदा अवकाळी पावसाने धुमाकूळ घातल्याने मे महिन्याच्या अखेरपर्यंतदेखील पर्यटकांची फारशी गर्दी नव्हती. मात्र, सध्या सर्व ठिकाणी पर्यटकांची गर्दी आहे. यामुळे पर्यटनावर अवलंबून असलेले हॉटेल व्यावसायिक, खानावळी, छोटे-मोठे दुकानदार, वाहतूकदार, राईड्सवाले यांची सध्या चलती आहे. पर्यटकांच्या वाहनांमुळे मुंबई-गोवा महामार्ग, पाली-खोपोली राज्य महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई-बंगलोर महामार्ग आदी मार्गांवर गर्दी होत आहे. तर, काही ठिकाणी वाहतूक कोंडीदेखील पाहायला मिळत आहे. हॉटेलदेखील आगाऊ बुक करण्यात आलेले आहेत.

**या पर्यटनस्थळांवर मोठी गर्दी**

जिल्ह्यातील प्रसिद्ध असलेले थंड हवेचे ठिकाण माथेरानलादेखील पर्यटक आता गर्दी करत आहेत. अष्टविनायकांपैकी दोन गणपती हे रायगडमध्ये आहेत. ते म्हणजे खालापूर तालुक्यातील महडचा वरदविनायक आणि सुधागड तालुक्यातील पालीचा बल्लाळेश्वर, सध्या येथे भाविकांची दर्शनासाठी रीघ लागलेली आहे. शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्यावर शिवप्रेमी मोठ्या संख्येने येत आहेत. राज्याभिषेक दिनीदेखील रायगडावर हजारो शिवप्रेमी आले होते. मुरुड आणि अलिबाग समुद्रकिनाऱ्याची मजा लुटतानाच पर्यटक येथे असलेल्या कुलाबा किल्ल्याला आवर्जून भेट देत आहेत. दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हरिहरेश्वरला पर्यटकांसह भाविकांचीही पसंती असते. कारण, एकाच ठिकाणी समुद्रकिनारा आणि देवदर्शन अशा दोन्ही गोष्टींचा संगम तेथे साधता येतो. कुटुंब व मित्रपरिवारासमवेत रायगड जिल्ह्यामध्ये फिरायला आलो आहे. येथील दिवेआगार, श्रीवर्धन तसेच अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली व महाड येथे भेट दिल्याचे पेझारी येथील धनंजय धुमाळ यांनी सांगितले.

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


### जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक **यशवंत कृष्णा म्हात्रे, रा- बी. आय. टी चाळ नं. ३, पहिला मजला, रुम नं. १७, डॉ. महेश्वरी रोड, सेंडहर्स्ट रोड स्टेशन, डोंगरी, मुंबई चींचबंदर, मुंबई नं. ४०० ००९.** यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षिस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह अधिवक्ता सतीश मुळे, ऑफिस नं. १८, पहिला मजला, बॉम्बे म्युच्यूअल चेंबर, १९/२१ अंबालाल दोशी मार्ग, बी.एस.ई च्या पुढे, फोर्ट, मुंबई-४००००१. येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धिच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरुन आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**

(मालमत्तेचे वर्णन)

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-पेढांबे, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड, येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग १४१, एकूण क्षेत्र ००-२८-१० (हे.आर.चौ.मी) असे आहे.

**अधिवक्ता सतीश मुळे,**
ऑफिस नं. १८, पहिला मजला, बॉम्बे म्युच्यूअल चेंबर, १९/२१
अंबालाल दोशी मार्ग, बी.एस.ई च्या पुढे, फोर्ट, मुंबई-४००००१.
**ठिकाण:** अलिबाग
**दिनांक:** १८/१०/२०२५
**इमेल:** advsatishmuley@gmail.com

### जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक **१. अब्बास अमजदअली सय्यद २. कासमअली अमजदअली सय्यद, दोघे - रा. मु. शेखाचे गांव, पो-नारंगी, ता. अलिबाग, जिल्हा-रायगड** यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षिस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह अधिवक्ता सतीश मुळे, ऑफिस नं. १८, पहिला मजला, बॉम्बे म्युच्यूअल चेंबर, १९/२१ अंबालाल दोशी मार्ग, बी.एस.ई च्या पुढे, फोर्ट, मुंबई-४००००१. येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धिच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरुन आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**

(मालमत्तेचे वर्णन)

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-पेढांबे, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड, येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग १९६, एकूण क्षेत्र ००-१४-४० (हे.आर.चौ.मी) असे आहे.

**अधिवक्ता सतीश मुळे,**
ऑफिस नं. १८, पहिला मजला, बॉम्बे म्युच्यूअल चेंबर, १९/२१
अंबालाल दोशी मार्ग, बी.एस.ई च्या पुढे, फोर्ट, मुंबई-४००००१.
**ठिकाण:** अलिबाग
**दिनांक:** १८/१०/२०२५
**इमेल:** advsatishmuley@gmail.com

### जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक **१. आयशाबीबी इस्माईल दाखवे २. आसिफ जैनुद्दीन लंबाते ३. फकिरमहंमद जैनुद्दीन लंबाते ४. मेहजबीन इमरान अरब ५. राजिया नफिस गोरमे ६. सुलताना जावेद दांडेकर** यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षिस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह अधिवक्ता सतीश मुळे, ऑफिस नं. १८, पहिला मजला, बॉम्बे म्युच्यूअल चेंबर, १९/२१ अंबालाल दोशी मार्ग, बी.एस.ई च्या पुढे, फोर्ट, मुंबई-४००००१. येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धिच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरुन आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**

(मालमत्तेचे वर्णन)

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-पेढांबे, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड, येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग १९९, एकूण क्षेत्र ००-५०-२० (हे.आर.चौ.मी) अकार रु. पै. १२.७१/-

**अधिवक्ता सतीश मुळे,**
ऑफिस नं. १८, पहिला मजला, बॉम्बे म्युच्यूअल चेंबर, १९/२१
अंबालाल दोशी मार्ग, बी.एस.ई च्या पुढे, फोर्ट, मुंबई-४००००१.
**ठिकाण:** अलिबाग
**दिनांक:** १८/१०/२०२५
**इमेल:** advsatishmuley@gmail.com

### e-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-11 / 25-26 7000037498 | Scheme for installation of 100kV Bus sectionalizer bay at 100/22kV Shahapur substation under EHV (O&M) Dn. Dombivali. **Tender Fee Rs. 500/- +GST** | Rs. 50.73 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 17.10.2025 to 03.11.2025 up to 11:00 hrs, Opening date:- 03.11.2025 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459625,
Mob. No. 8412050202 E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

### E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. Tender fees **Rs. 500/- + GST**.

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000037956. Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-28/ 2025-2026.** RFx e-tender for work of tree cutting work of various 100kV& 220kV Lines under EHV Lines S/Dn. Panvel – 1 & 2 for the FY – 2025-26 under EHV (O&M) Division Panvel. **Tender amount Limited to Rs. 20,00,000/-, EMD amount Rs. 20,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **18.10.2025, 18:00 Hrs. to 02.11.2025, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 02.11.2025 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **03.11.2025 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website: **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505.
**Note:** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**E.H.V.(O&M) Dn. Panvel**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. कुणाल विश्वनाथ साळावकर व सौ. जयश्री कुणाल साळावकर रा. कामोठे, नवी मुंबई यांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत ही सदर जमिनीचे विद्यमान मालक श्रीमती वनिता नारायण खामकर रा. कुरमुर्ली, तालुका-पेण, जिल्हा रायगड यांचेकडून रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी झाली आहेत.

मिळकतीचे वर्णन जिल्हा रायगड, तालुका पेण, पंचायत समिती पेण, मे. दुय्यम निबंधक पेण, तलाठी सजा- कामाली, ग्रामपंचायत सापोली, मौजे शेणे येथील गट नं. ४८/१/अ त्यासी एकुण क्षेत्र ०-६६-४० हे.आर.चौ.मी. आकार रु. १-७५ पैसे पैकी श्री. नितेश शंकर म्हात्रे डेव्हलपर्स यांचे मार्फत ०-०७-० हे.आर.चौ.मी. जमिन या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत असून क्लिअर मार्केटेबल टायटल असल्याची ग्वाही विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशीपासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर स्पिड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर हरकत न आल्यास सदरची जमिन निर्वेध व बोजाविरहीत आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

पेण- रायगड.
दि. १८/१०/२०२५.

सही
**ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं.१६.
तळ मजला, शिवाजी पथ.
पेण- रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक शिल्पा प्रताप गंभीर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे कवठेवाडी तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ३५/३ | एकुण क्षेत्र १-४९-०० हे आर पॉ | १-४४ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक १८/१०/२०२५

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर. अमराई रोड, कर्जत
ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९. तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर. अमराई रोड. कर्जत
ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक दुर्गादेवी राजेशकुमार सोनी व इतर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे गौळवाडी तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ९२/४ | एकुण क्षेत्र ०-७४-६० हे आर पॉ यापैकी वरील मालक यांचे क्षेत्र ०-३४-६० हे आर पॉ एवढे क्षेत्र | ५-१२ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक १८/१०/२०२५

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर. अमराई रोड, कर्जत
ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९. तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर. अमराई रोड. कर्जत
ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

### तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण, कर्जत यांचे न्यायालयात

पत्ता : प्रशासकिय भवन, पहिला मजला, पोलिस मैदानाजवळ, कर्जत,
ता. कर्जत जि. रायगड- ४१०२०१

(Tenancy Mannual, Form VIII)

**महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम, १९४८ चे कलम ३२ पोटकलम (१) या अन्वये द्यावयाची नोटीस**

**जाहीर नोटीस**

३२ग दावा क्रमांक: टेनन्सी/एस आर/२१-२०२५

नामदेव गणपत कडू मयत वारस
१. श्री. भारत नामदेव कडू
२. श्री. सुनील नामदेव कडू
३. श्रीम. वंदना नामदेव कडू
रा. बेंडसे ता. कर्जत जि.रायगड
४. भारती सुरेश सोरखदे
रा. चिखलोली ठाकुर पाडा, आनंद नगर,
अंबरनाथ, ता.अंबरनाथ जि. ठाणे ४२१५०५
५. गोविंद गणपत कडू
६. गुजाबाई नामदेव शिंदे मयत वारस
१. श्री. बाळाराम नामदेव शिंदे
२. श्री. दामू नामदेव शिंदे
३. श्री. कृष्णा नामदेव शिंदे
रा. बेंडसे ता. कर्जत जि. रायगड — अर्जदार
४. श्रीम. गुलाब सदाशिव आहिर रा. घर नं. ८५-२, गारपोली,
ता. कर्जत जि. रायगड
५. श्रीम. अनिता महादू पाटील
रा.भालिवडी ता. कर्जत जि.रायगड
६. श्रीम. हेमांगी हेमंत पवार
रा. १०१४, वार्ड नं. ६, साई प्रेरणा मंदिर जवळ,
वीर सावरकर नगर, वांगणी,
ता. अंबरनाथ, जि. ठाणे ४२१५०३
७. दतु गणपत कडू मयत वारस
१. आशा दामू शिंदे
रा. बेंडसे ता. कर्जत जि. रायगड
२. कुंदा गोपाळा भुसाळ
रा. बलिवरे पो.नांदगाव ता. कर्जत जि. रायगड
विरुध्द
१. नरहर वासुदेव मेढी — सामनेवाले
रा. बेंडसे ता. कर्जत जि. रायगड

तमाम जनतेस तसेच सामनेवाले/प्रतिवादी यांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, मौजे -बेंडसे, ता. कर्जत, जि. रायगड या जमिन मिळकती संदर्भात ३२ग अन्वये अर्ज दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये दिनांक ०४/०९/२०२५ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर दाव्याची पुढील सुनावणी दिनांक ०६/११/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता तहसिल कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींनी सुनावणीच्या दिवशी तहसिलदार तथा शेतजमिन यांचे न्यायालयात समक्ष आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| तालुक्याचे नाव | गावाचे नाव | भूमापन क्र. (सर्व्हे नं./गट नं) | पोट हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रु. पैसे. |
|---|---|---|---|---|---|
| कर्जत | बेंडसे | १४ | ३/अ | ०-४४-४० | २-६५ |

सदरची जाहीर नोटीस आजरोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

ठिकाण : कर्जत
दिनांक : १६/१०/२०२५

सही/-
**तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण कर्जत, रायगड**

# तळोजात कचऱ्यापासून वीजनिर्मिती

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल परिसरातील नागरी घनकचऱ्याच्या व्यवस्थापनाला नवे परिमाण देत तळोजा (घोटचाळ) येथे सिडको महामंडळ आणि खासगी कंपनीने स्थापन केलेल्या महाराष्ट्र स्वच्छ ऊर्जा प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्पाला सुरुवात होणार आहे. मुंबई महानगर प्रदेशात अशापद्धतीचा प्रयोग पहिल्यांदा सिडको आणि पनवेल महापालिका क्षेत्रात होत आहे.

हा प्रकल्प स्वच्छता, ऊर्जा आणि पर्यावरण संवर्धन यांचा संगम साधणारा ठरणार असून, देशातील टिकाऊ विकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पाहिला जात आहे. सिडकोसह पनवेल महापालिका सुद्धा या प्रकल्पातील लहान भागीदार असणार आहे. सिडको महामंडळाने एकात्मिक महापालिका घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाद्वारे नुकताच तळोजा येथील घोटचाळ भागात एका



खासगी कंपनीसोबत २२ एकर जागेवर कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्पासाठी १०८२ कोटी रुपयांचा करार केला आहे. यापैकी ७४ टक्के गुंतवणूक खासगी कंपनीकडून तर २६ टक्के सिडकोकडून केली जाणार आहे. पुढील २२ वर्षे महाराष्ट्र स्वच्छ ऊर्जा प्रा. लि. ही कंपनी हा प्रकल्प चालवणार असून, दररोजच्या नागरी घनकचऱ्यापासून २७ मेगावॅट वीज निर्मिती केली जाईल.

सध्या सिडको मंडळ मेट्रोसह विविध प्रकल्पांना वीज प्रति युनिट ८ रुपयांना खरेदी करते. परंतु या प्रकल्पातून निर्मित वीज साडेपाच रुपयांनी उपलब्ध होईल. यामुळे सिडकोला प्रति युनिट सुमारे ३ रुपयांचा आर्थिक लाभ होईल. तसेच या प्रकल्पामुळे परिसरातील कचरा शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट होऊन प्रदूषण नियंत्रण साध्य होईल.

पनवेल महानगरपालिकेकडून मिळणारा नागरी कचरा या प्रकल्पाचा मुख्य कच्चा माल असेल. यामुळे महानगरपालिकेचा कचरा व्यवस्थापनावरील खर्च कमी होईल आणि पुनर्वापर योग्य वस्तूंमुळे आर्थिक उत्पन्नाचे नवे मार्ग निर्माण होतील. कचरा जाळण्यासाठी ९०० अंश सेल्सिअस तापमानावर कार्य करणारे भस्मीकरण यंत्र बसवले जाणार असून, त्यातून निर्मित धुरापासून वीज तयार केली जाईल.

> केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियानात वेस्ट टू एनर्जी प्रकल्प राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याचाच हा प्रकल्प एक भाग आहे. त्याअनुषंगाने पनवेल महापालिका, सिडको नोडचा परिसर आणि उरण नगरपरिषद अशा एकात्मिक परिसरासाठी हा प्रकल्प सिडको राबवित आहे. याच प्रकल्पाचा पनवेल महापालिका एक भाग आहे. वेस्ट टू एनर्जी या प्रकल्पात ९५ टक्के कचरा प्रकल्प ठिकाणी शास्त्रोक्त पद्धतीने विजनिर्मितीसाठी प्रक्रिया होते.
> – मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल महापालिका

## मुरुडच्या किनाऱ्यावरील टपरीधारक हताश



| मुरूड जंजिरा | वार्ताहर |

मुरूड समुद्रकिनारा सुशोभीकरणासाठी राज्य शासनाकडून ११ कोटी ५० लाख रुपये मंजूर झाले असून लवकरच समुद्र सुशोभीकरणाच्या काम झाल्याने मुरुडला पर्यटकांची संख्या वाढणार आहे. परंतु गेली ५ महिने मुरुडला सतत पाऊस असल्याने मुरुडच्या समुद्रकिनारी पर्यटक फिरकले नाही. पाहुणे तर समुद्रकिनारी असलेल्या खाद्य वस्तूंच्या टपऱ्या बंदच होत्या त्यामुळे मंदीचे सावट आहे. टपरी धारक हताश झाला आहेत.

पालिकेने पद्मदुर्ग संस्थेत नोंदणी असलेल्या सर्व टपरी धारकांना हक्काची जागा द्यावी व एकसमान स्टॉल बांधून द्यावे अशी मागणी टपरीधारकाचे प्रमुख अरविंद गायकर यांनी केली आहे

समुद्रकिनाऱ्याचा विकास होत असताना पर्यटकांना विविध सेवा पुरविणाऱ्या टपरीधारकांवर कोणताही अन्याय होऊ देणार नाही.किनाऱ्याचे सौंदर्यीकरण होत असताना टपरीधारकांना गाळे देण्याचे प्रयोजन निश्चित केले असून त्यांना या जागेत वसवले जाणार आहे. टपरीधारकांनी कोणतीही चिंता करू नये सुशोभीकरण होत असताना टपरीधारकांचा एक प्रतिनिधी घेतला जाणार असून आपला सल्ला सुद्धा घेतला जाईल असा दिलासा गेल्यावर्षी देण्यात आला होता.

पद्मदुर्ग व्यवसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी मुसळधार पावसामुळे समुद्रकिनारी असणाऱ्या टपरीधारकांचे नुकसान होत असते. शासनाकडून नुकसानग्रस्त टपरीधारकांना मोबदला दिला जावा अशी मागणी केली. भविष्यात मुरुड नगरपरिषदेकडून टपरीधारकांना गाळे मिळाल्यानंतर आम्हाला असेसमेन्ट देण्यात यावे अशी मागणी यावेळी त्यांनी केली.

## निवडक

### रोह्यात परतीच्या पावसाचा धुमाकूळ

**रोहा :** रोहा शहर व ग्रामीण भागात बुधवारी सायंकाळी अचानक आलेल्या परतीच्या पावसाने आणि वादळी वाऱ्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला. सायंकाळी सातच्या सुमारास अचानक वातावरणात झालेल्या बदलामुळे शहरात अंधार पसरला आणि त्यानंतर मुसळधार पावसासह वाऱ्यांनी जोरदार कहर केला. यामुळे व्यापारी आणि नागरिक दोघांचीही एकच धांदल उडाली. दिवाळीचा बाजार तेजीत असतानाच आलेल्या या पावसामुळे बाजारपेठेतील फटाक्यांची दुकाने, सजावटीचे साहित्य, शुभेच्छा बॅनर्स, आणि फुलांची दुकाने यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अनेक ठिकाणी तंबू व स्टॉल उडाले, तर काही ठिकाणी होर्डिंग्ज रस्त्यावर कोसळली. वाऱ्याच्या तडाख्यामुळे विजेचे खांब झुकले व काही ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला. रोहे शहरासह चणेरा, धाटाव, कोलाड, नागोठणे, भालगाव आणि चनेरा या परिसरातही दमदार पाऊस झाला. शहरातील नाल्यांमध्ये पाणी साचल्याने काही भागात वाहतुकीवर परिणाम झाला.
अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांनी दुकाने, शेडखाली किंवा घरांकडे धाव घेतली. दिवाळीच्या तोंडावर झालेल्या पावसाने बाजारपेठेतील उलाढाल थंडावली असली तरी शेतकऱ्यांसाठी हा पाऊस काही प्रमाणात दिलासा देणारा ठरू शकतो, असे बोलले गेले. मात्र, वादळी वाऱ्यांसह झालेल्या पावसाने व्यापाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

### ५४ हजार ५४५ लाभार्थ्यांना तंबी

**अलिबाग :** राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमातर्गत अंत्योदय व प्राधान्य गट योजनेतील पात्र लाभार्थ्यांना धान्य वाटप करण्यात येते. पण रायगड जिल्ह्यातील ५४ हजार ५४५ लाभार्थ्या ई-केवायसी नसल्यामुळे लाभापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पात्र लाभार्थ्यांनी २० ऑक्टोबरपर्यंत रास्त भाव धान्य दुकानातून धान्याची उचल करावी, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी केली आहे.रायगड जिल्ह्यामध्ये अंत्योदय अन्न योजनेच्या २,१०७ शिधापत्रिका व प्राधान्य कुटुंब योजनेच्या तब्बल ७०,४४२ लाभार्थींच्या धान्याचे वाटप होत नाही. सहा महिन्यांपासून १२,९४५ शिधापत्रिकाधारकांबरोबर ३४,७४५ लाभार्थींचा समावेश आहे. यामुळे जिल्ह्यासाठी मंजूर झालेल्या इष्टांकाचा मोठा भाग सध्या वापराविना शिल्लक असल्याने इतर जिल्ह्यांना वितरित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या संदर्भातील तक्रार रेशन दुकानदार संघटनेने शासनाकडे केली होती. त्यामुळे पुरवठा विभागाने दिवाळी निमित्त १०० टक्के धान्याची उचल व्हावी, यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत.

**रास्तभाव धान्य दुकानातून उचल करण्याची शेवटची संधी**

### धम्मचक्र प्रवर्तन दिनास वर्षावास उत्साहात

**माणगाव :** संबोधी बुद्ध विहार, गोरेगाव येथे मंगळवार, ता. १४ ऑक्टोबर रोजी पंचशील बौद्धजन सेवा संघ (३२ गाव), मुंबई प्रदेश बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र.८४१ व पंचशील महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने धम्मचक्र प्रवर्तन दिन, वर्षावास प्रवचन मालिका समारोप व डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला पुज्य भदन्त शांतीबोधी, भदन्त डॉ. मैत्रियघोष आयुपाल महा-थेरो, उपसभापती विनोद मोरे, कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. अध्यक्षस्थानी विकासद शंकरराव गायकवाड होते. कार्यक्रमात भदन्त शांतीबोधी यांनी धम्म संस्कार वाणीद्वारे उपस्थितांना प्रेरित केले. त्यानंतर भदन्त डॉ. मैत्रियघोष आयुपाल महाथेरो यांनी धम्म देसना दिली. या प्रसंगी लोणेरे तंत्रशास्त्र विद्यापीठाचे डॉ. चंद्रकुमार बडोले, डॉ. महेंद्र शिर्के, तेजस आढाव, सामाजिक कार्यकर्ते सदानंद येलवे, सूर्यकांत कासे, गौतम जाधव, विश्वास गायकवाड, शिक्षक राजू मोरे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांपैकी रिना रवींद्र लोखंडे (९२ टक्के), रुपेश गमरे, तनिष्क हाटे यांचाही गौरव करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी बुद्ध-आंबेडकरी विचारांचा प्रसार करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला स्थानिक नागरिक, महिला मंडळ सदस्य आणि युवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### कोरस कामगारांची दिवाळी गोड

**रोहा :** कोरस कंपनीच्या कंत्राटी कामगारांनी आपल्या हक्काच्या पगार आणि बोनससाठी दिलेला लढा यशस्वी केला आहे. कंपनी प्रशासनाने दिलेल्या आश्वासनानुसार बोनस, एलटी बोनस आणि पगार कामगारांच्या खात्यात जमा करण्यात आला असून त्यामुळे सर्वत्र आनंदाचे वातावरण पसरले आहे. मंगळवारी (ता.१४) सकाळी सात वाजल्यापासून कामगारांनी कंपनीसमोर ठिय्या आंदोलन सुरू केले होते. हक्काचे पैसे मिळेपर्यंत आम्ही कामावर रुजू होणार नाही, असे कामगारांनी स्पष्ट केले होते. या शांततेच्या लढ्यात कंपनीचे एचआर मॅनेजर पावले यांनी चर्चेदरम्यान कामगारांना त्याच दिवशी पगार आणि एलटी बोनस तर पुढील दिवशी बोनस जमा केला जाईल, असे सांगितले. कामगारांनी या निर्णयावर सहमती दर्शवली आणि पुन्हा कामावर रुजू झाले. प्रशासनाने शब्द पाळत बोनस दिल्याने सुमारे दीडशे कामगार वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले. कामगार प्रतिनिधींच्या एकजुटीमुळे आणि शांततामय पद्धतीने झालेल्या या आंदोलनाने एक आदर्श निर्माण केला आहे.

## शेलघर येथे मंगळवारी ‘दिवाळी पहाट’!

| चिरनेर | प्रतिनिधी |

सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी दिवाळी पहाट हा कार्यक्रम आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी उलवा नोडमध्ये सर्वप्रथम सुरुवात केली. ही परंपरा जपण्यासाठीच यमुना सामाजिक, शैक्षणिक संस्था आणि रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे शेलघर येथे ‘दिवाळी पहाट’ हा सुमधुर गीतांचा कार्यक्रम मंगळवारी (ता.२१) सकाळी सात वाजता होणार आहे.

‘इंडियन आयडाल’ सागर म्हात्रे, ‘होऊ दे धिंगाणा फेम’ विनल देशमुख, मसूर नवा ध्यास नवा फेमफ श्वेता म्हात्रे, तृप्ती दामले यांच्या बहारदार गायनाने ‘दिवाळी पहाट’ रंगणार आहे. विशेष म्हणजे लास्ट स्टॉप खांदा या चित्रपटाची टीमही यावेळी उपस्थित राहणार आहे.

**कैलास मानसरोवर यात्रेवर आधारित ‘सुखकर्ता’ दिवाळी अंकाचे प्रकाशन**

‘दिवाळी पहाट’ कार्यक्रमानंतर पत्रकार परिषद होणार आहे. या पत्रकार परिषदेत कामगारांसाठी वर्षभरात केलेले करार आणि बोनसबाबत माहिती देण्यात येईल. तसेच दिवाळी अंकांचा साहित्यिक वारसा जपण्यासाठीच यंदा पहिल्यांदाच सुखकर्ता या दिवाळी अंकाचे प्रकाशन होणार आहे.

हा दिवाळी अंक कैलास मानसरोवर या विषयाला वाहिलेला आहे. दोन वेळा कैलास मानसरोवर यात्रा करणारे महेंद्र घरत यांनी त्यांच्या अनुभवाची शिदोरी वाचकांना देण्याचा प्रयत्न सुखकर्ता या दिवाळी अंकातून करण्यात आला आहे.

## रिस येथे विवाहितेचा छळ

| रसायनी| प्रतिनिधी |

रसायनी पोलीस ठाणे हद्दीमधील रिस येथील साईराम सोसायटी बिल्डींग येथे राहणाऱ्या एका विवाहित महिलेला अमानूष वागणूक करत छळ केल्याची घटना घडली असून विवाहितेचा पती सुनित घोडे, सासरे शंकरराव घोडे (वय ७०), माया शंकर घोडे (६२), नणंद सुप्रिता मुळगाव कोपगाव, जिल्हा अहमदनगर, सध्या राहणार रिस यांनी फिर्यादी विवाहितेला शारीरिक व मानसिक छळ करून शिवीगाळ करत क्रूरतेने वागणूक दिली. याबद्दल विवाहित महिलेने रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून बीएनएस कलम ८५, ७९, ३५९, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रसायनी पोलीस याबाबतचा अधिक तपास करीत आहेत.

## रायगडात अट्रॉसिटी गुन्ह्यांचे प्रमाण अत्यल्प- लोखंडे

| रायगड | प्रतिनिधी|

रायगड जिल्ह्यात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हे घडण्याचे प्रमाण घटले असून जिल्ह्यात चालू वर्षात सप्टेंबर महिन्यापर्यंत या कायद्यान्वये चार गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. या वर्षात एकूण ३१ गुन्हे नोंदविले गेले आहेत. या सर्व प्रकरणांमध्ये पोलिसांनी सक्षमपणे काम करावे. महाड पोलीस ठाण्याच्या हद्दीत २०२४ साली घडलेल्या प्रकरणात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून त्याला अटक करावी, अशा सूचना देण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत दिली.



यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, सहाय्यक समाजकल्याण आयुक्त सुनील जाधव उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यातील नगरपरिषदा, नगरपालिका, नगरपंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राबविण्यात येणाऱ्या मागासवर्गीयांसाठीच्या विविध योजना, नोकरभारती, अनुकंपा तत्वावरील प्रकरणे, समाजकल्याण विभागाकडून येणाऱ्या निधीचा वापर, आर्थिक दुर्बल घटकांवर होणारा खर्च, दलित वस्ती, रमाई आवास घरकुल योजना, लाड पागे प्रलंबित प्रकरणे याबाबत महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांनी जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी यांच्याकडून आढावा घेतला.

रायगड जिल्ह्यात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हे घडण्याचे प्रमाण घटले आहे चालू वर्षात नऊ महिन्यांमध्ये चार गुन्हे नोंदविण्यात आले आहे. १९९५ ते २०२५ या कालावधीत जिल्ह्यात ७८९ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत, अशी माहिती या वेळी देण्यात आली.

मागासवर्गीयांसाठी असलेल्या योजनांची अंमलबजावणी रायगड जिल्ह्यात चांगल्या प्रकारे केली जात आहेत. समाजकल्याण विभागाचा निधीचा वापरदेखील योग्य प्रकारे केला जात आहे.

## शेकापक्षाचा आज नागोठण्यात भव्य रोजगार मेळावा

| नागोठणे | प्रतिनिधी |

नागोठणे शहर व विभागातील बेरोजगार तरुण तरुणींना नोकरी व रोजगाराची संधी मिळावी या उदात्त हेतूने भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे महाराष्ट्र राज्याचे खजिनदार व शिवराज्य संघटना प्रमुख अतुल म्हात्रे यांच्या वतीने नागोठण्यातील श्री शिवगणेश सभागृहात शनिवारी (दि. १८) सकाळी १०.३० वाजता भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यात १८ ते ३५ वयोगटातील आणि शैक्षणिक पात्रता १० वी ते पदवीधर, एम. कॉम, एम. एससी, एम. ए. आय टी आय, डिप्लोमा इंजिनिअरिंग, व अन्य शिक्षण असलेल्या तरुण तरुणींनी आपले शैक्षणिक कागदपत्र सोबत घेऊन येण्यास सांगण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्यात अनेक नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. मेळाव्यात उपस्थित कंपन्यांच्या प्रतिनिधींकडून मेळाव्यात आलेल्या बेरोजगार युवक युवतींची मेळाव्यातच मुलाखत घेऊन निवड झालेल्या उमेदवारांना तेथेच ऑफर लेटर/नियुक्तीपत्र देण्यात येणार आहे. या मेळाव्यामुळे नागोठणे विभागातील युवकांसाठी १०० टक्के नोकरीची सुवर्णसंधी लाभणार असल्याने या मेळाव्यास बेरोजगार युवकांना उपस्थित राहण्यास सांगण्यात आले आहे. शिक्षण पूर्ण केल्यानंतर बहुतांश तरुण तरुणींचा नोकरीचा शोध सुरू होतो. काहीजण नोकरी मिळविण्यात यशस्वी होतात तर अनेकांना बेरोजगार रहावे लागते. शेकापचे सरचिटणिस जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पेण मतदार संघात सर्वत्र भव्य बेरोजगार मेळावे आयोजित करून तरुणांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. याचाच एक भाग असलेल्या नागोठण्यातील या भव्य रोजगार मेळाव्यात उपस्थित राहण्यासाठी बेरोजगार तरुण तरुणींनी मोबाईल क्रमांक ७७१०८१९६८१ यावर संपर्क साधून रोजगार मेळाव्यात सहभागी होण्याचे आवाहन तुकाराम खांडेकर यांनी केले आहे.

## सिद्धेश्वर ग्रामपंचायतीत भ्रष्टाचार झाल्याचे आरोप

| पाली/ वाघोशी | प्रतिनिधी |

पाली पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या सिद्धेश्वर ग्रामपंचायतीत पंधरावा वित्त आयोगातून करण्यात आलेल्या निधीच्या खर्चात भ्रष्टाचार झाल्याचे गंभीर आरोप ग्रामपंचायत सदस्य मनोहर काशीराम जांभूळकर यांनी केले आहेत. यासंदर्भात त्यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती पाली सुधागड यांच्याकडे सविस्तर चौकशीची मागणी करणारा लेखी अर्ज सादर केला आहे.



**ग्रामपंचायत सदस्य मनोहर जांभूळकर यांची चौकशीची मागणी**

जांभूळकर यांनी अर्जात नमूद केले आहे की, सिद्धेश्वर ग्रामपंचायत हद्दीत अनेक विकासकामांच्या नावाखाली पंधरावा वित्त आयोगातून निधी खर्च दाखवण्यात आला आहे. मात्र या खर्चाचा कोणताही खुलासा ग्रामसेवक, सरपंच किंवा उपसरपंच यांनी ग्रामपंचायत सदस्यांना दिलेला नाही.गावातील गटार कामासाठी ७ जानेवारी २०२५ रोजी ग्रामपंचायतीच्या खात्यातून ६५,२०८ रुपये काढले गेले असूनही प्रत्यक्षात ते काम झालेले नाही, असा आरोप केला आहे.

## दिवाळीनंतरच मिनी ट्रेन धावणार

| माथेरान | प्रतिनिधी |

पावसाने यंदा लवकर हजेरी लावल्यामुळे मिनी ट्रेन मेमध्ये बंद करावी लागली होती. दरवर्षी पर्यटकांना निसर्गाचा सुखद अनुभूती देणारी मिनी ट्रेन १५ ऑक्टोबरला सुरू होते; पण नेरळ-माथेरान मिनी ट्रेन अजूनही सुरू झाली नसल्याने पर्यटकांचा हिरमोड होणार आहे. नेरळ-माथेरान नॅरोगेज मार्गावर मिनी ट्रेन बंद असली तरी अमन लॉज-माथेरान ही शटलसेवा अखंडित सुरू आहे. अतिवृष्टी होऊनही शटल पर्यटकांना सेवा दिली. येथे सहा हजार मिलिमीटर पाऊस पडला असून मिनी ट्रेन एक दिवसही बंद नव्हती. पर्यटकांनी शटल सेवेतून पावसाळी पर्यटनाचा आनंद घेतला.

**कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण | फटाके वाजवून केला आनंदोत्सव साजरा**

# पनवेल महापालिकेत ३२ हजार सानुग्रह अनुदान घोषित

| पनवेल | प्रतिनिधी |

सिडको आणि पनवेल महापालिकेतील कर्मचाऱ्यांची यंदाची दिवाळी सानुग्रह अनुदानाच्या घोषणेमुळे गोड झाली आहे. सिडको मंडळाने यंदा कर्मचारी व अधिकाऱ्यांना पन्नास हजार रुपयांचे सानुग्रह अनुदानाची परंपरा कायम ठेवली तर पनवेल महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त मंगेश चितळे यांनी मागील वर्षीपेक्षा सानुग्रह अनुदानात दोन हजार रुपयांची वाढ करून अनुदान वाढीची घोडदौड सुरूच ठेवली. त्यामुळे दोन्ही सरकारी उपक्रमातील कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

पनवेल महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्यासमोर महापालिकेच्या म्युन्सिपल एम्प्लॉईज युनियनचे सरचिटणीस अनिल जाधव यांनी ४० हजार रुपये सानुग्रह अनुदानाचा प्रस्ताव मांडला होता. अखेर आयुक्त चितळे यांनी कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड करत ३२ हजार रुपयांच्या प्रस्तावाला मंजूरी दिली. यामुळे पनवेल महापालिकेच्या ८२५ आणि प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेले ५ अधिकाऱ्यांना ३२ हजार तसेच महापालिकेचे ६७ शिक्षक कर्मचाऱ्यांसह एनयुएलएम, पीएमवाय कर्मचाऱ्यांना प्रत्येकी



१० हजार रुपये तसेच परिश्रमीक कर्मचारी, एनयुएचएम आणि आशा स्वयंसेविका यांना प्रत्येकी सात हजार रुपये सानुग्रह अनुदान मिळणार आहे. सानुग्रह अनुदानाचे लाभार्थी १३२६ कर्मचारी असून यासाठी पालिका ३ कोटी २ लाख ४५ हजार रुपये खर्च करणार आहे.

सिडको एम्प्लॉइज युनियनने गुरुवारी याच सानुग्रह अनुदानाची घोषणा करण्यासाठी बेलापूर येथील सिडको भवन येथे प्रवेशद्वार सभा आयोजित केली होती. या सभेत राज्यातील सर्वाधिक ५० हजार रुपयांचा बोनस जाहीर करण्यात आला. या सभेवेळी विमानतळ बनविण्यासाठी तसेच भूसंपादन प्रक्रिया, देखरेखीच्या कामात सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल आणि तत्कालिन व्यवस्थापकीय संचालक संजय भाटिया, भूषण गगरानी, तानाजी सत्रे, अनिल डिग्गीकर, संजय मुखर्जी, व्ही. राधा, प्राजक्ता लवंगारे यांचे आभार मानून पेढे वाटून आणि फटाके वाजवून कर्मचाऱ्यांनी आनंदोत्सव साजरा केला.

यासभेत कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना युनियनचे सरचिटणीस नितीन कांबळे यांनी सर्व युनियन मागण्या आणि त्यासंदर्भात माहिती उपस्थितांना दिली. तसेच युनियनचे अध्यक्ष सुभाष पाटील यांनी भ्रष्टाचार न करण्याचे आवाहन केले आणि दिवाळी बोनस जाहीर केला. सदर सभेत उपाध्यक्ष संजय पाटील, प्रमोद पाटील, सहसचिव सुधीर कोळी, महिला सदस्या प्रमिला पाटील, हर्षदा पाटील यांनी दिवाळी निमित्त कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

> महापालिका कर्मचाऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न पालिका प्रशासनाने केला आहे. महापालिका कर्मचाऱ्यांचे वेगवेगळे प्रश्न आपण सोडवत आहोत. १०-२०-३० या वर्षांची कालबद्ध पदोन्नती वर्ग चारच्या कर्मचाऱ्यांना दिली आहे लवकरच वर्ग ३ च्या कर्मचाऱ्यांना ती देण्यात येईल. प्रलंबित असलेले पदोन्नतीचे प्रश्न सोडविण्यात येतील. याचा भाग म्हणून दिवाळी गोड करण्यासाठी कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे. – मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल महापालिका

## कशेळे येथील आरोग्य शिबिरात २२० रुग्णांची तपासणी

| नेरळ | प्रतिनिधी |

कशेळे येथे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते.या शिबिरात २२० रुग्णांनी तपासणी केली असून रायगड हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर यांच्या आरोग्य पथकाने रुग्णांची तपासणी केली.



या शिबिरात रायगड हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरकडून मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुशाग्र पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली यावेळी डॉ. दर्शना, डॉ. चिन्मय भगत, डॉ.जय खांडेकर, डॉ. शिवराम, डॉ. अनिता, डॉ. जिना, डॉ. नितल, तसेच समाधान पाटील यांनी केले.

या आरोग्य शिबिरात रक्तदान मधुमेह नेत्र, दंत रोग तपासणी, स्तन आणि गर्भाशय मुख तसेच मुख कर्करोग तपासणी, गरोदर महिलांसाठी प्रस्तुती पूर्व तपासणी, क्षयरोग तपासणी, तसेच विशेष तज्ज्ञांचा सल्ला व मार्गदर्शन देण्यात आले.माता व बाल सुरक्षा कार्ड, आयुष्मान वय वंदना कार्ड, पोषक ट्रॅकर मध्ये लाभार्थी नोंदणी, स्थानिक व क्षत्रिय आहाराला प्रोत्साहन देणे, गरोदर आणि स्तनदा माता यांसाठी तसेच लहान बाळांसाठी योग्य आहार, मासिक पाळी स्वच्छता याविषयी महिलांना मार्गदर्शन करण्यात आले.

# भाजपची दिवाळी सफाई

गुजरात ही भाजपची यशस्वी प्रयोगशाळा आहे. इथूनच देशाला मोदी व शाह यांच्यासारखी नररत्ने मिळाली. गुजरातवर भाजपची इतकी पकड आहे की, पत्त्यांचा डाव पिसल्याप्रमाणे ते कधीही वाटेल ते खेळ करू शकतात. गुरुवारी अचानक तेच झाले. सर्व सोळा मंत्र्यांनी राजीनामे दिले. म्हणजे खरे तर त्यांच्याकडून ते घेतले गेले. लगेच शुक्रवारी नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. हे सगळे होताना एक शब्दही बाहेर फुटला नाही. राजीनामा येईल असा सुगावादेखील कोणाला लागला नाही. एकाही मंत्र्याने हू का चूं केले नाही. एकानेह माझ्यावर अन्याय झाला, मी बंड करीन वगैरे भाषा केली नाही. शिवाय यांच्या जागी कोणाला बसवायचे हे आधीच ठरलेले होते. त्यांच्या यादीबाबतही कोणताही घोळ झाला नाही. कोणाला घेणार याच्या चर्चा करायला मिडियाला वेळ दिला गेला नाही. सगळे कसे लष्करी शिस्तीत पार पडले. शिस्त व निष्ठा असावी तर अशी. पण गुजरातमध्ये भाजपने दुसऱ्यांदा हा प्रयोग केला. यापूर्वी २०२१ च्या सप्टेंबरमध्ये तेव्हाचे मुख्यमंत्री विजय रुपानी यांच्यासह सर्वांना अचानक राजीनामा द्यायला लावले गेले. कहर म्हणजे नव्यानेच आमदार झालेले व कोणताही पूर्वानुभव नसलेले भूपेंद्र पटेल यांना मुख्यमंत्री केले गेले. तेव्हा पटेल समाजाचे आरक्षणाचे आंदोलन चालू होते व २०२२ च्या विधानसभा निवडणुकांमध्ये याचा फटका बसेल अशी भीती भाजपच्या नेत्यांना वाटत होती. त्यामुळे त्यांनी हा फेरबदल तर केलाच, शिवाय जवळपास सर्वच मंत्री हे पहिल्यांदाच मंत्रिपदी बसणारे असे ठेवले. त्यामुळे भ्रष्टाचार किंवा अकार्यक्षमतेचे आरोप थोडे मागे पडले. शिवाय आमदारांमधील संभाव्य नाराजी दूर झाली. ताज्या साफसफाईमागे हेच हिशेब आहेत. २०२७ मध्ये पुढच्या विधानसभा निवडणुका होणार आहेत. त्यापूर्वी नव्या वर्षाच्या प्रारंभालाच पालिका व जिल्हा परिषदांच्या निवडणुकांमध्ये पक्षाचा कस लागणार आहे. भाजप गुजरातमध्ये गेली २५ वर्षे सत्तेत आहे. इथल्या प्रश्नांबद्दल ते काँग्रेसला जबाबदार धरू शकत नाहीत. आणि, प्रश्न तर भरपूर आहेत. गेल्या दोन वर्षात बडादे, अहमदाबाद, राजकोट इत्यादी भागात आलेल्या पुरांमध्ये इथल्या नागरी सेवांचे तीनतेरा वाजले. पूर्वी कधीही पाणी न भरलेल्या जागांमध्ये पूर आले. नागरिकांनी सरकारच्या नावाने ठणाणा केला. सध्या शेतकऱ्यांची आंदोलने चालू आहेत. आम आदमी पक्षाने बारा ऑक्टोबरला केलेल्या आंदोलनाला तर हिंसक वळण लागले. व्यापारी ठरवलेल्या दरात माल उचलत नाहीत आणि मालाच्या वाहतुकीचा खर्चही शेतकऱ्यांकडून वसूल केला जातो अशा त्यांच्या तक्रारी होत्या. त्यांच्यावर इलाज करण्याऐवजी सरकारने त्यांच्यावर लाठीहल्ला करून त्यांना तुरुंगात टाकले.

## लोक नाराज, आमदार नाराज

त्यामुळे २५ वर्षे मिळूनही गुजरातचा काही स्वर्ग वगैरे झालेला नाही. उलट अमेरिका किंवा युरोपात देशांतर करू मागणाऱ्यांमध्ये बहुसंख्य गुजरातीच असतात. अलिकडे ट्रम्पने ज्या बेकायदा लोकांना परत धाडले त्यात पंजाब्यांच्या बरोबरीने गुजराती लोक होते. चार वर्षांपूर्वीपर्यंत पटेल समाजाचे लाखालाखांचे मोर्चे निघत होते. राखीव जागा म्हणजेच पर्यायाने नोकऱ्यांची मागणी ते करीत होते. सुरतचा हिरे बाजार बरबाद झाला आहे. ट्रम्प यांनी आयातशुल्क लागू केल्यानंतर तर हिऱ्यांची निर्यात जवळपास बंद पडली आहे. यामुळे हजारो कामगार बेकार झाले आहेत. शिवाय यांना हिऱ्यांना पॉलिश करण्याखेरीज दुसरे काही तंत्र येत नाही. त्यामुळे त्यांना दुसरीकडे नोकरी शोधणे सोपे नाही. या स्थितीत लोकांच्या असंतोषाचा स्फोट होऊ शकतो याची पूर्ण कल्पना भाजपला आहे. त्यांच्या नेत्यांचे कौतुक असे की, निवडणुकीला दोन वर्षे बाकी असतानाच ते कामाला लागले आहेत. काँग्रेस किंवा इतर पक्षांप्रमाणे हातावर हात ठेवून बसलेले नाहीत. या नव्या मंत्रिमंडळात काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष अर्जुन मोदवाडिया यांच्यासह अनेक बाहेरून आलेल्यांचा समावेश आहे. म्हणजे याही बाबतीत भाजप नेते लवचिक आहेत. पटेल, दलित, आदिवासी यांना पुरेसे स्थान दिले जाईल याची काळजी घेतली गेली आहे. मंत्र्यांची संख्याही आधीच्या सोळावरून आता २६वर गेली आहे. याचा दुसरा अर्थ असा की, आम जनते प्रमाणेच खुद्द भाजपच्या आमदारांमध्ये व पक्षसंघटनेतही नाराजी होती. तिला शांत करण्यासाठी हे बदल केले गेले आहेत. अलिकडेच भाजप प्रदेशाध्यक्षपदी जगदीश विश्वकर्मा या ओबीसी नेत्याला निवडले गेले आहे. विश्वकर्मा हा संख्येने प्रबळ समाज नाही. पण जातींची गणिते साधण्यासाठी ती निवड उपयुक्त ठरणार आहे. पण या सर्व फेरबदलामधून ठळकपणे जाणवणारी गोष्ट हीच आहे की, मोदी व शाह यांची भाजपच्या पक्षसंघटनेवर किती कमालीची पकड आहे हे यावरून दिसते. पूर्वी कम्युनिस्टांकडे अशीच निष्ठावान कार्यकर्त्यांची फळी होती. पक्ष ठरवेल ते अंतिम हे तत्व सर्वांना मान्य होते. म्हणूनच तर ज्योती बसू यांची इच्छा असूनही त्यांना पंतप्रधानपद घेता आले नव्हते. आज मात्र भाजप वगळता इतर कोणत्याही पक्षात या रीतीची शिस्त राहिलेली नाही.

## इतरत्र बंडाळ्या चालूच

अर्थात, भाजपलाही देशात इतरत्र अशा रीतीचे मॉडेल उभारता आलेले नाही. महाराष्ट्रात गेल्या वर्षीच्या विधानसभेत २३२ विक्रमी जागा मिळूनही युतीचे सरकार लगेच स्थापन होऊ शकले नव्हते. नंतर मंत्रिमंडळाच्या नावांबाबतही बराच काळ घोळ घातले गेले. सुधीर मुनगंटीवार यांच्यासारख्यांना वगळण्यात आले तेव्हा त्यांनी आपली नाराजी जाहीरपणे बोलून दाखवली. अजूनही ते शेरेमारी करीत असतात. भाजपचा प्रदेशाध्यक्ष नेमतानाही बराच काथ्याकूट झाला. अजूनही एकनाथ शिंदे यांच्या गटाच्या विरुध्द निवडणूक लढवण्याची हिंमत भाजपवाल्यांमध्ये नाही. मुंबई पालिका ताब्यात येईल की नाही याचा भरवसा नाही. तिथे अमित साटम यांना शहरप्रमुख केल्याने आशिष शेलार आणि प्रवीण दरेकर स्पष्टपणे नाराज झाले आहेत. विरोधी नेत्यांवर टीका करण्यासाठी पडळकर, सदावर्ते असल्या एकाहून एक नगांच्या शिव्यांचा आधार घेऊन चालावे लागत आहे. तिकडे केंद्रात भाजपचा राष्ट्रीय अध्यक्षही निवडता आलेला नाही. जे. पी. नड्डा यांची मुदत संपून आता एक वर्ष होऊन गेले आहे. त्यांची मुदतवाढसुध्दा संपली आहे. पण नवीन नावावर भाजप आणि संघामध्ये एकमत होण्याचे नाव नाही. बिहारमध्ये मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणता येईल असा एकही नेता पक्षाला घडवता आलेला नाही. परिणामी अजूनही अत्यंत दुबळ्या अशा नीतीशकुमारांचा पदर धरूनच निवडणुका लढवाव्या लागत आहेत. तिकिटवाटपाची जाहीर घोषणा करणे अशक्य झाले आहे. नाराजीचा स्फोट होईल अशी भीती आहे. थोडक्यात गुजरातमध्ये मोदी व शाह यांच्या भीतीमुळे काही गोष्टी साधल्या. पण शेजारच्या महाराष्ट्रात किंवा दूर बिहारमध्ये ते शक्य झाले नाही. गुजरातमध्ये देखील यश मिळते आहे म्हणून सर्वजण एकत्र आणि गप्प आहेत. गेल्या वेळी भाजप अडचणीत आहे असे पाहताच अनेकांनी तलवारी काढल्या होत्याच. शिवाय, गुजरातेतही काँग्रेसमधून हार्दिक पटेल यांच्यासह अनेक आमदारांनाआमिषे दाखवून फोडावे लागले होतेच. म्हणजे गुजरातची आजची भाजपची ताकद ही निर्भेळ भाजपची वा संघाची नाहीच आहे. लोकसभेला याचे प्रत्यंतर आले होतेच. राहुल गांधी यांनी थोडा जोर लावला व सातत्य दाखवले तर भाजपच्या या गडाला खिंडार पाडता येऊ शकेल. पण आपला मुकाबला हा लष्करी शिस्तीच्या एका पक्षाशी आहे हे त्यांना ध्यानात घ्यावे लागेल.

---

**विचार**

# बिहारमध्ये रण पेटले...

**बिहार विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर राजकीय समिकरणांची जोरदार चर्चा सुरु झाली आहे. दरम्यान, बिहारच्या सीमा आणि संवेदनशील राज्याचा शिक्का समोर असतानाही मतदानाचे टप्पे पूर्वीपेक्षा कमी करण्यात आले आहेत. बांगलादेशींची घुसखोरी आणि अन्य मुद्दे महत्त्वाचे असताना आता तिथे कायदा आणि सुव्यवस्था राखत मतदान पार पाडण्याचे मोठे आव्हान निवडणूक आयोग आणि बिहार प्रशासनापुढे आहे.**



**शिवशरण यादव**

केंद्रीय निवडणूक आयोगाने बिहार विधानसभेच्या निवडणुकीची घोषणा करताना मतदानाचे दोन टप्पे जाहीर केले. सहा आणि ११ नोव्हेंबरला बिहार विधानसभा निवडणुकीसाठी मतदान पार पडत आहे. बिहारमध्ये ४० वर्षांनंतर दोन टप्प्यांमध्ये निवडणुका होत आहेत. पहिल्या टप्प्यामध्ये १२१ जागांसाठी तर दुसऱ्या टप्प्यात १२२ जागांसाठी मतदान होईल. अर्थात ४० वर्षांपूर्वीचा बिहार आणि आताचा बिहार यामध्ये मोठे अंतर आहे. एक तर बिहारचे विभाजन झाले आहे. पूर्वीच्या तुलनेत तिथली कायदा आणि सुव्यवस्था सुधारली आहे. विधानसभेच्या निवडणुकीअगोदर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री नितीशकुमार या दोघांनीही केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून तिजोऱ्या खाली करत वेगवेगळ्या समाजघटकांना खूश करण्याचा प्रयत्न केला आहे. महिला, युवकांच्या खात्यात थेट पैसे जमा करण्याच्या योजना जाहीर झाल्या. दुसरीकडे, विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बिहारमधील सत्ताधाऱ्यांविरोधात यात्रा काढल्या. मतदार पुनरीक्षणावरून सत्ताधाऱ्यांची कोंडी केली. भावनिक आणि लाभाच्या योजनांवर लक्ष केंद्रित करून मतांची झोळी भरण्याचा सत्ताधाऱ्यांचा प्रयत्न आहे. निवडणुकीतील दोन टप्पे सत्ताधाऱ्यांच्या फायद्याचे ठरतील, अशा प्रकारे आखण्यात आले आहेत. सरकारविरोधात नाराजी असली, तरी त्याचा फटका सत्ताधाऱ्यांना बसणार नाही, असे राजकीय गणित त्यामागे आहे. मतदारांची नाराजी विभागली जाणार आहे.

या निवडणुकीमध्ये नेहमीपेक्षा वेगळी राजकीय समिकरणे समोर आली आहेत. निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांचा पक्ष या निवडणुकीच्या रिंगणात असून त्यांच्या पक्षाला मिळणारी मते भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या पथ्यावर पडण्याची शक्यता आहे. जितकी जास्त मते ते आणि त्यांचा पक्ष घेईल, तेवढे भाजपच्या फायद्याचे ठरु शकते. बिहारचे राजकीय चित्र पाहता काँग्रेसची अवस्था आणखी वाईट होण्याची शक्यता आहे. राष्ट्रीय जनता दलातील भाऊबंदकीनंतरही आपला दबदबा कायम ठेवण्यात तेजस्वी यादव यशस्वी ठरतील, असे आज तरी दिसत आहे. भाजपबरोबर राहूनही संयुक्त जनता दलाला आहे त्या जागा राखता येतील का, याबाबत साशंकता आहे. भाजप मात्र मोठा होत असल्याचे चित्र आहे. भाजप, राष्ट्रीय जनता दल आणि प्रशांत किशोर यांच्या पक्षामुळे या राज्यामध्ये नितीशकुमार, जीतनराम मांझी, चिराग पासवान यांच्या पक्षाचे भवितव्य अंधकारमय होण्याची दाट शक्यता आहे. दोन टप्प्यांमध्ये मतदान झाल्यानंतर १४ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या निकालांवरून बिहारमधील नेमके राजकीय चित्र समोर येईल. आचारसंहिता लागू झाल्यापासून मतदानाच्या पहिल्या टप्प्यापर्यंत नेमका एक महिना उरला आहे. गेल्या तीन निवडणुका पाहता, बिहारमधील मगध आणि शहाबादमध्ये प्रथम मतदान झाले होते. याचा अर्थ दक्षिण बिहारमधील बहुतेक जागांचा पहिल्या टप्प्यात समावेश होता. या वेळी, पहिल्या टप्प्यात उत्तर बिहारमधील तिरहुत, मिथिला आणि कोसी प्रदेशातील जागा समाविष्ट आहेत. तिथे 'एनडीए' मजबूत आहे, तिथे पहिले मतदान होईल.

पहिल्या टप्प्यामध्ये दरभंगा, मधेपुरा, सहरसा, खगरिया, गोपालगंज, मुंगेर आणि नालंदा येथे मतदान होईल. येथे 'एनडीए' मजबूत आहे. दरभंगातील दहापैकी नऊ जागा, समस्तीपूरमधील दहापैकी पाच जागा, नालंदातील सातपैकी सहा जागा, शेखपुरातील दोनपैकी एक जागा, मुंगेरमधील तीनपैकी दोन जागा, खगरियातील चारपैकी दोन जागा, मधेपुरातील चारपैकी दोन जागा सहरसातील चारपैकी तीन जागा 'एनडीए'कडे आहेत. पहिल्या टप्प्यातील १२१ जागांपैकी ७० जागा तिरहुत आणि मिथिला प्रदेशातील आहेत. यापैकी ३९ जागा 'एनडीए'कडे आहेत. दुसऱ्या टप्प्यात मगध, अंग प्रदेश आणि शहाबाद या जिल्ह्यांमध्ये मतदान होईल. तथापि, अंग प्रदेशातील मुंगेर, शहाबादमधील बक्सर, कोसी येथील सहरसा, मगधमधील नालंदा आणि शेखपुरा येथे पहिल्या टप्प्यात मतदान होईल. 'एनडीए' येथे चांगल्या स्थितीत आहे. तिरहुतमध्ये विधानसभेच्या ६४ जागा आहेत. त्यापैकी ३६ 'एनडीए'कडे तर २८ महाआघाडीकडे आहेत. मिथिलामधील ४६ जागांपैकी ३० 'एनडीए'कडे तर १५ महाआघाडीकडे आहेत. २०२० च्या विधानसभा निवडणुकीमध्ये पहिल्या टप्प्यात मतदान झालेल्या १२१ पैकी 'एनडीए'कडे ५९ तर महाआघाडीकडे ६१ जागा होत्या. दुसऱ्या टप्प्यातील १२२ पैकी 'एनडीए'कडे ६६ आणि महाआघाडीकडे ४९ जागा होत्या. या वेळी मात्र महाआघाडीचे गड विभागले गेले आहेत. दुसऱ्या टप्प्यात मगध आणि शहाबादच्या अरवल, औरंगाबाद, गया, जहानाबाद आणि नवादा, कैमूर आणि रोहतास येथे मतदान होईल.

येथे पहिल्या टप्प्यामध्ये बक्सर, भोजपूर, नालंदा आणि पाटणा विभागात मतदान होईल. सारण आणि तिरहुतमध्येही असेच उपाय करण्यात आले आहेत. बिहारचा नकाशा पाहिल्यास पहिल्या टप्प्यात मध्यबिहारचे जिल्हे समाविष्ट करण्यात आले आहेत. दुसऱ्या टप्प्यात सीमावर्ती जिल्हे समाविष्ट करण्यात आले आहेत. बिहारमधील आठ जिल्हे नेपाळला लागून आहेत, तीन जिल्हे पश्चिम बंगालला लागून आहेत आणि इतर आठ जिल्हे उत्तर प्रदेशला लागून आहेत. दुसऱ्या टप्प्यात येथे एकाच वेळी मतदान होईल. यामुळे निमलष्करी दल आणि निवडणुक पथकांची हालचाल सुलभ होईल.

दुसऱ्या टप्प्यासाठी निवडणुक पथकांना सहज पोहोचणे शक्य होईल. सीमांचल प्रदेश पश्चिम बंगाल तसेच बांगलादेशला लागून आहे. भाजप येथे घुसखोरीला मुद्दा बनवत आहे. म्हणूनच हा परिसर संवेदनशील मानला जातो. झारखंडच्या सीमेवर असलेले बिहारमधील जमुई, बांका आणि नवादा हे भाग नक्षलवादी हालचालींमुळे संवेदनशील मानले जातात. त्यामुळे येथे अधिक सुरक्षा व्यवस्था आवश्यक असेल. बिहारमध्ये मतदान केंद्रांवर होणाऱ्या हिंसाचार आणि गोंधळामुळे निवडणुका अधिक टप्प्यात घेतल्या जात होत्या. आता निमलष्करी दलांच्या आगमनाने यावर नियंत्रण आले आहे. निवडणुका दोन टप्प्यांमध्ये असल्यामुळे बिहारला निमलष्करी दलांच्या ८० ते १०० कंपन्यांची आवश्यकता असेल. सध्या देशात कुठेही निवडणुका होत नसल्यामुळे ही ताकद सहज मिळू शकते. एका कंपनीत ८० ते ८५ सैनिक असतात.

आचारसंहितेच्या कालावधीत राज्यातील सरकारी कामे थांबतात. लोकांवर याचा थेट परिणाम होतो. निवडणूक प्रक्रिया कमी केल्याने खर्च कमी होईल आणि कामावर परिणाम होण्याचे दिवस कमी होतील. 'सोशल मीडिया'च्या युगात, द्वेषपूर्ण भाषण आणि बनावट बातम्यांशी लढणे निवडणूक आयोगासाठी आव्हानात्मक आहे. कमी कालावधीमध्ये निवडणुका घेतल्याने हे कामदेखील सोपे झाले आहे. सरकार गेल्या तीन महिन्यांपासून निवडणुकीचे वातावरण अनुभवत आहे. नितीशकुमार सरकारने शेतकरी, विद्यार्थी, तरुण आणि महिलांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी पहिल्यांदाच मोफत योजनादेखील लागू केल्या आहेत. सरकार इतके सक्रिय होते, की विरोधकांनी उपस्थित केलेले कोणतेही मुद्दे ते अंमलात आणत होते.

सत्ताधारी पक्षाच्या बाजूने मुख्यमंत्री आणि पंतप्रधान आणि विरोधी पक्षाच्या बाजूने तेजस्वी यादव गेल्या सहा महिन्यांपासून सतत सक्रिय आहेत. सतत प्रवास करत असून सभा घेत आहेत. निवडणुकीची घोषणा झाली त्याच दिवशी पाटणामध्ये मेट्रोचे उद्घाटन झाले. या वेळी प्रचारात कोणीही कमकुवत दिसत नाही. मोठ्या पक्षांना निवडणुकीच्या कमी टप्प्यांचा फायदा होतो. त्यांच्याकडे जास्त संसाधने असतात. ते याचा फायदा घेतात. प्रेक्षकांपर्यंत पोहोचतात. कमी टप्प्यांमध्ये मतदान केल्याने लहान पक्षांना नुकसान होते. लोकसभा निवडणुकीदरम्यान तेजस्वी यादव यांनी एकट्याने २५० हून अधिक सभा घेतल्या.

उत्तम साधनसंपत्ती राखून असणाऱ्यांना टप्प्यांची संख्या जास्त असली तरी अडचणी येत नाहीत. अर्थात तिकीट वाटपानंतर अनेक नेते पक्ष बदलतात. टप्प्यांची संख्या कमी केल्याने या वेळी बंडखोरांना कमी संधी मिळेल. **

---

# कंत्राटी कर्मचाऱ्यांचा विचार कधी करणार?

**प्रमोद जाधव**

अपुऱ्या मनुष्यबळामुळे शासनाने कंत्राटी कर्मचारी भरती केली. ग्रामीण व शहरी भागातील अनेकांना रोजगाराचे साधन खुले झाले. मात्र, त्यांचा मानधनाचा प्रश्न कायमच चर्चेचा विषय बनला आहे. शासनाच्या सर्व योजनांची अंमलबजावणी प्रामाणिकपणे करतात. मात्र, त्यांच्या मानधनाचा विषय आल्यावर प्रशासन हात वर करण्याची भूमिका करीत आले आहेत. दिवाळीचा सण सुरू झाला आहे. मात्र, आजही एनआरएचएम अंतर्गत काम करणारे कर्मचारी व आशा सेविका मानधनापासून वंचित आहेत. तळागाळापर्यंत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा विचार कधी करणार, असा सवाल जनमानसातून उपस्थित केला जात आहे. रायगड जिल्ह्यात ६१० हून अधिक कर्मचारी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्य विभागात सेवा देत आहेत. नियमितीकरणाबरोबरच मानधन वाढ, लॉयल्टी बोनस, भविष्यनिर्वाह निधी, विमा सुविधा, बदली धोरण यांसारख्या महत्त्वाच्या मागण्या प्रलंबित आहेत.

आरोग्य सेवेत काम करणारे कर्मचारी जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या दवाखान्यांमध्ये आरोग्य सेवा पुरविण्याचे काम करतात. आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी त्यांचा प्रयत्न कायमच राहिला आहे. रुग्णांच्या तपासणीसह शासनाच्या सर्व आरोग्यविषयक योजना शेवटच्या घटकांपर्यंत पोहचविण्याचे काम करतात.

ग्रामीण भागात तळागाळापर्यंत आशा सेविका काम करतात. कोरोना काळात जीवाची पर्वा न करता, त्यांनी घरोघरी काम केले. शेवटच्या घटकांपर्यंत शासनाच्या योजना पोहोचविण्याबरोबरच आपत्कालीन परिस्थितीत रात्रीचा दिवस करून काम करणाऱ्या आशा सेविका आर्थिक संकटात सापडल्या आहेत. जून महिन्यापासून त्यांना शासनाकडून मानधनच मिळाले नाही. त्यांची पिळवणूक केली जात आहे. ही मोठी गंभीर बाब आहे. अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे शासन शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचण्यास अपयशी ठरत असल्याने शासनाने ग्रामीण भागात स्थानिक महिलांची मदत घेण्यास सुरुवात केली. त्यासाठी आशा सेविका पद नियुक्त करण्यात आले. रायगड जिल्ह्यामध्ये एक हजार ८०० हून अधिक आशा सेविका आहे. आशा सेविकांच्या मदतीने शासनाच्या योजना घराघरात पोहचविणे, आपत्कालीन परिस्थितीत मदतीचा हात देणे, माता, बाल मृत्यूचे प्रमाण टाळणे, बालक व मातेचे आरोग्य राखण्याबरोबरच जन्म, मृत्यूची नोंद ठेवणे, बालकांसह मातांचे लसीकरण करणे. गावांतील प्रसूत महिलेला दवाखान्यात नेण्यापासून त्यांचे आरोग्य राखण्यासाठी सहकार्य करण्याचे काम आशा सेविका करता. कुष्ठरोग व इतर साथीच्या आजारांवर उपाय करण्यासाठी अंमलबजावणी करणे. जनजागृती करणे अशा अनेक प्रकारची कामे आशा सेविका करतात. आयुष्यमान, आभाकार्ड काढण्यासाठी गावागावात प्रचार व प्रसार करण्याचे कामही आशा सेविका करीत असतात. ग्रामीण भागात आशा सेविका कष्टाचे काम करत असताना त्यांना प्रचंड त्रास होतो. त्यांच्यावर शासनाकडून अन्याय केला जात आहे. ही मोठी गंभीर बाब आहे. कुष्ठरोग व इतर साथीच्या आजारांवर उपाय करण्यासाठी अंमलबजावणी करणे. जनजागृती करणे अशा अनेक प्रकारची कामे आशा सेविका करतात. आयुष्यमान, आभाकार्ड काढण्यासाठी गावागावात प्रचार व प्रसार करण्याचे कामही आशा सेविका करीत असतात. राज्य शासनासह केंद्र शासनाच्या योजनांची कामे आशा सेविकांमार्फत केली जातात. केंद्राचे काम केल्यास राज्य शासनाकडून त्यांना दर महिन्याला मानधन दिले जाते. परंतु गेल्या जून महिन्यापासून आशा सेविकांना मानधनच देण्यास सरकार उदासीन ठरले आहे. केंद्राकडून जून ते सप्टेंबरपर्यंतचे मानधन थकले आहे. राज्याकडून ऑगस्ट ते सप्टेंबर या दोन महिन्यांचे मानधन देण्यात आले नाही. मानधन वेळेवर मिळत नसल्याने आशा सेविकांसमोर आर्थिक समस्या निर्माण झाली आहे. शासनाच्या सर्व योजनांची कामे त्यांच्याकडून करून घेतल्या जातात. परंतु, त्यांना शासनाचा दर्जा दिला जात नाही. ऑनलाईन कामे आशा सेविकांकडून करून घेतले जातात. परंतु, लागणारी यंत्रणा, पुरेसा रिचार्ज भत्ता दिला जात नाही. गणेशोत्साबरोबरच नवरात्रौत्सव सण मानधनाविनाच गेला. नियमित कर्मचाऱ्यांच्या बरोबरीने काम करणारे एनआरएचएम अंतर्गत येणारे कर्मचारी तसेच आशा सेविका यांच्या मानधनाचा प्रश्न गंभीर होत आहे. तीन ते चार महिने त्यांना मानधन दिला जात नाही. दिवाळी सण सुरु झाला आहे. परंतु, त्यांच्या मानधनाचा प्रश्न कधी सुटणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे. ऐन सणासुदीमध्ये मानधनाविना दिवाळी साजरी करण्याची वेळ कंत्राटी कर्मचाऱ्यांवर येणार आहे. त्यामुळे शासनाने त्यांचा विचार करावा, अशी मागणी होत आहे.

---

**लोकसंसद**

## सोन्यापाठोपाठ चांदीनेही गाठले उच्चांक!

एकीकडे सोन्याचे दर प्रचंड उसळी मारत असतानाच चांदीनेही आपण यात मागे नसल्याचे दाखवून दिले आहे. मुंबईत चांदीचा भाव प्रतिकिलो १ लाख ९० हजारावर पोहोचला असून तिकडे चेन्नईच्या बाजारात चांदीने प्रतिकिलो दोन लाख रुपयांचा ऐतिहासिक टप्पा ओलांडला आणि चांदीचा भाव प्रतिकिलो २ लाख ६ हजार रुपयांवर जाऊन पोहोचला. या वर्षाच्या सुरुवातीला जानेवारी महिन्यात देशात एक किलो चांदीचा दर ९० हजार रुपयांच्या आसपास होता. तो अवघ्या १० महिन्यात चक्क दुपटीहून अधिक वाढला आहे. विशेष म्हणजे १ सप्टेंबरला १ लाख २६ हजार रुपये प्रतिकिलो असलेला चांदीचा दर अवघ्या दीड महिन्यात ६५ हजारांनी वाढला. चांदीची मागणी वाढण्याची अनेक कारणे आहेत. सौर ऊर्जा, इलेक्ट्रिक व्हेईकल्स आणि मेडिकल उपकरणे यामध्येही चांदीचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. शिवाय स्मार्टफोन, सेमीकंडक्टर व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांमध्ये चांदीचा उपयोग केला जातो. त्यातच मागणी जास्त असताना चांदीचा पुरवठा खूप कमी आहे. त्यामुळे चांदीचे दर वाढत आहेत. सोन्याचे दर आवाक्याबाहेर गेल्यामुळे अनेक ग्राहक चांदीची नाणी आणि भांड्यांच्या खरेदीकडे वळले. मात्र सणासुदीच्या काळात चांदीचेही दर गगनाला भिडल्याने सर्व सामान्य ग्राहकांच्या चिंतेत भर पडली आहे.

**–प्रदीप अनुसया शंकर मोरे**

## दिवाळीचा उत्साह अभूतपूर्व..

यंदा देशाच्या काही राज्यांसह महाराष्ट्रात ढगफुटीसारख्या पावसाने सर्वत्र हजेरी लावत शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले हातातोंडाशी आलेली पिके नष्ट झाली तर रौद्ररुप धारण करुन अनेक नद्यांना महापूर आणला त्यामूळे नदीकाठची गावे उद्वस्त झाली आहेत काही ठिकाणी जिवीतहानी तर कुठे वित्तहानी झाली आहे दिवाळी सण मोठा, नाही आनंदाला तोटा या उक्तीप्रमाणे हा सण संपूर्ण विशेषतः महाराष्ट्रात मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरा केला जातो पण यंदाची दिवाळी साधेपणाने साजरी करून जे लोक पूरग्रस्त आहेत त्यांना आर्थिक सहकार्य करुन नव्या संसारासाठी नवी दिशा देणे अपेक्षित आहे आपापल्या परीने जे शक्य आहे ते साह्य करुन त्यांना आशेचा किरण दाखववा म्हणजे खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली असे वाटेल !

**राजू जाधव, मांगूर**

---

**दिनविशेष**

# धनाची पेटी! घरी देवी लक्ष्मीचा वास

दरवर्षी आश्विन महिन्यातील कृष्ण पक्षाच्या तेराव्या तिथीला धनत्रयोदशी साजरी केली जाते. यंदा धनत्रयोदशी १८ ऑक्टोबर २०२५ रोजी साजरी केली जाईल. हा दिवस आश्विन महिन्यातील सर्वात मोठा सण दिवाळीच्या पाच दिवसांच्या सणाची सुरुवात आहे. असे मानले जाते की हा दिवस घरात आनंद, समृद्धी आणि संपत्ती आणतो. या दिवशी काही वस्तू खरेदी करणे विशेषतः शुभ मानले जाते. धनत्रयोदशीच्या दिवशी माता लक्ष्मी आणि कुबेर यांची पूजा केली जाते. खरं तर कित्येकशे वर्षांपूर्वी, जेव्हा देव आणि दानवांच्या युद्धात देव हरले तेव्हा समुद्रमंथन झाले. मंथन दरम्यान बरेच काही बाहेर आले जे आपापसात वाटले गेले. नंतर भगवान धन्वंतरीजी हातात अमृताचे भांडे घेऊन बाहेर पडले. त्यांच्या दुसऱ्या हातात आयुर्वेदशास्त्र होते. दानव आणि देव दोघेही अमृतासाठी लढू लागले. नंतर भगवान विष्णूने मायेची निर्मिती करून देवांना अमृत पाजले. धनत्रयोदशीशी संबंधित अनेक पौराणिक कथा आहेत.

**पहिली कथा**

एकेकाळी हेम नावाचा राजा होता, त्याला मुलगा झाला. मुलाची कुंडली तयार केली तेव्हा ज्योतिषांनी सांगितले की मुलाचा मृत्यू लग्नानंतर बरोबर चार दिवसांनी होईल. हे ऐकून राजाला खूप वाईट वाटले आणि त्याने राजपुत्राला अशा ठिकाणी पाठवले जिथे त्याला एकही मुलगी दिसणार नाही, पण एकदा एक राजकन्या तिथून निघाली आणि दोघेही एकमेकांना पाहून मोहित झाले आणि त्यांनी गंधर्व विवाह केले.

लग्नानंतर नेमके तेच झाले आणि चार दिवसांनी यमदूत त्या राजपुत्राचा जीव घ्यायला आला. जेव्हा यमदूत त्याला घेऊन जात होते तेव्हा त्याच्या पत्नीने खूप आक्रोश केला, पण यमदूतांना त्यांचे काम करावे लागले. नवविवाहित वधूचा विलाप ऐकून यमदूतांनी यमराजांना विनंती केली, हे यमराज अकाली मृत्यूपासून मनुष्याची सुटका होऊ शकेल असा कोणताही उपाय सांगा. यमदेवता म्हणाले हे दूत, अकाली मृत्यू हे कर्माचे फळ आहे, त्यापासून मुक्त होण्याचा एक सोपा उपाय सांगतो. आश्विन कृष्ण पक्षातील त्रयोदशी रात्री माझ्या नावाने पूजा करून दक्षिण दिशेला दीप अर्पण करणाऱ्याला अकाली मृत्यूची भीती नसणार. यामुळे लोक या दिवशी घराबाहेर दक्षिण दिशेला दिवे लावतात.

**दुसरी कथा**

एकदा लक्ष्मी देवी भगवान विष्णूंसोबत फिरत होत्या. एका ठिकाणी देवाने लक्ष्मींना सांगितले की, मी परत येईपर्यंत इथेच राहा. माता लक्ष्मींचे मन व्याकुळ झाले आणि त्याही भगवान विष्णूंच्या मागे दक्षिणेकडे जाऊ लागल्या. पुढे गेल्यावर मोहरीची शेते आली. शेतात बहरलेली मोहरीची फुले फारच सुंदर दिसत होती. देवी लक्ष्मींनी एक फूल तोडून स्वतःला सजवले आणि जेव्हा त्या उसाच्या शेतात पोहोचल्या तेव्हा त्यांनी उसाच्या रसाळ आणि गोड रसाचा आस्वाद घेतला. तेव्हा भगवान विष्णू तिथे आले आणि माता लक्ष्मींवर कोपले. शेतकऱ्याच्या शेतातून चोरी केल्याचे विष्णूंनी म्हटले आणि आता त्यांना १२ वर्षे शेतकऱ्याची सेवा करावी लागणार आहे असे सांगितले. त्यानंतर आई लक्ष्मी गरीब शेतकऱ्याच्या घरी पोहोचल्या आणि तिथे राहू लागल्या. एके दिवशी देवी लक्ष्मीने शेतकऱ्याच्या पत्नीला महालक्ष्मी मूर्तीची पूजा करण्यास सांगितले. शेतकऱ्याच्या पत्नीनेही तेच केले. असे करताच त्यांचे घर ऐश्वर्याने भरू लागले आणि जीवन सुखी झाले. १२ वर्षे झाली. जेव्हा भगवान विष्णू लक्ष्मीला परत घेण्यासाठी आले तेव्हा शेतकऱ्याने त्यांना देवीला नेण्यास नकार दिला. मग देव म्हणाले की देवी लक्ष्मी कुठेही जास्त काळ राहत नाही, शापामुळे ती १२ वर्षे इथे होत्या, पण शेतकरीला देवी लक्ष्मी परत जावी अशी इच्छा नव्हती. हे ऐकून माता लक्ष्मी म्हणाल्या की जर तुम्हाला मला थांबवायचे असेल तर धनत्रयोदशीच्या दिवशी घराची साफसफाई करा, रात्री तुपाचा दिवा लावा आणि संध्याकाळी पूजा करून तांब्याच्या कलशात नाणी भरून ठेवा. या कारणास्तव दरवर्षी तेरसच्या दिवशी लक्ष्मीजींची पूजा केली जाऊ लागली.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१८ ऑक्टोबर

१) श्रीम.भारती दिनानाथ तरे चेंढरे-अलिबाग, १८-१०-१९३९

२) श्रीम.वसुधा भास्कर भोसले श्रीबाग-२, अलिबाग १८-१०-१९५७

## बोध नाम साधना



पूज्यपाद श्रीआद्य शंकराचार्य म्हणतात हे मूढमते, मरण जवळ आल्यानंतर तुला कोणीही रक्षण करणार नाही म्हणून त्या गोविंदाचे भजन कर. श्रीहरी एकटाच पूर्ण आहे तोच समर्थ आहे. त्याशिवाय बाकीच्या प्रत्येकास मर्यादा आहेत. दगड बांधून इंद्रायणीत बुडविलेले श्री तुकाराम महाराजांचे अभंग चौदाव्या दिवशी न भिजता इंद्रायणीच्या पवित्र जलावर तरंगू लागलेत. भगवंत आपलाच होणे हे दुर्लभ भाग्य आहे. हे भाग्य, एक चित्ताने श्रीहरीचे नामस्मरण केल्यानेच आपणास मिळते.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय आबामहाराज परांजपे साधना आश्रम, दातार आळी, पेण.**

## सुपेगाव आड मार्गावर एसटी बंद

**कोर्लई :** मुरुड आगाराची मुरुड-सुपेगाव-रोहा एसटी बस सकाळी ८-३० वा. सुटते. शुक्रवारी (दि.१७) ही बस उसरोली ते फणसाड वन्यजीव अभयारण्य दरम्यान आड वळणावर ब्रेक डाऊन झाली. त्यामुळे रत्नागिरी, पुणे, मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांचे हाल झाले. रोहा, पुणे व रत्नागिरीकडे जाण्यासाठी मुरुड-सुपेगाव मार्गे रोहा हा जवळचा मार्ग आहे. अनेक प्रवासी या मार्गाने ये-जा करणे पसंत करतात. मुरुड-जंजिरा, फणसाड वन्यजीव अभयारण्य पाहाण्यासाठी याठिकाणी पर्यटकांच्या वाहनांची रेलचेल असते. मात्र शुक्रवारी (दि.१७) सकाळच्या वेळेत रोह्याकडे जाणारी एसटी बस उसरोली ते फणसाड अभयारण्य दरम्यान आड मार्गावर ब्रेक डाऊन झाल्याने प्रवाशांना हाल सहन करावा लागला. दरम्यान, एसटी बस सेवेत ब्रेक डाऊनमुळे प्रवाशांना होणारा त्रास लक्षात घेऊन मुरुड आगार प्रमुखांनी या मार्गावर सुस्थितीत व चांगली सेवा उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी प्रवासी वर्गातून केली जात आहे.

# कर्जत तालुका अंधारात

## • चक्रीवादळाने विजेचे खांब कोसळून वीजपुरवठा खंडित

**| नेरळ | प्रतिनिधी |**

**कर्जत तालुक्यात गुरुवारी (दि.१६) सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास चक्रीवादळासोबत मुसळधार पाऊस आला. या वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसाने शेतीचे मोठे नुकसान केले आहे. मात्र सर्वाधिक नुकसान विजेचे खांब कोसळून झाले. तालुक्यात कडाव परिसरात विजेचे खांब कोसळल्याने संपूर्ण कर्जत तालुका अंधारात गेला. सायंकाळी ५ वाजल्यापासून रात्रीपर्यंत कर्जत शहर वगळता अन्य सर्व भागातील वीजपुरवठा खंडित झाला.**





वेधशाळेने जाहीर केल्याप्रमाणे दि.१५ आणि १६ ऑक्टोबर रोजी वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता १५ ऑक्टोबर रोजी काही प्रमाणात खरी ठरली होती. तर गुरुवारी काही ठिकाणी तुरळक पाऊस पडला. मात्र, कर्जत तालुक्याच्या कशेळे, कडाव, खांडस या भागाला पावसाने अक्षरशः झोडपले. सायंकाळी ५ वाजता वादळी वाऱ्यासह पाऊस आणि कडाव परिसरात चक्रीवादळासारखी परिस्थिती निर्माण झाली. या वादळाने कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांचे काढणीला आलेल्या भाताच्या शेतीचे मोठे नुकसान केले आहे. तर, कडाव परिसरात आलेल्या वादळाने तेथील कळंबोली उप केंद्रातून तालुक्याच्या सर्व भागात जाणाऱ्या वीजपुरवठ्यावर परिणाम झाला. त्या भागात असंख्य विजेच्या खांबांवर झाडे कोसळली. त्यामुळे अनेक विजेचे खांब जमिनीवर पडून कळंबोली येथील वीज उपकेंद्रातून तालुक्याच्या सर्व भागात जाणारा वीजपुरवठा खंडित झाला.

कळंबोली येथील उप केंद्रातून कर्जत शहर, नेरळ, माथेरान, कळंब, कशेळे या उपकेंद्रला वीज पुरवली जाते. त्यात कर्जत शहराला खोपोलीकडून देखील वीजपुरवठा होत असतो. या वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसाने महावितरण कंपनीचे लाखोंचे नुकसान केले आहे.

असंख्य झाडे विजेच्या तारांवर कोसळली असल्याने वीजपुरवठा बंद झाला. कर्जत शहराचा वीजपुरवठा सुरळीत झाला असून तालुक्याच्या अन्य कंपोनंट भागात ५ वाजल्यापासून वीज नव्हती. महावितरणचे कार्यकारी अभियंता शिंदे तसेच उप अभियंता चंद्रकांत केंद्रे आणि तालुक्यातील सर्व सहायक अभियंता यांनी वीजपुरवठा सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरु केले. मात्र, रात्रीची वेळ असल्याने वीजपुरवठा सुरळीत करण्यात अडचणी येत असल्याची माहिती महावितरणकडून रात्री ८ वाजता देण्यात आली होती.

# ममदापुरात रस्त्याचे काँक्रिटीकरण सुरु

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील नेरळ, कोल्हारे आणि ममदापूर या तीन ग्रामपंचायतीमध्ये नेरळ विकास संकुल प्राधिकरणाच्या माध्यमातून विकासकामे केली जात आहेत. यात यावर्षी पावसाळ्यात गुडघाभर पाण्यातून वाट काढावी लागलेल्या ममदापूर गावातील ग्रामस्थांसाठी नेरळ विकास प्राधिकरणाकडून ५० लाखाचा निधी प्राप्त झाला आहे. दरम्यान नेरळ-ममदापूर-भडवळ रस्त्यावरील तुलसी कार्यालय ते गावाचे प्रवेशद्वार या भागातील रस्ता काँक्रिटीकरण करण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे.



नेरळ विकास प्राधिकरणमधील ममदापूर गावामध्ये जाणारा रस्ता बिल्डरकडून करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामांमुळे रस्त्यात गुडघाभर पाणी साचत हाते. चुकीच्या नियोजनामुळे रस्ता पाण्यात बुडाला होता. त्याबाबत समाज माध्यमांनी नेरळ विकास प्राधिकरणाच्या कामाचे वाभाडे काढले होते. त्यानंतर प्राधिकरणाने त्या भागातील पाण्याचा बंद करणाऱ्या बिल्डरचे धाबे दणाणून सोडत तेथून काढलेली पाईप मोरी पुन्हा तेथे टाकली. त्यांनतर ममदापूर ग्रामस्थांना आपल्या घरी चिखलमय रस्त्याने जाण्याचा त्रास थांबला होता. आता तर नेरळ विकास प्राधिकरणाकडून नेरळ-भडवळ या रस्त्यावरील ममदापूर गावाला जोडणारा रस्ता बनावीन्यस्तही निविदा काढली आहे. ममदापुर गावात प्रवेशदराने ते तुलसी कार्यालय या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्याचे काम मंजूर झाले आहे. सात मीटर रुंदीचा हा रस्ता असणार आहे.त्यासाठी साधारण ५० लाख रुपये मंजूर झाले आहेत.

## कोमसापतर्फे दीपसंध्या कार्यक्रमाचे आयोजन

**श्रीवर्धन :** कोकण मराठी साहित्य परिषद, श्रीवर्धन शाखेतर्फे दिवाळी पाडव्याच्या दिवशी म्हणजे बुधवारी (दि.२२) सायं. ७ वा. श्री दत्त मंदिर सभागृह, श्रीवर्धन येथे दीपसंध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात गंगाधर साळवी, संध्या दिवकर, प्रणय इंगळे, सिद्धेश लखमदे इ. साहित्यिक सहभागी होणार आहेत. तर हेमंत बारटक्के हे या कार्यक्रमाचे सुसंवादक आहेत. याच कार्यक्रमात को.म.सा.प. रायगडचे नूतन अध्यक्ष संजय गुंजाळ यांचा सत्कारही आयोजित करण्यात आला आहे.

## किंमत तुमची, कंदील आमचा; मनसेचा अनोखा दिवाळी उपक्रम

**| पनवेल | प्रतिनिधी |**

दिवाळीनिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेना, खांदा कॉलनी विभागातर्फे नागरिकांसाठी किंमत तुमची, कंदील आमचा हा आगळावेगळा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत नागरिकांना त्यांच्या योग्य वाटणाऱ्या किंमतीत कंदील उपलब्ध करून देण्यात आले. विशेष म्हणजे, नागरिकांनी स्वेच्छेने दिलेल्या निधीतून मनसेतर्फे गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे.

या उपक्रमाला स्थानिक नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. समाजातील विविध घटकांनी मनसेच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले आहे. या उपक्रमाचे आयोजन मनसे उपशहराध्यक्ष संदीप जाधव, ॲड. संतोष सरगर, मनसे विभागाध्यक्ष सिद्धेश जाधव यांनी केले.

यावेळी मनसे शहर सचिव पराग बालड, मनसे विभागाध्यक्ष श्याम, मनसे शाखाध्यक्ष संदीप काशीद तसेच आयुष पाटील, खालील चिटणीस, अभिजीत निकम, तुषार पवार, मनीष चितळे उपस्थित होते. या उपक्रमातून मनसेने दिवाळीच्या प्रकाशात समाजसेवेची नवी ज्योत पेटवली आहे.

## कळंब शाळेत इंग्लिश रिडींग, स्पिकिंग कोर्स

**| नेरळ | प्रतिनिधी |**

राजिप शाळा कळंब मराठी येथे विद्यार्थ्यांच्या इंग्रजी वाचन आणि स्पिकिंग वृद्धीसाठी विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. पीएम श्री केंद्र शाळा असलेलया कळंब शाळेत सेमी इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु असून विद्यार्थ्यांचा वर्गाला मिळाला.

कळंब येथील रायगड जिल्हा परिषदेच्या पीएम श्री शाळेमध्ये विद्यार्थ्यांनासाठी इंग्रजी भाषा वाचन आणि स्पिकिंग कोर्स आयोजित करण्यात आला होता. इंग्रजी भाषेची भीती कमी व्हावी, तसेच बोली भाषा म्हणून इंग्रजी भाषा सराईतपणे बोलता यावी, या उद्देशाने महाराष्ट्र शासन पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाच्या माध्यामातून हा वर्ग घेण्यात आला. पाठ्यपुस्तक मंडळाचे इंग्रजी विषयासाठी निमंत्रित सदस्य असलेल्या संतोष नाटीकर यांनी विद्यार्थ्यांना अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात विविध प्रकारे इंग्रजी भाषा सोपी करून सांगण्याचा प्रयत्न केला. या उपक्रमात कळंब येथील जिल्हा परिषद शाळेचे २०० विद्यार्थी सहभागी झाले होते. या दरम्यान खाद्याचा पाडा येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिक करून दाखविले. या शिबिरात कळंब शाळेतील विद्यार्थी, वर्गशिक्षक, किशोर पाटील, जितेंद्र रोठ, हुमेरा दुर्राणी, सुनीता यंदे यांनी सहभाग घेतला.



# आदिवासी कुटुंबाला एक हात मदतीचा

### महाड पत्रकार संघाचा स्तुत्य उपक्रम

**| महाड | प्रतिनिधी |**

महाड पत्रकार संघाच्यावतीने दरवर्षी समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून महाड तालुक्यातील बिरवाडी विभागातील शिवथर घळई आदिवासीवाडी येथे गृहोपयोगी साहित्य वाटप कार्यक्रम बुधवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी पत्रकार संघाचे अध्यक्ष उदय सावंत यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. यावेळी सर्व आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी शिवथर घळईचे उपसरपंच किशोर भोसले, समीर पवार, शिवसेना उपतालुकाप्रमुख किशोर भोसले व सर्व आदिवासी बांधव उपस्थित होते.



कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी महाड पत्रकार संघाचे अध्यक्ष उदय सावंत, उपाध्यक्ष महेश शिंदे, सचिव रोहित पाटील, पत्रकार संघाचे ज्येष्ठ सदस्य श्रीकांत सहस्त्रबुद्धे, खजिनदार मिलिंद माने, सल्लागार तुकाराम साळुंखे, किशोर किरवे, उपखजिनदार सुधीर सोनार, प्रसिद्धी प्रमुख नितेश लोखंडे, कार्याध्यक्ष निलेश लोखंडे इत्यादी हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी मेहनत घेतली.

## दिवाळीच्या खरेदीसाठी बाजारात गर्दी

**| खांब | प्रतिनिधी |**

भारतीय संस्कृतीला विविध प्रकारचे सण उत्सवाची मोठी परंपरा लाभली आहे. त्यातच दिपावली सण देखील खुप मोठा असल्याने या सणामध्ये वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, दिवाळी पाडवा, भाऊबीज असे प्रत्येक दिवसाचे वेगवेगळे दिनविशेष आहेत. त्यामुळे दिपावली या सणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. समाजातील सर्वच वर्गामध्ये हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत असल्याने दिपावली सणासाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी बाजारात मोठीच गर्दी दिसून येत आहे. कपड्यांची दुकाने, किराणा व्यापारी, भांड्याची दुकाने, कटलरी सामान, स्विटवाले, फटाक्यांचे स्टॉल आदी दुकानात मोठी गर्दी होऊ लागली आहे.

तसेच, ग्राहकवर्गाच्या वाढत्या गर्दीमुळे व्यापारी वर्गामध्येही उत्साह दिसून येत आहे. वाढत्या महागाईमुळे बाजारात काही वस्तूंचे दर जरी वाढले असले, तरी ग्राहकवर्गाचा उत्साह मात्र कायम आहे.

**साहित्य खरेदीसाठी ग्राहकांची मोठी गर्दी | फॅन्सी कंदील, पणत्या, रांगोळ्यांचे विविध स्टॉल्स**

# चिपळूण बाजारपेठ दिवाळी सणानिमित्त सजली

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या दिवाळी सणानिमित्त चिपळूण शहर बाजारपेठ दिवाळी साहित्याच्या स्टॉलनी पूर्णपणे गजबजली आहे. यात फॅन्सी आकाश कंदील तसेच पणत्या, गडकिल्ले, रंगीबेरंगी रांगोळ्या खरेदीसाठी गर्दी होऊ लागली आहे. विशेष म्हणजे यंदा फ्रेम कंदील अधिक पसंतीस उतरू लागला असून यात अनेक वर्षाची परंपरा असलेला चांदणी कंदील मात्र यामधून लुप्त झाला आहे. साहित्याच्या दरात मागील वर्षीच्या तुलनेत वाढ झाल्याचे दिसून येत आहे. लख्ख प्रकाशाने आसमंत उजळून टाकणारा दिवाळी सण काही दिवसांवर आला असताना हा सण साजरा करण्यासाठीचे नियोजन प्रत्येक घराघरात होऊ लागले आहे.



यावर्षी शुक्रवारी वसुबारस, सोमवारी नरक चतुर्दशी, मंगळवारी लक्ष्मीपूजन, बुधवारी बलिप्रतिपदा, गुरुवारी भाऊबीज साजरी केली जाणार आहे. विशेष म्हणजे दिवाळी सणाची चाहूल लागताच शहर बाजारपेठेतील व्यावसायिकांनी दिवाळी सणासाठी लागणाऱ्या साहित्याच्या स्टॉल्सची काही दिवसांपासूनच मांडणी करण्यास सुरुवात केली होती. तसे पाहिल्यास स्थानिक व्यावसायिक दिवाळीसाठी लागणाऱ्या वस्तू या पुणे, मुंबई, कोल्हापूर ठिकाणाहून खरेदी करुन विक्रीसाठी येथे आणतात.

### गड किल्ल्यांवर मावळे सज्ज

दिवाळी सणानिमित अनेक वीरगड मातीचे गडकिल्ले बांधण्याची परंपरा दगड-मातीचे गड किल्ले बांधून ही परंपरा जपली जात आहे. सद्यः स्थितीत शाळा, महाविद्यालयान परीक्षा सुरू असून त्या संपताच किल्ले बांधणीच्या कामाला सुरुवात होणार आहे. या बांधलेल्या किल्ल्यावर पहारा देण्यासाठी बाजारपेठेत शाडूच्या मातीपासून बनवलेले मावळे, तोफा, तर शिवाजी महाराजांचे पुतळे देखील विक्रीसाठी दाखल झाले आहे.

### तयार किल्लेदेखील विक्रीला

यात शाडूच्या मातीपासूनचा तयार किल्ल्यांचादेखील समावेश आहे. मावळे २० रुपये, तर किल्ले अगदी ५००, ६०० रुपयांत विकले जात आहेत. अनेक किल्ले विक्रीसाठी दाखल झाले आहे.

## निवडक

### पथनाट्यातून राष्ट्रीय पोषण माह साजरा



**माणगाव :** एकात्मिक बालविकास सेवा योजना माणगाव अंतर्गत बीट-इंदापूर-२ यांच्यामार्फत पेणतर्फे तळे येथे आठवा राष्ट्रीय पोषण माह सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. पोषण माह सप्ताह अंतर्गत पेणतर्फे तळे गावात महिला, किशोरवयीन मुली, अंगणवाडी सेविका, मदतनीस, शालेय विद्यार्थी यांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला. यावेळी फळे, फुले, पालेभाज्या यांची सजावट करुन पोषण पालखी घेऊन रली काढण्यात आली. यावेळी अंगणवाडी सेविका, मदतनीस, बालकांच्या माता पालकांनी प्रधानमंत्री मातृत्व वंदन व लेक लाडकी योजनेवर आधारीत प्रभावी पथनाट्य सादर करुन जनजागृती केली. पुढच्या सत्रात पोषण माह कार्यक्रमांतर्गत अंगणवाडी सेविका, मदतनीसांनी आहार प्रात्यक्षिकांची मांडणी करुन सर्व किशोरवयीन मुली, गरोदर माता, स्तनदा मातांना आहाराचे महत्व स्पष्ट केले. यावेळी माणगाव तालुका बालविकास प्रकल्प अधिकारी अस्मिता बिर्जे यांनी आठव्या राष्ट्रीय पोषण महा अभियान, प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजना, लेक लाडकी योजना, पोषण वाटिका इत्यादी बाबत मार्गदर्शन केले.

### दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा



**चिरनेर :** उरण तालुक्यातील को.ए.सो.च्या सेकंडरी स्कूल चिरनेर शाळेच्या १९७६-७७ च्या एसएससी बॅचच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा चिरनेर येथील भास्कर मोकल यांच्या रेवती फार्म हाऊस येथे रविवारी (दि.१२) पार पडला. या स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी ४८ वर्षांनी एकत्र येत, शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी या शालेय सवंगड्यांनी आपल्या जीवन प्रवासातील चांगले वाईट अनुभव देखील एकमेकांसोबत शेअर केले.

### शिरवलीत पोषण जनजागृती उत्साहात



**माणगाव :** एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प माणगाव शिरवली-१ बिटचा ८ वा राष्ट्रीय पोषण माह बुधवारी (दि.१५) उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये लोककला, पथनाट्य, पोषण आहार प्रात्यक्षिक, मुलांची गाणी, गोष्टी, पालेभाज्यांची पोषण परी तयार करून पोषणाचे महत्व सांगण्यात आले. या कार्यक्रमात महिला स्पर्धा कुमारिका व ग्रामस्थ महिला मंडळ यांचा उत्साही सहभाग होता. विविध प्रकारच्या पारंपारिक गीतातून पोषण आहाराचे महत्त्व, बालकांचे आरोग्य तसेच गरोदर माता व बालके यांचे आरोग्य व घ्यावयाची आरोग्यविषयक काळजी याविषयीचे सखोल मार्गदर्शन करण्यात आले. पोषण आहारातून बालकांचे सही पोषण झाले, तर देश रोशन होईल, अशा पद्धतीचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमासाठी विस्तार अधिकारी मधुकर फड, बीट पर्यवेक्षिका सीमा ठाकरे, प्रा. आरोग्य केंद्रातील डॉक्टर, विस्तार अधिकारी, आरोग्य पर्यवेक्षक, आरोग्य सेविका, आशा, सीआरपी, महिला, ग्रामस्थ उपस्थित होते.

### जनार्दन भिलारे पुरस्काराने सन्मानित



**पाली/गोमाशी :** सुधागड तालुक्यातील सिद्धेश्वर शाळेचे पदवीधर शिक्षक जनार्दन भिलारे यांना २०२४-२५ या वर्षाचा रायगड जिल्हा परिषदेचा अत्यंत मानाचा समजला जाणारा पुरस्कार १३ ऑक्टोबर रोजी आर.सी.एफ. कॉलनी कुरूळ, अलिबाग येथे सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सर्वच स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. रायगड जिल्ह्यात निसर्गप्रेमी शिक्षक ओळख असणारे जनार्दन भिलारे यांनी आपल्या सेवेची सुरुवात १६ जून १९९५ रोजी शाळा नागशेत येथे केली. ३० वर्षांच्या शैक्षणिक, सामाजिक, पर्यावरण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल यापूर्वी त्यांना आविष्कार फाउंडेशनचा क्रांतिसूर्य महात्मा फुले, राष्ट्रीय पुरस्कार वितरण समिती बेळगावतर्फे राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.



### शिलाई मशीन व्यवसायाचे प्रशिक्षण

**खांब :** रोहा तालुक्यातील कृषीनिष्ठ बाहे गावामध्ये शिलाई मशीन व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. रेस्टी स्टार स्वयंरोजगार संस्था अलिबाग यांच्या वतीने व बँक ऑफ इंडिया यांच्या सौजन्याने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे रोशन पाटील व अनिता मोरे यांनी या प्रशिक्षण शिबिरात महिलांना सर्वोत्तम मार्गदर्शन केले. सलग चौदा दिवस चाललेल्या या प्रशिक्षण वर्गात बाहे गावातील विविध बचत गटातील एकूण ४० महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून प्रशिक्षणाचा लाभ घेतला. या शिबिरात कापडापासून उशी कव्हर, पेन पाऊच, हात पिशवी, हातरूमाल आदींसह अन्य कापडकाम शिकविले.

# वडघर शाळेत वाचन प्रेरणा दिन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

जाणीव सामाजिक सेवा संस्था आणि रोटरी क्लब ऑफ पनवेल सनराईज यांच्या संयुक्त सहकार्याने जिल्हा परिषद केंद्र शाळा वडघर येथे बुधवारी (दि.१५) जागतिक हात धुवा दिन आणि वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

यावेळी जाणीवचे अध्यक्ष विजय गोरेगावकर यांनी विद्यार्थ्यांना वाचन प्रेरणा दिनाबाबत आणि त्यानिमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमाची माहिती सांगितली. वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने विविध विषयांवरील ३५ पुस्तके शाळेला भेट देण्यात आली. तसेच या कार्यक्रमाच्या निमित्ताने अग्निपंख या दिवंगत भूतपूर्व राष्ट्रपती ए.पी. जे. अब्दुल कलाम यांच्या अग्निपंख या पुस्तकातील काही परिच्छेदांचे शाळेतील विद्यार्थ्यांनी वाचन केले.

जागतिक हात धुवा दिनाच्या निमित्ताने रो. डॉ. विजयकुमार कुलकर्णी यांनी शास्त्रोक्त पद्धतीने हात स्वच्छ कसे आणि का धुवावेत, याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली आणि प्रात्यक्षिक दाखविले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी उत्साहाने स्वतः हात धुण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले.

---

**पनवेल महानगरपालिका,**
**शुद्धीपत्रक**
**दिव्यांग कल्याण विभाग**

मा.अतिरिक्त आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने दिव्यांग कल्याण विभागातील सन २०२५-२०२६ करीता दिव्यांग व्यक्तींना आरोग्य उपचार व पुनर्वसन सेवा राबविण्याबाबत बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहे.

सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जा.क्र.पमपा/दिकवि/७८/२०२५ — **उपायुक्त**
दि.१६/१०/२०२५ — पनवेल महानगरपालिका

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटिसीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे महसूल दप्तरी वर्णन केलेली मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकांकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे योजिले आहे. सदरहू मिळकतीचे मालकी हक्क तपासणी कामी तसेच होणाऱ्या व्यवहारासंबंधी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वडवली, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| मालकाचे नाव. | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे.आर.चौमी.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| संजय गोविंद खरे<br>राजीव गोविंद खरे<br>विद्या मनोज शिवलींग<br>योगेश्वर चंद्रकांत बेडेकर<br>सरीता घननिळ खरे<br>प्रसन्न घननिळ खरे<br>प्रतिमा जितेंद्र केळकर | ३८/२/३/४/५/३ | ला.योग्य. क्षेत्र- ०.२३.३०<br>ला.अयोग्य क्षेत्र- ०.०१.००<br>एकूण क्षेत्र- ०.२४.३० | आकारणी ३.११ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, दान मक्ता, वहिवाट, ताबा देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेख हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक- १६/१०/२०२५

**ॲड. धीरज विठ्ठल ढेरे**
ऑफिस शॉप नंबर - ११, प्लॉट क्रमांक- १९ सी, वैद्यकीय आणि आरोग्य केंद्र पोलॅरिस हॉस्पिटल, जलवायू फेज-२ रोड, सेक्टर २०, खारघर, नवी मुंबई, महाराष्ट्र ४१०२१०.
मोबाईल नंबर - ७९७७८३१६२८/८०८७५५६०७९

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चई, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| २०/५ | एकूण क्षेत्र १-१४-०० हे.आर. | ०.८४ |
| २०/१/ब | एकूण क्षेत्र २-०२-०० हे.आर. यापैकी केसराराम दयाराम माली यांचे मालकीचे खाते क्र.२४९ ज्याचे क्षेत्र ०-८०-०० हे.आर या मिळकतीबाबत | ०.५६ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेउन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही
दिनांक :- १८/१०/२०२५

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं. १४१-बी, हनुमान मंदिर जवळ, मु.पो.कामार्ली, ता.पेण.जि.रायगड पिन नं. ४०२१०७

---

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **अकाऊंटंट पाहिजे.** पात्रता- Bcom, Tally अनुभव- ५ वर्षे ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार २५००० महिना, Contact- 9823585321
- **मुलं, मुली पाहिजेत कामासाठी १० वी १२ वी पास** औषधांच्या एजन्सीमध्ये part time सुद्धा चालेल. वेळ : १०.०० am to ७.०० pm
- **सहारा ट्रॅव्हल्स** अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे. वय २५ ते ४५ संपर्क :९२७०५६०४५६
- **अलिबागमध्ये कळंबादेवी** मंदिर शेजारी नवीन बिल्डिंग पहिल्या मजल्या वरचे सलग दोन गाळे विकणे /भाड्याने देणे आहे. संपर्क ९१४६६८५१००
- **अलिबाग रेवस रोड** (RCF) कंपनीजवळ भाड्याने दोन सेमी फर्निश रुम देणे आहेत. गेस्ट हाऊस अथवा लॉजिंग साठीही चालू शकेल. संपर्क : ७५०७३०१३५१/९२७०४९८०९९
- **अलिबाग, रोहा रोड येथे** मालाड़ेगावी १०-२० गुंठ्याचे संपूर्णतः डेव्हलप केलेले प्लॉट विकणे आहेत. ९८२२२५७९२९/८४०८९३०८१५
- **अलिबाग, किहीम येथे, रिसॉर्टमध्ये** ५०% भागीदार पाहिजे. (₹. २ कोटी ७५ लाख इन्व्हेस्टमेंट) जमीन १७ गुंठे. चार कॉटेज बांधलेली, जागा समुद्रापासून ३०० मीटर आणि गावठाणा जवळ आहे, बस - रिक्षा स्टॅन्ड जवळ आहे. ९८२२२५७९२९/८४०८९३०८१५
- **अलिबाग, चौल येथे** ७२ गुंठे जागा (१६ गुंठे बागायत + ५६ गुंठे शेत जमीन एकत्रित) रिसॉर्टसाठी संपादित केलेली आहे. या जागेमध्ये ५०% भागीदार पाहिजे. जागा मेन रोड आणि मुखरी गणपती मंदिराजवळ आहे. जागेची किंमत रुपये ६.५ कोटी आणि पुढील डेव्हलपमेंट एकत्रित करायची आहे. ९८२२२५७९२९/८४०८९३०८१५

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

---

**तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण, कर्जत यांचे न्यायालयात**
पत्ता: प्रशासकिय भवन, पहिला मजला, पोलिस मैदानाजवळ, कर्जत, ता. कर्जत-४१०२०१

(Tenancy Mannual, Form VIII)
महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम, १९४८ से कलम ३२ पोटकलम (१) या अन्वये द्यावयाची नोटीस

**जाहीर नोटीस**

३२ग दावा क्रमांक : टेनन्सी/एसआर/२०-२०२५

नामदेव गणपत कडू मयत वारस
१. श्री. भारत नामदेव कडू
२. श्री. सुनील नामदेव कडू
३. श्रीम. वंदना नामदेव कडू — अर्जदार
रा. बेंडसे ता. कर्जत जि. रायगड
४. भारती सुरेश सोरखदे
रा. चिखलोली ठाकुर पाडा, आनंद नगर, अंबरनाथ, ता.अंबरनाथ जि. ठाणे ४२१५०५

**विरुध्द**

१. नरहर वासुदेव मेढी
रा. बेंडसे ता. कर्जत जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस तसेच सामनेवाले/प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे बेंडसे, ता. कर्जत, जि. रायगड या जमिन मिळकती संदर्भात ३२ग अन्वये अर्ज दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये दिनांक ०४/०९/२०२५ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर दाव्याची पुढील सुनावणी दिनांक ०६/११/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता तहसिल कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींनी सुनावणीच्या दिवशी तहसिलदार तथा शेतजमिन यांचे न्यायालयात समक्ष आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| तालुक्याचे नाव | गावाचे नाव | भूमापन क्र. (सर्व्हे नं./गट नं) | पोट हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रु. पैसे. |
|---|---|---|---|---|---|
| कर्जत | बेंडसे | १४ | ३/क | ०-४३-९० | २-५५ |

सदरची जाहीर नोटीस आजरोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.
ठिकाण: कर्जत
दिनांक : १६/१०/२०२५

**सही/-**
**तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण कर्जत, रायगड**

---

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

---

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे बोरगांव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालक १) सज्जाद अकबर खान व २) अनदलीब सज्जाद खान यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.
मौजे बोरगांव, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

| सर्व्हे नंबर | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ७३ | ४अ | १-१०-०० हे. आर पैकी विकत देणार यांचे मालकीचे ०-८८-०० हे. आर पैकी ०-४४-०० हे. आर | ०-८७ |

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि.१८/१०/२०२५.

**ॲड. सतीश धर्मा डायरे,**
पत्ता-००२, शिवतीर्थ, सहयोग को.ऑ.हौ.सो.ब्राह्मण आळी, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड. मो.९८५०४०२६५७.

---

**जाहीर नोटीस**

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक श्री. विलास दशरथ राऊत व श्री. शरद जयराम म्हात्रे यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क्र .व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे नांदगाव, | १६३/३ | ०.९६.५० | ०.५५ |
| ता. कर्जत, | १६४/३ | ०.७६.०० | ०.४५ |
| जि. रायगड | १६२/२ | १.५४.०० | १.२० |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांकः १८/१०/२०२५

**ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु.पो.चिंचवळी ता.कर्जत जि. रायगड
मो. नं. ९०४९४८६८०५

---

**तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण, कर्जत यांचे न्यायालयात**
पत्ता: प्रशासकिय भवन, पहिला मजला, पोलिस मैदानाजवळ, कर्जत, ता. कर्जत-४१०२०१

(Tenancy Mannual, Form VIII)
महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम, १९४८ से कलम ३२ पोटकलम (१) या अन्वये द्यावयाची नोटीस

**जाहीर नोटीस**

३२ग दावा क्रमांक : टेनन्सी/एसआर/१९-२०२५

१. श्री. गोविंद गणपत कडू — अर्जदार
रा. बेंडसे, ता.कर्जत, जि.रायगड
२. नरहर वासुदेव मेढी — सामनेवाले
रा.बेंडसे ता. कर्जत, जि. रायगड

तमाम जनतेस तसेच सामनेवाले/प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे बेंडसे, ता. कर्जत, जि. रायगड या जमिन मिळकती संदर्भात ३२ग अन्वये अर्ज दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये दिनांक ०४/०९/२०२५ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर दाव्याची पुढील सुनावणी दिनांक ०६/११/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता तहसिल कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींनी सुनावणीच्या दिवशी तहसिलदार तथा शेतजमिन यांचे न्यायालयात समक्ष आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| तालुक्याचे नाव | गावाचे नाव | भूमापन क्र. (सर्व्हे नं./गट नं) | पोट हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रु. पैसे. |
|---|---|---|---|---|---|
| कर्जत | बेंडसे | १४ | ३/ब | ०-४२-८० | २-५५ |

सदरची जाहीर नोटीस आजरोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.
ठिकाण: कर्जत
दिनांक : १६/१०/२०२५

**सही/-**
**तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण कर्जत, रायगड**

---

**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.मनोहर प्रभाकर पिंपरकर, रा आंबिवली, पेठ, ता.कर्जत, जि.रायगड, ४१०२०१, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे मेचकरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत .**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ. ) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ५६/४ | ०.१३.००<br>पो.ख. ०.०१.०० | ०.१० | श्री. शैलेंद्र मोहन पाटील व श्री. रामदास किसन महारनवर. |
| ५६/५ | ०.१२.००<br>पो.ख. ०.०१.०० | ०.२० | श्री. शैलेंद्र मोहन पाटील व श्री. रामदास किसन महारनवर |
| ५६/७ | १.१०.००<br>पो.ख. ०.३६.०० | ०.६० | श्री. शैलेंद्र मोहन पाटील व श्री. रामदास किसन महारनवर |
| | एकुण १.७३.०० | | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या २१ (एकवीस) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १८/१०/२०२५.

सही/-
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास, नानामास्तर नगर, मुद्रे.
मो. नं. ७३८५००४८०६.

---

## जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीन मिळकत संदर्भित जमीन मिळकतीचे विद्यमान मालक सौ.खुशबू दत्ता यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली असून त्या आशयाचा साठेकरार देखील माझे अशील व विद्यमान जमीनमालक यांच्या दरम्यान स्वाक्षरीत झालेला आहे. संदर्भित जमीनमिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असूनदेखील संदर्भित जमीनमिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत, करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीन मिळकतीचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**- संदर्भित जमीनमिळकतीचे परिशिष्ट :-**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| झिराड, ता.अलिबाग, जि.रायगड. | ४८२ | ०-२६-०५ | ३.३६ |

अलिबाग,
दिनांक :१८/१०/२०२५.

**राजेंद्र दा. पाटील,**
ॲडव्होकेट,
कृष्णवंदन-२. ब्राम्हणआळी, कन्याशाळेसमोर, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड,
मो.९८२२५२८९३१, ईमेल-adv.rdpatil@gmail.com.

---

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यांचे मालमत्ता पत्रक/७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून आमचे अशिल अजय इंगळे यांनी कायमचे विकसनासाठी घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या विकसनाच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचाही हरकत न आल्यास आमचे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकत मालकाबरोबर आपला विकसनाचा व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मौजे :- गुंडगे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत :-**

| मालकांचे नाव | नगर भूमापन क्रं | क्षेत्र : चौ. मीटर | धारणाधिकार |
|---|---|---|---|
| मिलिंद रामभाऊ भोईर | ३३० | ३९० चौ.मी | क |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता: सदनिका क्रं. १०८, पहिला मजला, विंग बी. लक्ष्मी अपार्टमेंट बांधिवली, ता.कर्जत, जि. रायगड.
ठिकाणः कर्जत

सही/-
**ॲड. सुर्यकांत भाऊ मसणे,**
दिनांक : १८/१०/२०२५
मो.नं. ९९२२१५५१५३,

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांना मौजे सासवणे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकती सदर मिळकतींचे विद्यमान मालकांचे मालकीहक्क तपासून तसा निर्वेध मालकीहक्काचा दाखला देणेचा आहे. विद्यमान मालकांनी मिळकतीवरील त्यांचा मालकीहक्क निर्वेध असल्याचा भरवसा दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| विद्यमान मालकांचे नाव | गट नंबर | क्षेत्र हे. आर. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| हर्षद पुंजालाल दवे, देवांग हर्षद दवे, मौलीक हर्षद दवे | १०२ | ००-११-१० | २.५० |
| हर्षद पुंजालाल दवे, किशोर भांजी भानुशाली | १०३ | ००-४३-६० | १०.०० |

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिलांना विद्यमान मालकांचे वर नमूद मिळकतींवरील मालकीहक्क निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक १७/१०/२०२५

**ॲड. रविंद्र विनायक ओक**
''गुरूकृपा'' महर्षी कर्वे रोड, ता.अलिबाग, जि.रायगड

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता.मुरुड, जि.रायगड)
ज.म.र अर्ज /२०२५

**जाहिर नोटीस**

मजहर अली इब्राहीम कडू,
रा. मु. सायगांव, पो. शिघे, — अर्जदार
ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत वाडूंगी, — सामनेवाला
ता.मुरुड, जि.रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार मजहर अली इब्राहीम कडू, यांचा जन्म दिनांक ०२/०५/१९६५ रोजी राहत्या घरी म्हणजे मौजे सायगांव, ता.मुरुड जंजिरा, जि.रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत वाडूंगी कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३(३) अन्वेय अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार मजहर अली इब्राहीम कडू, हिचा दिनांक ०२/०५/१९६५ रोजी जन्म झाल्याबाबत कोणतीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि. १२/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही. असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता १८/१०/२०२५ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.
कळावे.

**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

---

**जाहिर नोटीस**

दिनांक १७/१०/२०२५

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे बलीवरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील,

| मालकाचे नाव | सर्व्हे/हिस्सा | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| श्री. पदमाकर अनंता फोपे | १९३/२ | एकुण क्षेत्र ४९.०० यापैकी लिहून देणार यांच्या हिश्याची मिळकत ४६.५ | ०.१६ |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेले आहे. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त जमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जमिन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. पूजा प्रताप सुर्वे**
रा. पळसदरी, ता.कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र.०९२७१८७६०५०

---

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय**
**काँग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड**
**दूरध्वनी क्रमांक** ०२१४१-२२२०१३ ई-मेल् .ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र.जिउनि/गृह/मोफा क्र.११/मा.अभि./जाहीर नोटीस/ /सन २०२५ दिनांक:-१६/१०/२०२५

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

अर्जदार संस्था निकिता अपार्टमेंट हौसिंग सोसायटी लि. बांधीवली.,कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड यांनी १) शुभांगी गंगाधर पुसाळकर, रा.रूम नं. ५, पहिला मजला, हरदास बिल्डींग, आनंद टॉकीजमागे,जि.ठाणे- ४००६०३, बिल्डर्स अँड डेव्हलपर्स प्रा. लि. तर्फे, श्री अब्दुल कादिर परकार, रा.ऑफिस नं ५/७, सय्यद मुखरी इस्टेट, मेरीवाला हाउस, मस्जिद बंदर, मुंबई ४०००0९,३)मे ओमसाई कन्स्ट्रक्शन तर्फे प्रोपायटर, श्री भास्कर काशिनाथ पाटील, पत्ता- नवपाडा रोड, कुंभार खानपाडा, महेश गवळी चाळ, रूम नं.१०, डोंबिवली पश्चिम, ता.कल्याण,जि.ठाणे- ४२१२०२ यांचे विरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११(३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणेबाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
मु.पो. बांधीवली.,ता.कर्जत, जि.रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग-३४/२, क्षेत्र ३६.९० चौ.मी.,

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतीम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक ३०/१०/२०२५ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक १६/१०/२०२५

Signed by Pramod Kashinath Jagtap
Date: 16-10-2025

**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

---

प्रोसेस जमा. रु. — दिवाणी अ १५०
मे.जाहीर नोटीस — वादी वकील श्री.शिरीष लेले
ने.ता.२०/११/२०२५ — निशाणी क्र.२१/ड

**जाहीर नोटीस**
**अलिबाग येथील मे.सि.ज.सी.डी.सो. यांच्या न्यायालयात**

रेग्युलर मुकदमा नं १३०/२०२५

श्री. साईनाथ किसन ठाकूर व १ ....वादी

विरुद्ध

श्री. अंकुश सहदेव ठाकूर व इतर — प्रतिवादी

ज्यापेक्षा बाळकृष्ण उर्फ किसन नारायण ठाकूर, रा.मु.पो.हाशिवरे, ता.अलिबाग, जि.रायगड, हे सात वर्षाहून अधिक काळ बेपत्ता असल्यामुळे ते कायद्याच्या दृष्टीने मयत झाले आहेत व त्यांना वादी श्री. साईनाथ किसन ठाकूर व श्रीमती कमळाबाई किसन ठाकूर हे कायदेशीर वारस आहेत, असा ठराव करुन मिळण्याकरीता या न्यायालयात दावा दाखल केला आहे.

त्यापेक्षा बाळकृष्ण उर्फ किसन नारायण ठाकूर हे मयत नाहीत व श्री.साईनाथ किसन ठाकूर व श्रीमती कमळाबाई किसन ठाकूर हे त्यांना कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळविण्यात याव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू वादी यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत केल्यास त्यास मागणी केल्याप्रमाणे ठराव करुन देण्यात येईल.

आज दि.१७/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले.

अलिबाग

**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर**

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णन केलेली बागायत मिळकत असून त्या मिळकतीमधील विद्यमान मालक १) जयवंत प्रताप सावंत, २) छाया रमेश हकाटे ३)संजय वसंत सावंत ४)संध्या वसंत सावंत ५) कामिनी वसंत सावंत ६) सुजाता वसंत सावंत ७)विजया प्रताप सावंत ८) जयश्री विनोद राणे ९) विशाखा विजय राणे यांचा असलेला सामाईकातील अविभाज्य हिस्सा असून तो अविभाज्य हिस्सा त्यांच्याकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार आमच्या अशिलांनी ठरवलेला असून तो अविभाज्य हिस्सा निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| नागाव ता.अलिबाग | २३४७ | ०-१८-४०<br>पो.ख. ०-००-८०<br>एकूण ०-१९-१० | ४.५६ |

सदर वर नमूद केलेल्या बागायत मिळकतीमधील ०-१८-४० हे. आर. पॉ. या मिळकतीमधील विद्यमान मालक १) जयवंत प्रताप सावंत, २) छाया रमेश हकाटे ३) संजय वसंत सावंत ४ ) संध्या वसंत सावंत ५) कामिनी वसंत सावंत ६ ) सुजाता वसंत सावंत ७) विजया प्रताप सावंत ८) जयश्री विनोद राणे ९) विशाखा विजय राणे यांचा असलेला सामाईकातील अविभाज्य हिस्सा ही मिळकत या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसल्या कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांचे आत आणून द्यावीत. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही. तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे .

अलिबाग
तारीख १७/१०/२०२५

सही /-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
ऑफिस पत्ता - दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर, ता.अलिबाग जि.रायगड




## राशीभविष्य

- **मेष** : कौटुंबिक वादावर तोडगा निघेल. प्रवासाचे बेत लांबणीवर पडतील. नव्या ओळखींचा लाभ घ्यावा.
- **वृषभ** : जुनी येणी पुन्हा रखडतील. व्यवसायात पुरेशी सावधगिरी बाळगावी. विद्यार्थ्यांना संधी लाभतील.
- **मिथुन** : खरेदीचे व्यवहार मार्गी लागतील. अकारण अधिक चिंता करू नका. अपेक्षित साध्य करता येईल.
- **कर्क** : जुन्या ओळखीतून लाभ होईल. अपेक्षित भेटी समाधान देतील. वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं.
- **सिंह** : आर्थिक बाबतीत ताण राहील. इतरांच्या वादात मध्यस्थी नको. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **कन्या** : व्यवसायात चिंता राहील. महत्त्वाच्या भेटी प्रलंबित राहतील. वाहन, यंत्राचा वापर जपून करावा.
- **तूळ** : उपजत कला-गुणांचा विकास होईल. स्वमताग्रह टाळायला हवा. गेलेल्या संधी पुन्हा लाभणार आहेत.
- **वृश्चिक** : इतरांच्या सूचनांकडे दुर्लक्ष नको. आर्थिक व्यवहारात हानी संभवते. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल.
- **धनु** : व्यवसायात नव्या संधी लाभतील. आर्थिकदृष्ट्या उन्नती होईल. कला, क्रीडा क्षेत्रात प्रगती होईल.
- **मकर** : मनाविरूध्द घटना संभवतात. सरकारी कामं विलंबानं होतील. अनपेक्षित घटनांमुळे दिलासा मिळेल.
- **कुंभ** : सांधेदुखीबाबत काळजी घ्यावी. भागीदारी व्यवसायात मतभेद टाळावे. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल.
- **मीन** : अपेक्षित वार्ता कानी येईल. विवाहाची बोलणी सफल होतील. बेरोजगारांना उत्तम संधी लाभतील.

मनातलं ओठांवर

## वसुबारस

पाहता पाहता दिवाळी आलीही. भारतीय सण हे नुसते नाहीतच. त्यात सर्वंकष विचार आहेत. हवामान, प्रकृतीमान, निसर्ग, निसर्गाचे घटक , विज्ञान आणि धर्मच नव्हे तर मनुष्याच्या स्वभावरचनेचाही विचार या सणांमागे आहे. दिवाळीचा पहिला दिवस हा वसुबारस किंवा गोवत्सद्वादशी म्हणून साजरा केला जातो. या दिवशी घरातील गोधनाची पूजा केली जाते. समुद्रमंथनाच्या वेळेस पाच कामधेनू उत्पन्न झाल्या होत्या त्यापैकी नंदा नामक धेनूला उद्देशून हे व्रत केलं जातं. ह्या दिवसापासून घरासमोर रांगोळी काढण्यास सुरुवात करतात. काही स्त्रियांचा या दिवशी उपवास असतो. घरातील गाय वासरू यांना अंघोळ घातली जाते. अंगाला हळद लावली जाते, त्यांच्या अंगावर नवी वस्त्रे घातली जातात. भरपूर कृषी उत्पादन व्हावे, आपल्या मुला-बाळांना चांगले आरोग्य मिळावे व सुख लाभावं म्हणून ही पूजा करतात. आपल्याला सर्व प्रकारची मदत करणाऱ्या प्राण्यासाठी कृतज्ञतादिन म्हणून आपण हा दिवस नव्या पद्धतीनं साजरा करू शकतो.

## १८ ऑक्टोबर

दिनविशेष

- **१९३१** : अमेरिकन संशोधक आणि उद्योजक थॉमस अल्वा एडिसन यांचे निधन.
- **१९८३** : क्रिकेटपटू विजय मांजरेकर यांचे निधन.
- **१९८४** : अभिनेत्री फ्रीडा पिंटो यांचा जन्म.
- **२००४** : कुख्यात चंदनचोर आणि तस्कर वीरप्पन याचा मृत्यू.
- **२०१३** : 'ज्ञानपीठ' पुरस्कारविजेते प्रसिद्ध तेलगू साहित्यिक रावुरी भारद्वाज यांचं निधन.

महत्त्वपूर्ण काही...

## गुरुत्वाकर्षणाविषयी...

गुरुत्वाकर्षण हे पृथ्वीचं महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य असून त्यामुळे इथे सजीवांची हालचाल सुकर आहे. वस्तुमान असणाऱ्या कोणत्याही दोन वस्तूंच्या एकमेकांकडे आकर्षिल्या जाण्याच्या प्रवृत्तीला गुरुत्वाकर्षण म्हणतात. वजन म्हणजे जमिनीच्या दिशेने असणाऱ्या गुरुत्वाकर्षणामुळे मिळणारे त्वरण आणि वस्तुमान यांच्या गुणाकाराएवढे बल. या क्षेत्रात अफाट संशोधन होऊनही दूरदूर ठेवलेल्या दोन वस्तूंमध्ये गुरुत्वाकर्षण का असतं, हे अद्याप पूर्णपणे समजलेलं नाही. गुरुत्वाकर्षण विद्युतचुंबकत्व, नाभिकीय दृढ अंतप्रभाव आणि अदृढ अंतप्रभाव या तिघांसोबत प्रकृतीतील चार मूलभूत अंतःप्रभावांमधील एक आहे. गुरुत्वाकर्षणाला गणितीय सूत्रात बसवण्यात आयझॅक न्यूटन प्रथम यशस्वी ठरला. त्याने वैश्विक गुरुत्वाकर्षणाचा नियम मांडला. आता गुरुत्वाकर्षणाच्या न्यूटनच्या नियमांची जागा अल्बर्ट आइनस्टाइनच्या साधारण सापेक्षता सिद्धांताने घेतली आहे. न्यूटनचे नियम प्रकाशापेक्षा फार कमी वेग असणाऱ्या वस्तूंसाठी पुरेसे अचूक आहेत. यासाठी ते नियम अजूनही बहुतेक जागी लागू होतात.

## पंचांग

**शनिवार, १८ ऑक्टोबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
अश्विन कृष्ण १२ (धनत्रयोदशी),
चंद्रराशी : सिंह, योग : ब्रह्मा,
नक्षत्र : पू. फाल्गुनी,
सूर्योदय ६.३६, सूर्यास्त ६.१२

## फॉरवर्डस

**जी रहें हैं अभी तेरी शर्तों क़े मुताबिक़ ए ज़िन्दग़ी...**

**दौर आएगा क़भी हमारीं फरमाइशों क़ा भीं...!**

आरोग्यमंत्र

## खोबरेल तेल उपयोगी...!



रात्री झोपण्यापूर्वी हाता-पायाना नारळ तेलाने मालिश केल्यास अधिक शांत झोप लागते आणि थकवा कमी होतो पोटाचा त्रास- हाता-पायाच्या तळांवर नारळाच्या तेलाने मालिश केल्यानंतर पोटाचा त्रास २ दिवसात बरा होतो. लहान मुलांच्या पायाच्या तळव्यांवर नारळ तेलाने मालिश केल्यास, त्यांना खूप आनंदी आणि निरोगी ठेवते. पाय दुखणं - मुंग्या येणं यासाठी रात्री झोपायला जाण्यापूर्वी दररोज २ मिनिट नारळाच्या तेलानं पायांच्या तळव्यांची मालिश करण्यास सुरवात करावी. या प्रक्रियेमुळे पायांच्या दुखण्यापासून व मुंग्या येणं यापासून बराच आराम मिळातो. पाय नेहमी सुजलेले आणि चालत असताना थकवा येत असेल, तर रात्री झोपायला जाण्यापूर्वी पायांच्या तळांवर नारळ तेलाने मालिश करावं. फक्त दोन दिवसातच पायांची सूज अदृश्य होते. पायाला जळजळ होत असेल तर आपल्या हाता-पायाच्या तळव्यांवर नारळाचे तेल लावायला सुरुवात करुन पहा. आठ दिवसात वेदना कमी होतात आणि परत जळजळ कधीच होणार नाही. थायरॉईड रोगाने पाय सर्व वेळ दुखत असल्यास झोपायच्या आधी पायाच्या तळांवर नारळ तेलाची मालिश करा आणि स्वस्थ व्हा. पायाला फोड असल्यास रात्री झोपायच्या आधी चार दिवस नारळ तेलाने तळपायांची मालिश केली तर बराच फरक जाणवेल. तळहातावर आणि तळपायावर तेल लावल्यानं झोपेत घोरणं कमी होतं. रात्री झोपण्यापूर्वी नारळ तेलाची हाता-पायाचा तळव्यावरील मालिश केल्यास पाठीचा, मणक्याचा त्रास कमी होतो.

## फॅशन पॅशन

✻ काळे, निळे आणि ग्रे सूट कॉर्पोरेट विश्वाची शान असतात. पण गडद रंगामुळे उन्हाचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे सौम्य रंगांची निवड करा. पांढरा, क्रीम अशा रंगांमुळे तुम्हाला थंडावा मिळेल.

✻ उन्हाळ्यात कॉटनला पर्याय नसतो. पण लाईट कॉटन, लिनन किंवा चँब्रे प्रकारातल्या कापडांचा वापर करा. १०० टक्के कॉटनचे कपडे शरीरातली सगळी उष्णता शोषून घेतील आणि कपड्यांवर घामाचे पट्टे दिसतील. हे टाळण्यासाठी लाईट कॉटनचा पर्याय निवडा. **(क्रमश:)**

करिअरवाटा

## नवीन जॉब शोधताना...

प्रत्येक कार्यालयातलं वातावरण वेगळं असतं. ते तणावपूर्ण असेल तर मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. अशा गढूळ वातावरणात प्रगती आणि कार्यशक्ती खुंटते. मात्र ते बदलण्याचा विचार करत असाल तर दुसरं क्षेत्र निवडतानाही काळजी घ्या. नव्या सेक्टरमध्ये प्रवेश करताना अनेक बाबींची शहानिशा करणं आवश्यक आहे. यासाठी तुम्ही सध्या पेलत असणाऱ्या जबाबदारीशी मिळतीजुळती संधी देणारा जॉब शोधा. या व्यतिरिक्त तुमच्या क्षेत्रातील तज्ज्ञांचा सल्लाही महत्त्वाचा ठरतो. सुरूवातीला पाच-सहा क्षेत्रांची चौकशी करा. या क्षेत्रांमध्ये पैसा कुठून येतो, त्यांचे ग्राहक कोण, या इंडस्ट्रीवर बाजारातील बदलांचा किती आणि कसा प्रभाव पडतो, त्यांचे स्पर्धक कोण, त्यांच्या पैशाचा विनियोग कसा होतो आदी मुद्दे लक्षात घेणं आवश्यक आहे. त्यासाठी शॉर्टलिस्ट बनवा. उपलब्ध यादीतील तुमच्यासाठी पर्याप्त ठरणाऱ्या कंपन्या शॉर्टलिस्ट करा आणि त्यांची अधिक माहिती मिळवा. तिथं आवश्यक असणाऱ्या कौशल्याची माहिती घ्या. यासाठी नव्या सेक्टरच्या गरजेप्रमाणे रिझ्युमेमध्ये बदल करावा लागेल. आताच्या क्षेत्रातील प्रचलित भाषा आणि नव्या क्षेत्रातील भाषा यात फरक असू शकतो. याची जाण ठेवा.




खेचाखेची

## काय ती हौस

जपानी नवरा बायको भांडत असतात.

**नवरा** : ना मियाओ किना टिम कौजी
**बायको** : सू की किना माटो
**नवरा** : स को टिटी यान्वी
**बायको** : तोचिकावा

लोकांची हौस बघा, समाजात तर काही नाही, पण फक्त नवरा बायकोचं भांडण या शब्दांसाठी पूर्ण मेसेज वाचला.

## वेगळं काही

इटलीतल्या सार्डिनियन भागात कासू मार्जू नावाचा पदार्थ मिळतो. तो बनवण्यासाठी पनीर अक्षरश: सडवलं जातं. या पदार्थामध्ये जीवंत किडे असतात. या पदार्थामुळे भूक वाढते असं म्हणतात. हा पदार्थ आवडीने खाणारे लोक आहेत. जपानमध्ये एन आत्तो नावाचा पदार्थ बनवला जातो. हा पदार्थ बनवताना सोया सडवलं जातं. जपानमध्ये नाश्त्याला हा पदार्थ खाल्ला जातो. स्वीडनमध्ये सरस्ट्रोमिंग हा पदार्थ खाल्ला जातो. या पदार्थाला प्रचंड दुर्गंधी येते. म्हणूनच तो घराच्या बाहेर खाल्ला जातो. १९ व्या शतकात मीठाच्या पाण्यात विशिष्ट प्रकारचा मासा सडवला जात असे. त्यापासून हा पदार्थ बनायचा. आता सीलबंद डब्यात मासा सडवला जातो.

## अविचाराने वागू नकोस

महिलायन



मी २८ वर्षांची विवाहिता आहे. माझ्या वडिलांच्या अपघाती निधनानंतर आईने दुसरं लग्न केलं होतं. पण मतं न जुळल्याने माझे सावत्र वडिलांशी सतत वाद होत राहिले. त्यामुळे लग्नानंतर मी फक्त आईशीच नातं ठेवून होते. पण महिन्याभरापूर्वी आईचं आकस्मिक निधन झालं. रात्री चक्कर येऊन पडली आणि जागीच गतप्राण झाली असं सांगणारा फोन आला तेव्हा माझा विश्वासच बसला नाही. शिवाय शक्य असूनही मी येईपर्यंत वाट न पाहता तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आल्याने मनात संशय निर्माण झाला आहे. हा संशय कसा दूर करु?

- सखी, आधीपासून मनात आकस असताना अशी एखादी धक्कादायक घटना समोर येते तेव्हा सैरभैर होणं स्वाभाविक आहे. पण परिस्थितीचा साकल्याने विचार कर. पोस्ट मार्टमच्या रिपोर्टची माहिती घे. शेजाऱ्या-पाजाऱ्यांशी चर्चा करुन त्या दोघांमध्ये काही भांडण झालं होतं का ते तपास. डेथ सर्टिफिकेट देणाऱ्या डॉक्टरांची भेट घे. या सगळ्यावरुन तुला वस्तुस्थितीची नेमकी कल्पना येऊ शकेल. केवळ तर्क बांधू नकोस.

## सुडोकू १८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | | | ५ | १ | ९ | | | |
| | | १ | २ | | | | | ३ |
| | | ८ | ६ | | | १ | २ | ९ |
| ९ | | ३ | | | | ७ | ४ | २ |
| | | | | ९ | | | | |
| ७ | १ | ५ | | | | ९ | | ८ |
| ३ | ५ | ६ | | | २ | ४ | | |
| ८ | | | | | १ | २ | | |
| | | | ७ | ४ | ६ | | | ५ |

**टीप -**
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्र ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ४ | ३ | ६ | २ | १ | ७ | ५ | ९ |
| १ | ६ | ९ | ३ | ५ | ७ | ८ | २ | ४ |
| ७ | २ | ५ | ४ | ९ | ८ | १ | ६ | ३ |
| ६ | ९ | २ | ५ | १ | ४ | ३ | ७ | ८ |
| ३ | १ | ७ | ८ | ६ | २ | ४ | ९ | ५ |
| ५ | ८ | ४ | ७ | ३ | ९ | ६ | १ | २ |
| ४ | ७ | १ | ९ | ८ | ५ | २ | ३ | ६ |
| २ | ५ | ६ | १ | ४ | ३ | ९ | ८ | ७ |
| ९ | ३ | ८ | २ | ७ | ६ | ५ | ४ | १ |

## शब्दकोडे क्रमांक १८



**आडवे शब्द :-**
१) बाग
४) लोणी
७) गौरी-हर
१०) उष:काल
११) दक्ष
१२) बगळा
१४) सत्तावीसावे नक्षत्र
१५) गोंधळ, आरडाओरड
१७) संपूर्ण
१९) धोका
२०) कावळांना दिलेला बळी, भात
२१) विहीरीतून पाणी काढण्याचे जोड साधन
२३) मोदकाचे आच्छादन
२४) दिवस
२५) वर्ष, सन
२७) पुरुष
२८) कागद (हिं )
३०) उत्तराधिकारी
३१) कशा प्रकारचा?
३३) लेखक, कथा लिहिणारा
३५) संपत्ती
३७) हस्तलाघव, जादू
३९) उदर (हिं )
४०) उपकार
४१) शरीर
४२) वडिलांचे एक संबोधन
४४) यमुना नदीचे एक नाव
४९) युवराज
५१) काकुळतीने याचना करणे
५४) कोवळा अंकुर
५५) वाळवी
५७) संरक्षक भिंत
५८) बहीण(हिं )
६०) शोध
६२) खेळाडूंमध्ये होणारा चुरशीचा खेळ
६४) एक खादाड राक्षस
६६) पर्वत
६८) वक्र
७०) नकला करणारा
७१) पळापळ
७३) च्या सह
७५) बाई
७६) मणका
७७) वाकणे
७८) पाय
७९) कावळ्याचे ओरडणे

**उभे शब्द :-**
१) दुसऱ्या दर्जाचा अधिकार, मुख्य पदाच्या खालचा
२) पहारा करणारा
३) बडबड
४) एक क्षार
५) खून, हत्या
६) जोडीतील एक चर्मवाद्य
८) पैसा, ममता
९) फांदी तुटतानाचा आवाज
१३) पराकाष्ठा, अनर्थ
१५) एक ज्वालाग्रही काळे खनीज
१६) बारीकसारीक
१७) नातेवाईक
१८) तात्काळ
१९) अग्रलेख लिहिणारा
२०) रेडा, कोकिळ
२२) टिंगल
२४) उपयोग
२६) मध्यस्थ
२८) कंबर, कंबरेचा सांधा
२९) मलई
३१) केर
३२) मेहुणा हिं )
३४) थापा मारणारा
३५) जागणे,
३६) देण्याची वृत्ती, आर्थिक सामर्थ्य
३८) लापशी, एक गोड खाद्य
४१) जया अंगी मोठेपण ✻✻ ✻✻✻ ✻✻✻
४२) बारा बंद असलेला अंगरखा
४३) उंच वास्तू, बंगला ४५) भरवसा, श्रद्धा
४६) पर्वत
४७) सावली
५०) देह
५२) सामाजिक वजन, अब्रू
५३) कलावंत
५५) तापापूर्वीचे अंग मोडून येणे
५६) पृथ्वी
५९) केविलवाणा
६१) बासरी
६३) अंत:करण
६४) घाईघाईने, अधाशीपणाने मोठा घास घेऊन खाणे
६५) बारीक झणझण
६७) हिंदीत गाढव
६९) टपाल
७१) भीती, वचक
७२) इंग्रजीत एक
७४) सोन्याचा कस
७५) चौक

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर





# कलासक्त

**मराठी चित्रपटसृष्टीने नुकत्याच दोन परस्परविरोधी, पण परस्परसंबंधित घटना अनुभवल्या. 'पिंजरा' फेम ज्येष्ठ अभिनेत्री संध्या (विजया देशमुख) यांचे निधन आणि संवेदनशील अभिनेत्री नीना कुलकर्णी यांना मिळालेला नवा प्रतिष्ठेचा जीवनगौरव पुरस्कार.एका बाजूला एका सुवर्णयुगाचा पडदा खाली आला, तर दुसरीकडे त्याच परंपरेचा वारसा सन्मानाने पुढे नेणाऱ्या अभिनेत्रीला गौरव प्राप्त झाला.**

## संध्या ते नीना मराठी अभिनेत्रींचा अविनाशी वारसा..



**संध्या : एका युगाची नायिका**

'जय जय रघुवीर समर्थ', 'पिंजरा', 'सीताराम कल्याण', 'रंगिली', 'सखू', 'अमरभूपाळी', 'झनक झनक पायल बाजे' अशा अनेक चित्रपटांमधून संध्या यांनी अभिनय आणि नृत्य यांची अद्भुत सांगड घातली. विशेषतः १९७२ मधील व्ही. शांताराम यांच्या क्लासिक चित्रपट 'पिंजरा' मधील चंद्रा या तमाशा नायिकेची भूमिका ही त्यांच्या अभिनय शिखरावरील कामगिरी ठरली. त्या भूमिकेतून त्यांनी स्त्रीची संवेदना, प्रेमाची वेदना आणि समाजातील दुटप्पी मूल्यांची मांडणी अत्यंत हृदयस्पर्शीपणे केली.'मला लागली कुणाची उचकी' आणि 'तुम बिन जीवन कैसा'सारख्या गाण्यांमधून त्यांचा अभिनय, नृत्यकौशल्य आणि भावनांची लय एकत्रितपणे अनुभवायला मिळते. संध्या या भरतनाट्यम आणि कथक या शास्त्रीय नृत्यशैलीत निपुण होत्या, आणि त्यांच्या प्रत्येक दृश्यात ती लय, रचना आणि नृत्यसंवेदना स्पष्टपणे जाणवते.त्या सुप्रसिद्ध दिग्दर्शक व्ही. शांताराम यांच्या पत्नी होत्या आणि त्यांच्या अनेक चित्रपटांमागील मुख्य प्रेरक शक्ती म्हणून ओळखल्या जातात.'झनक झनक पायल बाजे' आणि 'दो आंखें बारह हाथ'सारख्या चित्रपटांमागे त्यांची सौंदर्यदृष्टी, नृत्यसंवेदना आणि कलात्मक दृष्टिकोन ठळकपणे दिसून येतो. संध्या यांनी आपल्या अभिनयातून स्त्री–अभिनयाला एक नवी उंची दिली, जिथे सौंदर्याच्या पलीकडे जाऊन त्यांनी भावनांच्या गाभाऱ्यातील सत्य साकारले.

**नीना कुलकर्णी : अभिनयाची सुसंस्कृत परंपरा**

संध्या यांच्या निधनाच्या दुःखद पार्श्वभूमीवरच, मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील सशक्त, बुद्धिमान आणि संवेदनशील अभिनेत्री नीना कुलकर्णी यांना नुकताच मराठी रंगभूमीवरील मानाचा 'विष्णुदास भावे गौरवपदक' पुरस्कार मिळाल्याची आनंदवार्ता आली.गेल्या चार दशकांपासून त्यांनी रंगभूमी, दूरदर्शन, सिनेमा आणि आंतरराष्ट्रीय प्रकल्पांमध्ये आपल्या अभिनयाची अमिट छाप सोडली आहे.महात्मा वि. गांधी, श्रीमान श्रीमती, बघतो मी तुला, मुक्ता, थ्री इडियट्स, फोटो प्रेम, कुटुंब माझं यांसारख्या चित्रपट–नाटकांमधील त्यांच्या भूमिका सामाजिक वास्तवाशी घट्ट जोडलेल्या आहेत.त्यांच्या अभिनयात विचार, शिस्त, संवेदनशीलता आणि स्त्री–अस्मितेचा स्पष्ट आवाज जाणवतो.

नीना कुलकर्णी यांनी मराठी–इंग्रजी सीमारेषा मिटवत 'The Best Exotic Marigold Hotel' आणि फ्रेंच चित्रपट 'Noces' (A Wedding) सारख्या आंतरराष्ट्रीय प्रकल्पांमध्येही उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

**परंपरेचा पूल– कलेसाठी समर्पण आणि स्त्री–अभिनयाचा गौरव**

संध्या आणि नीना, या दोघींच्या वाटा काळाने वेगळ्या केल्या, परंतु त्यांची कलायात्रा एकाच धाग्याने बांधलेली आहे.संध्या यांनी ज्या काळात स्त्रीला पडद्यावर केवळ सौंदर्याच्या चौकटीत बसवले जात होते, त्या काळात त्या अभिनय आणि नृत्याद्वारे विचार मांडत होत्या.नीना कुलकर्णी त्या परंपरेला आजच्या काळातील संवेदनशील आणि विचारशील अभिव्यक्तीतून पुढे नेत आहेत.

**कलासृष्टीचा सलाम !**

एका पिढीचा शेवट आणि दुसऱ्या पिढीचा सन्मान, हे दोन्ही क्षण मराठी कलासृष्टीसाठी आत्मपरीक्षणाचे आहेत.संध्या यांच्या तेजस्वी वारशाला सलाम, आणि नीना कुलकर्णी यांच्या कार्याचा गौरव! मराठी सिनेमा आणि नाट्यविश्व या दोन्हींची शोभा या दोन विलक्षण अभिनेत्रींच्या कर्तृत्वामुळे आज अधिक उजळून निघाली आहे. ●

प्रा. विजय कोष्टी

---

**दिवाळी आणि फराळ हे समीकरण असून दिवाळीची कितीही तयारी केली तरी ती फराळाशिवाय पूर्ण होत नाही. दिवाळीनिमित्त प्रत्येक भारतीय घरात फराळ तयार होतो. हा दिवाळीचा फराळ देशभरात सर्वत्र तर पाठविला जातोच. शिवाय परदेशातील मराठी कुटुंबियांकडूनही फराळाच्या पदार्थांना मागणी वाढत असून या वर्षी पुणे, मुंबई, ठाणे, नागपूर, दिल्ली, अहमदाबाद आदी शहरातून हजारो टन फराळ जगभरातील विविध देशांमध्ये रवाना होत आहे. यानिमित्ताने दिवाळी फराळाची परंपरा, प्रयोजन, व्याप्ती, बदलते स्वरूप आणि आर्थिक उलाढाल याविषयी थोडक्यात ....**

## दिवाळी फराळ : परंपरा, महत्त्व, व्याप्ती आणि बदलते स्वरूप!

दिवाळी किंवा दीपावली हा सर्व भारतात साजरा केला जाणारा एक प्रमुख सण असून यावेळी घरात आणि घराबाहेर दिवे लावून तसेच घरासमोर रांगोळी काढून सुशोभन केले जाते. उपलब्ध माहितीनुसार दिवाळी हा सण सुमारे तीन हजार वर्षापासून साजरा होत असून पावसाळ्यातील समृद्धीचा, आनंदाचा आणि कृतज्ञतेचा सोहळा मानला जातो. पावसाळ्यानंतर नवीन पिके हाती आल्यावर शरद ऋतुच्या मध्यास, आश्विन आणि कार्तिक महिन्यातील आश्विन वद्य त्रयोदशी ते कार्तिक शुद्ध प्रतिप्रदा या चार दिवसामध्ये साधारणपणे ऑक्टोबर– नोव्हेंबर मध्ये हा सण येतो. महाराष्ट्रात व इतर काही भागात दिवाळीला लहान मुले मातीचा किल्ला तयार करून त्यावर मातीची खेळणी मांडतात. याशिवाय दिवाळीच्या वेळी प्रत्येक घरात आणखी एक गोष्ट केली जाते ती म्हणजे दिवाळी फराळ. प्रांतागणिक फराळातील पदार्थ बदलले जातात पण फराळाशिवाय दिवाळी अपूर्ण होय. महाराष्ट्रातील फराळामध्ये विशेषतः लाडू, चकली, करंजी, चिवडा, शेव, शंकरपाळी आणि अनारसे यांची रेलचेल असते.

फराळामुळे दिवाळीची रंगत खऱ्या अर्थाने वाढते असे म्हंटल्यास त्यात काही वावगे वाटणार नाही, इतके दिवाळी आणि फराळाचे घटत नाते जुळले आहे. फराळामुळे दिवाळीचा आनंद द्विगुणीत होतो. दिवाळी फराळ ही एक परंपरा मानली जाते. दिवाळी आणि फराळ भारताच्या शेतीप्रधानतेला जोडलेले असून शेतीच्या दिवसात कष्ट करून थकलेल्या शेतकऱ्याचा निवांत होण्याचा हा काळ असतो. या काळात गोडधोड खाऊन तेलकट, तुपकट आणि गोड पदार्थांच्या माध्यमातून येणाऱ्या थंडीसाठी तो शरीरात स्निग्धता साठवून घेत असतो. या प्रयोजनाने दिवाळीचं निमित्त साधून फराळाची परंपरा निर्माण झाली असावी.

दिवाळी मध्ये शेजारी, नातेवाईक व मित्रमंडळींना फराळाचे डबे देण्याच्या हिशोबानेच घरोघरी फराळ बनविला जातो. मात्र आता हा फराळ थेट परदेशी पाठविला जाऊ लागला आहे. परदेशातील नातेवाईक, व्यावसायिक भागीदार किंवा कंपनीच्या परदेशातील शाखेतील सहकाऱ्याना दिवाळी भेट म्हणून हा फराळ पाठविला जातो. याकरीता मिठाई दुकानदार व फराळ तयार करणारे व्यावसायिक परदेशी पाठविण्यासाठी तयार पॅकही उपलब्ध करून देऊ लागले आहेत. विविध कुरिअर कंपन्या हा फराळ पाठविण्याचे काम करतात. यंदा पुणे, मुंबई, ठाणे, अहमदाबाद, दिल्ली यांसारख्या प्रमुख शहरांतील कुरिअर कंपन्यांनी अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि इतर देशांमध्ये भारतीय समुदायासाठी हजारो टन फराळ पाठवला असल्याचे समजते. त्याज्यामध्ये विशेषतः लाडू, चकल्या, करंज्या, शेव, अनारसे आणि चिवडा यांसारख्या पदार्थांचा समावेश आहे. या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाली असून या निमित्ताने मिठाई, रेडिमेड फराळ व्यावसायिक व विविध कुरिअर कंपन्यांना व्यवसाय मिळत आहे, बरोबरीनेच परदेशस्थ भारतीयही दिवाळीच्या पारंपरिक, पौष्टिक आणि रुचकर फराळाचा स्वाद घेत आहेत. गेल्या काही वर्षांत बहुतेक देशांनी खाद्यपदार्थांवर असणारे निर्बंध कमी केल्यामुळे दिवाळीचा फराळ पाठविण्याचे प्रमाण वाढले आहे. मागील पाच–सहा वर्षांपासून परदेशातून फराळाच्या पदार्थांची मागणी वाढली



असून यामध्ये करंजी, चकल्या, बेसन लाडू, मोतीचूर लाडू, रवा लाडू, चिरोटे, शंकरपाळ्या, चॉकलेटच्या शंकरपाळ्या, डायट चिवडा अशा विविध प्रकारच्या फराळाला परदेशातून मोठ्या प्रमाणात मागणी असते.

तथापि, अलीकडच्या काळात दिवाळीच्या आठवडाभर आधीपासून एकेक पदार्थ तयार करून कुटुंबियासोबतच शेजारी, नातेवाईक व मित्रमंडळींना आग्रहाने देण्याची परंपरा इतिहास जमा होऊ लागली आहे. विभक्त कुटुंबांची तसेच पती–पत्नी दोघेही नोकरी करणाऱ्या कुटुंबांची संख्या वाढत चालल्याने दिवाळीच्या फराळाच्या एकेक पदार्थासाठी स्वयंपाकघराचे युद्धघर न करता, चटपट एक दोन पदार्थ घरी बनवून इतर फराळ रेडिमेड खरेदी करण्याकडे लोकांचा कल वाढू लागला आहे. मात्र विकतचा फराळ मोजकाच असलेने पूर्वीसारखे मोठे डबे भरून ठेवता येत नाहीत. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून शेजारी, नातेवाईक व मित्रमंडळींना पारंपरिक फराळाऐवजी मिठाई देण्याचा पर्याय पुढे आला होता. परंतु हल्लीच्या कोलेस्टेरॉल आणि कॅलरी बाबत जागरूक जमान्यात तुपसाखरात घोळलेली मिठाई दिवाळी संपली तरी शीत कपाटात पडून राहण्याचे चित्र दिसत आहे. म्हणून मिठाईकडेही पाठ फिरवून लोक आता सुक्या मेव्याचा पर्याय अवलंबत आहेत. लवकर संपवण्याची सक्ती नसल्याने, आरोग्यास उत्तम असल्याने आणि अगदी पाव किलोच्या आकर्षक पॅकमध्ये ही मिश्र सुका मेवा उपलब्ध होत असलेने, सर्वसामान्यांनीही आपला मोर्चा तिकडे वळवला आहे. शेवटी 'कालाय तस्मेय नमः'.तथापि, दिवाळीच्या सणानिमित्त एकूण आर्थिक उलाढाल खूप मोठी होते. या काळात कपडे, मिठाई, फटाके, रोषणाईच्या वस्तू, भेटवस्तू, उपहार, तसेच प्रवास, हॉटेलिंग, पर्यटन यावरही लाखो रुपये खर्च होतात. दिवाळीचा सण भारताच्या आर्थिक व सांस्कृतिक परंपरेला एक मोठी चालना देतो. दिवाळीच्या सर्वांना शुभेच्छा. ●

**– (कवठे महांकाळ (सांगली)**

---

## हृदयातले हळुवार गायक जगजित सिंह

श्रीराम शेटये

बिर्ला मातोश्री सभागृहात जगजित सिंग आणि चित्रा सिंह गायला लागले की वातावरण भाराऊन जायचे. भारतीय चित्रपटसृष्टीतील संगीताचे ते सोनेरी दिवस आजही आठवतात.

आपल्या लाघवी, आर्त स्वरांच्या गझलांनी केवळ भारतातच नव्हे तर भारताबाहेरही प्रचंड लोकप्रियता मिळविलेले गझलसम्राट जगजित सिंह यांचा १० ऑक्टोबर हा स्मृतिदिन.

जगजीत मला आवडतो असे म्हणणाऱ्या बऱ्याचजणांना जर विचारले की तुला जगजीतची कुठली गाणी, गझला आवडतात? उत्तर टिपिकल असते नी त्यातली गाणीपण टिपिकल असतात. जसे की..तुम इतना जो, झुकी झुकी सी नजर, तुम को देखा तो, कोई ये कैसे बताये, होटो से छू लो, कोई फरयाद, होशवालों को खबर क्या,प्यार मुझ से किया, बडी नाजूक है, चिट्ठी ना कोई संदेस..या गाण्यांशिवाय त्यांना काही आठवत नाही. गझला जर म्हटल्या तर मग सरकती जाय, कल चौदवी कि रात थी, पत्ता पत्ता बूटा बूटा, तेरे बारे में, तेरा चेहरा है, शाम से आँख फिर नमीं सी है, वो कागज की कश्ती.. अशा गझला त्यांच्या डोळ्यांसमोर तरळून जातात. याशिवाय त्यांना काही आठवत नाहीच. जर फक्त वरवर ऐकलेली गाणीच माहीत असतील तर मग कसे काय ते म्हणू शकतात की मला जगजीत आवडतो?

''आखरी हिचकी तेरे शानों पे आए । मौत भी मै शाइराना चाहता हूँ... ।

'तुझ्या खांद्यांवर माझी मान टेकलेली असावी...अन् त्याच क्षणी माझा अखेरचा श्वास सरावा... कारण मला मृत्यूही कसा काव्यमय यायला हवा...' अशी आर्त आळवणी गझलेतून करणारे ज्येष्ठ गझलगायक जगजित सिंग .

''ये कागज की कश्ती, ये बारिश का पानी,' ''होटों से छू लो तुम मेरा गीत अमर कर दो,' ''ये जिंदगी किसी और की मुझे चाहता कोई और है', ''तुम इतना जो मुस्कुरा रहे हो', ''तेरी खुशबू मे बसे खत मै जलाता कैसे,' ''प्यार मुझ से जो किया तुम ने तो क्या पाओगी,' ''होशवालों को खबर क्या बेखुदी क्या चीज है,' अशा एकाहून एक फिल्मी–गैरफिल्मी गझल–गाण्यांद्वारे जगजित सिंग यांनी रसिकांना वेड लावले. जगजित सिंग यांचे मूळ नाव होते जगमोहन; पण गुरूंनी दिलेला आदेशानुसार त्यांचे नाव जगजित सिंग असे ठेवण्यात आले होते.



जगजित सिंग यांचा जन्म राजस्थानातील श्रीगंगानगर येथे ४ फेब्रुवारी १९४१ रोजी झाला. लहानपणापासूनच तेथे त्यांनी संगीताचे धडे गिरवले. मुलाची संगीताविषयीची रुची ओळखून जगजित सिंग यांच्या वडिलांनी त्यांना पंडित छगनलाल शर्मा यांच्याकडे संगीतशिक्षणासाठी पाठवले. तेथे त्यांनी ठुमरी, खयाल, ध्रुपद या अभिजात संगीतातील प्रकारांचा बारकाईने अभ्यास केला.

डीएव्ही कॉलेजमध्ये शिकत असताना जगजित सिंग यांच्याकडे फी भरण्याएवढे पैसे नसायचे. त्यामुळे गुरुद्वारात पारंपरिक गाण्यांचे कार्यक्रम करून ते फी भरत असत. जालंदरच्या ऑल इंडिया रेडिओ केंद्रात व्यावसायिक गायक म्हणून पहिल्यांदा संधी मिळाल्यानंतर त्यांनी अत्यंत कमी मोबदल्यातही सहा लाईव्ह संगीत कार्यक्रम सादर केले. १९६१ साली तरणेबांड जगजित सिंग मुंबईत इतर कलाकारांप्रमाणे नशीब अजमावण्यासाठी आले.

परंतु, तीन वर्षे काढल्यानंतर त्यांना जालंदरला परतावे लागले. तरीही ते खचले नाहीत. त्यांनी १९६५ साली पुन्हा एकदा मुंबई गाठली. स्वप्नांच्या दुनियेची सफर यावेळी यशस्वी ठरली. जगजित सिंग यांच्या दोन रेकॉर्ड एचएमव्हीने जारी केल्या. त्यावेळी जगजित सिंग यांनी पगडी आणि दाढी उतरवून नव्या रुपात स्वत:ला प्रोजेक्ट केले. त्यावेळी निघालेल्या दोन्ही रेकॉर्ड फारशा यशस्वी ठरल्या नाहीत. त्यामुळे पाश्वसंगीताच्या क्षेत्रात जगजित यांना फारशी संधी मिळाली नाही.



अर्थार्जन करण्यासाठी जिंगल, अॅड फिल्म आणि डाक्युमेंटरी यासाठी गाणी, जिंगल कंपोज करून जगजित सिंग यांना धडपड करावी लागली. अशाच एका रेकॉर्डिंगच्या वेळी त्यांची भेट चित्रा सिंग यांच्याशी झाली. प्रेमबंध जुळून आल्यानंतर १९७० साली दोघांनी लग्नाचा निर्णय घेतला. हाच जगजीत सिंग आणि चित्रा सिंग या दांपत्याच्या संगीत कारकिर्दीतील टर्निंग पॉईंट ठरला. १९७५ साली एचएमव्ही कंपनीने जगजित सिंग यांना पहिला एलपी अल्बम बनवण्याची संधी दिली.

जगजित सिंग यांच्या गझलांचा समावेश असलेला 'द अनफर्गेटेबल्स' हा अल्बम आगळावेगळा ठरला. 'संगीत अल्बम' रुजूवात येथूनच झाली. जगजीत सिंग यांनी गझल गायकीला वेगळा आयाम देण्यासाठी सारंगी आणि तबल्याचा वापर केला. नंतर आलेला पंजाबी 'बिरहा दा सुलतान' हा अल्बम लोकप्रिय झाला. शिवकुमार बतलवी यांच्या कवितांना जगजित सिंग यांनी स्वरसाज चढवला. हा अल्बम आजही तेवढाच लोकप्रिय आहे.यानंतर जगजित–चित्रा सिंग यांचा पहिला 'कम अलाईव्ह' अल्बम नवा विक्रम नोंदवणारा होता. पाठोपाठ 'लाईव्ह अॅट वेंम्बले', 'लाईव्ह अॅट रॉयल अल्बर्ट हॉल' या रेकॉर्डेड कॉन्सर्टने गझलच्या दुनियेला नवी दिशा आणि कोट्यवधी चाहते मिळवून दिले. यानंतर जगजित सिंग यांनी मागे वळून पाहिलेच नाही. १९७९ आणि १९८२ सालीही सिंग दांपत्याच्या अल्बमने लोकप्रियतेचे शिखर गाठले. 'लाईव्ह कॉन्सर्ट' रेकॉर्ड करून जारी झालेले अल्बम लोकप्रिय होत गेले. जगजित सिंग एक अद्वितीय गझल गायक होते. आजही त्यांची गजल मनात रुंजी घालते. तो गोड आर्त आवाज रसिकांच्या हृदयाला आजही साद घालत असतो. ●

---

## सदाबहार रेखा

चेन्नई येथे १० ऑक्टोबर १९५४ ला जन्मलेल्या रेखा यांचे पूर्ण नाव भानुरेखा जेमिनी गणेशन. वडील जेमिनी गणेशन तमिळ स्टार आणि आई पुष्पापल्ली तेलगु अभिनेत्री अशी पारंपरिक फिल्मी कौटुंबिक पार्श्वभूमी लाभलेल्या रेखा यांना लहानपणीच बालकलाकार म्हणून रंगुला रत्नम या तेलगु चित्रपटात अभिनयाची संधी मिळाली. त्यानंतर १९७० मध्ये बॉलीवूडमध्ये आलेल्या त्यांच्या 'सावन भादो' या चित्रपटाने त्यांच्या अभिनयाच्या कारकिर्दीला खऱ्या अर्थाने वळण मिळाले.

अपार कष्ट, निश्चय, जिद्द, अदाकारी आणि आपल्या सौंदर्याच्या जोरावर रेखा यांना संपूर्ण अभिनेत्री मानले गेले. कारकीर्दीच्या प्रारंभी शहरी वातावरणाची आणि हिंदी भाषेची सवय नसल्याने तसेच सावळ्या रंगामुळे अपमानाचे अनेक प्रसंग अनुभवल्यानंतर रेखा यांनी स्वतःमध्ये बदल घडविण्याचे ठरविले आणि सौंदर्य देवतेची आराधना सुरु केली. शारीरिक सौंदर्याबरोबरच अभिनय, अचूक संवादफेक, हिंदी भाषा आदीमध्ये पारंगत होण्यासाठी महानायक अमिताभला गुरु मानले. त्यांच्या अभिनयावर, वागण्या–बोलण्याबरोबर अमिताभचा इतका प्रभाव पडला की त्यांना 'लेडी अमिताभ' म्हणून ओळखले जाऊ लागले. नियमित योगा, पोहणे, घरकाम आणि संतुलित आहाराच्या जोरावर रेखा आजही वयाच्या ७२ व्या वर्षीही तरुणींना लाजवेल अशी कामगिरी करत आहेत.१९७० च्या दशकामध्ये रेखा यांची अमिताभशी पडद्यावर केमिस्ट्री खूपच चांगली जमल्याने त्यांची जोडी हिट ठरली. मुकद्दर का सिकंदर, राम बलराम, खून पसीना, मिस्टर नटवरलाल सारख्या चित्रपटांतून या जोडीने बॉक्स ऑफिसवर धमाल केली. तथापि, या दोघांच्या प्रेमप्रकरणाचीही खूप चर्चा झाली. त्यानंतर अमिताभ–जया विवाहानंतर (१९७३) मध्ये अमिताभ आणि रेखा प्रथमता दो अनजाने (१९७६) या चित्रपटात दिसले. त्यानंतर १९८१ मध्ये सिलसिलामध्ये रेखा अमिताभ बरोबर शेवटच्या पडद्यावर दिसल्या. अर्थातच, सिलसिला बॉक्स ऑफिसवर सुपर–डुपर हिट ठरला. तथापि, अमिताभ यांच्या लग्नानंतर त्यांच्यामध्ये खूप बदल झाला आणि हा बदल मुजफ्फर अली यांच्या उमराव जानमध्ये दिसला. या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार सुद्धा मिळाला. ९० च्या दशकामध्ये मीरा नायर यांच्या कामसूत्र सारख्या चित्रपटाद्वारे रेखा यांनी अदाकारीचा पुढचा टप्पा गाठला. रेखा यांनी सुमारे १८० हून अधिक चित्रपटामध्ये विविध भूमिका साकारल्या असून त्यांनी शाहरुख खान समवेत ओम शांति ओम हा शेवटचा चित्रपट केला. असे असले तरी, रेखा आजही काही जवळच्या मित्रांच्या निवडक चित्रपटामध्ये काम करत आहेत. तीन वर्षापूर्वी त्यांनी छोट्या पडद्यावर पदार्पण केले असून स्टार प्लस वाहिनीवरील गुम है किसी के प्यार मे या मालिकेतून त्या प्रेक्षकांच्या भेटीस आल्या होत्या. बोल्ड आणि फेशनेबल फोटो शूटसाठी आपले लुक्स बदलण्यासाठी त्यांनी खूप प्रयोग केले. चित्रपट कारकीर्द सर्वोच्च शिखरावर असताना व्यक्तिगत जीवनामध्ये त्या फारच एकट्या होत्या. बिग बी च्या कथित कहाणीनंतर त्यांनी विनोद मेहरा शी लग्न केले. पण ते टिकू शकले नाही. त्यानंतर १९९० मध्ये दिल्लीच्या मुकेश अग्रवाल या उद्योगपतीशी त्यांचा विवाह झाला. विवाहाची चर्चाही बरीच झाली, पण अल्पावधीतच मुकेश यांनी आत्महत्या केली. त्यानंतर रेखा यांनी एकटीनेच जीवन व्यतीत करायचे ठरवले.संकलित रेखाजींच्या जन्मदिनानिमित्त त्यांना खूप खूप शुभेच्छा! ●

# पियानो

पियानोचा शोध इटलीतीलबार्टोलोमिओ किं स्टोफोरीयांनी अठराव्या शतकात लावला. पियानोचा गोड, गंभीर आणि भावपूर्ण आवाज विविध प्रकारच्या संगीतात–शास्त्रीय, जॅझ, पॉप, चित्रपटसंगीतात मोठ्या प्रमाणावर वापरला जातो.पियानोमध्ये साधारणतः८८ कीजअसतात. ५२ पांढऱ्या आणि३६ काळ्या. आत लोखंडी फें म असते. त्यावर स्टीलच्या ताराओढलेल्या असतात. की दाबल्यावर हातोड्यासारखे हॅमर तारांवर आपटले जाते आणि त्यामुळे आवाज निर्माण होतो. कीजवर हलके दाबले तर मृदू स्वर आणि जोरात दाबले तर तीव' स्वर मिळतो.



पियानो दोन्ही हातांनी वाजवला जातो. उजव्या हाताने प्रामु'याने धून वाजवली जाते.तर डाव्या हाताने साथसंगत दिली जाते. यात असलेल्या'पेडल्स' मुळे स्वर लांबवता किंवा मृदू करता येतात. बिथोवेन, मोझार्ट यांच्यासार'या अनेक महान संगीतकारांनी पियानोवर अप्रतिम रचना केल्या आहेत. आजही पियानो स्टेज शो, चर्च संगीत, चित्रपटसंगीत आणि पाश्चात्त्य संगीतासाठी आवश्यक आहे. गॅंड पियानो म्हणजे सर्वात मोठा आणि पारंपरिक पियानो.याच्यातारा आडव्या पसरलेल्या असतात.कॉन्सर्ट हॉलमध्ये याचा जास्त वापर होतो.अपराइट पियानोलहान आकाराचा आणि उभा असतो. घरगुती वापर, शाळा किंवा सरावासाठी वापरला जातो. याला जागा लागते. याची किंमतही तुलनेने कमी असते.डिजिटल पियानो हा इलेक्ट्रॉनिक पियानो आहे.याचाआवाज सॉफ्टवेअर आणि स्पीकर्समधून येतो.हा वजनाने हलका आणि पोर्टेबल असतो. वेगवेगळे इफेक्ट्स देऊ शकतो. पियानो आजही अत्यंत लोकप्रिय वाद्य आहे.

**ओळख वाद्यांची**

# देशोदेशीचे झेंडे

छोट्यांनो, प्रत्येक देशाचा झेंडा असतो. आपल्याला आपल्या तिरंग्याचा खूप अभिमान वाटतो. या तिरंग्यातही बरेच अर्थ दडले आहेत. प्रत्येक देशाच्या झेंड्याची रचना वेगळी, त्यातले रंग वेगळे... प्रत्येक देशाचा झेंडा विचारपूर्वक तयार करण्यात आला आहे. देशोदेशीच्या झेंड्यांविषयी...



■ अमेरिकेच्या झेंड्यावर ५० चांदण्या आणि १३ आडव्या पट्ट्या आहेत. यातल्या ५० चांदण्या म्हणजे अमेरिकेतली ५० राज्यं. सध्याचा अमेरिकेचा झेंडा १९६० मध्ये अस्तित्वात आला.

■ ब्रिटन म्हणजे युनायटेड किंग्डमच्या झेंड्याला युनियन जॅक असं म्हटलं जातं. १८०१ मध्ये हा युनियन जॅक अस्तित्वात आला. युनियन जॅकमध्ये तीन वेगवेगळे झेंडे आहेत. हा युनियन जॅक इंग्लंड, स्कॉटलंड आणि आयर्लंड या तीन देशांच्या झेंड्यांचं मिश्रण आहे.

■ आपल्या भारताचा तिरंगा २२ जुलै १९४७ मध्ये अस्तित्वात आला. आपल्या तिरंग्यात केशरी, पांढरा आणि हिरवा असे तीन रंग आहेत. मध्यभागी अशोकचक्र आहे. केशरी हा त्यागाचा, पांढरा शांततेचा तर हिरवा समृद्धीचा रंग आहे.

■ कॅनडाच्या झेंड्याच्या मध्यभागी एक पान पहायला मिळतं. या पानाला मॅपल लीफ असं म्हटलं जातं. या मॅपल लीफला अकरा टोकं आहेत. हे मॅपल लीफ कॅनडाचं राष्ट्रीय प्रतीक आहे. १९६५ मध्ये कॅनडाचा हा झेंडा अस्तित्वात आला.

**फन टाईम**

■ बांगलादेशचा झेंडा १९७२ मध्ये अस्तित्वात आला. हिरव्या रंगाच्या या झेंड्याच्या मध्यभागी लाल रंगाचा गोल आहे. बांगलादेशमधल्या हिरवाईचं प्रतीक म्हणून या झेंड्याचा रंग हिरवा आहे तर त्याच्या मध्यभागी असणारं लाल वर्तुळ बंगालमधल्या उगवत्या सूर्याचं तसंच बांगलादेशच्या स्वातंत्र्यासाठी आपले प्राण अर्पण करणाऱ्या वीरांच्या त्यागाचं प्रतीक आहे.



# काकेशस पर्वतरांगा

कॉकेशस पर्वतरांग युरेशियामध्ये आहे. याचे स्थान काळा समुद्र आणि कॅस्पियन समुद्र यांच्यामध्ये आहे. या पर्वतरांगेचे दोन भाग आहेत. मोठाकॉकेशस आणि लहान कॉकेशस. मोठ्या कॉकेशसमध्ये खूप उंच शिखरे आहेत. युरोपातील सर्वात उंच शिखर 'माउंट एल्ब्'स' याच रांगेत आहे. त्याची उंची सुमारे ५६४२ मीटर आहे. लहान कॉकेशस ही रांग थोडीशी कमी उंचीची आहे. कॉकेशस पर्वतरांग म्हणजे युरोप आणि आशिया यांचा सांधाजोड मानला जातो. त्यामुळे अनेक संस्कृती, जमाती आणि परंपरा येथे आढळतात. या प्रदेशात जॉर्जिया, आर्मेनिया, अझरबैजान आणि रशियाचा काही भाग यांचा समावेश होतो. पर्वतरांग असल्यामुळे हवामानात विविधता आढळते. उंच ठिकाणी बर्फ आणि हिमनद्या आहेत. तर दऱ्याखोऱ्यांमध्ये सुपीक जमीन असून शेती केली जाते.



**पर्वत शिखरे**

या पर्वतरांगेतूनटेरेक, कुबान, कुरो आणि अरास यासार'या अनेक महत्त्वाच्या नद्या उगम पावतात. ही पर्वतरांग समृद्ध जैवविविधतेसाठीही प्रसिद्ध आहे. येथे अस्वल, बिबट्या, लांडगे यांसारखे हिंस्र प्राणी आणि अनेक दुर्मिळ पक्षी आढळतात.कॉकेशस पर्वतरांगेला ऐतिहासिक दृष्ट्या मोठे स्थान आहे. येथे अनेक साम'ाज्यांनी सत्ता गाजवली. प्राचीन काळी व्यापार, संस्कृती आणि विचारांची देवाणघेवाण या मार्गाने होत होती.उंच डोंगर, बर्फाच्छादित शिखरे, दऱ्या आणि नद्या हे सर्व पर्यटकांना आकर्षित करतात. तसेच स्कीईंग, पर्वतारोहण यांसारखे खेळ येथे होतात. येथे राहणाऱ्या लोकांची भाषा, संगीत आणि परंपरा वेगळ्या व वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यामुळे कॉकेशस पर्वतरांग केवळ भौगोलिक दृष्ट्या नाही तर सांस्कृतिक दृष्ट्याही अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

# समुद्रातील रहस्यपूर्ण प्रवासी

जपानमधल्या ओसामु गावात तारो नावाचा एक कोळीराहत होता. एक दिवस समुद्रकिनारी त्याच्या जाळ्यात त्याला एक सोनेरी मासा आला. 'मला कृपा करून सोड. मी तुला भरपूर धनसंपत्ती देईन.' सोनेरी मासा म्हणाला. तारोला त्या पैशांचा लोभ सुटला. तो माशाच्या शेपटीला पकडून खोल समुद्रात गेला. त्याला समुद्राच्या खाली पाण्याखाली एक सुंदर राजमहाल दिसला. काही क्षणातच सोनेरी माशाने आपले रूप बदलले. ' मी समुद्राचा राजा आहे. माझे नाव ओटोमाईन. माझ्या राज्यात तुझे स्वागत आहे.'तो म्हणाला. त्याने तारोला आपल्या राजमहालात ठेवून घेतले. काही दिवस गेल्यावर तारो घरी निघाला तेव्हा त्याने त्याला भरपूर धनसंपत्ती दिली. रत्ने, दागदागिने, मोती दिले. तारो समुद्राच्या पाण्यातून वर आला आणि घरी गेला. पण सगळेच बदलले होते. ना त्याचे घर ना त्याची बायको, मुले, मित्र त्याला तिथे कुणीच भेटले नाही. तारोच्या ओळखीचे कुठेही काहीही नव्हते. निराश होऊन तारो गावातल्या बुद्धमंदिरात येऊन बसला. 'तू तारो आहेस ना ?' मान थरथरत असलेल्या एका म्हाताऱ्याने त्याला विचारले. त्याचे सगळे शरीर अगदी जर्जर झाले होते. 'तू इतकी वर्षे कुठे होतास तरी कुठे?' मी सोनेरी माशाबरोबर त्याच्या राज्यात गेलो होतो. त्याने मला भरपूर धन दिले आहे.' तारो म्हणाला. 'आता याचा काय उपयोग ? तू गेलास त्याला १०० वर्षे होऊन गेली. तारो, धन मिळवण्याच्या मोहात तू तुझे बाकी सगळे आयुष्य हरवून बसलास.' म्हातारा म्हणाला. आपण काय केले हे तारोला कळले. पण आता काय उपयोग. बिचारा तारो! समुद्राच्या काठावर जाऊन बसला. 'मला हे धन नको, मला माझे जग परत दे.' तो सोनेरी माशाला हाका मारीत राहिला. पण तो सोनेरी मासा त्याला कधीही परत भेटला नाही.



**जपानी लोककथा**

# करिअर ॲस्ट्रोफिजिक्समधलं

तुम्हाला विज्ञानाची आवड असेल, संशोधनाच्या क्षेत्रात काही करायचं असेल तर ॲस्ट्रोफिजिक्स आणि स्पेस टेक्नॉलॉजीशी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण करता येतील. फिजिक्स किंवा ॲस्ट्रोफिजिक्स या क्षेत्रांमध्ये पदवी मिळवल्यानंतर तुम्ही मास्टर्स पदवी मिळवू शकता. या क्षेत्रात करिअर करण्यासाठी मास्टर्स पदवी मिळवणं गरजेचं आहे. मास्टर्स केल्यानंतर तुम्ही पीएचडीही मिळवू शकता. पीएचडी केल्यानंतर या



क्षेत्रात तुम्हाला बऱ्याच संधी मिळू शकतील.

विज्ञानाच्या क्षेत्रात काही वेगळं करायचं असेल तर तुम्ही या विषयाची निवड करू शकता. या क्षेत्रांमधल्या करिअरमुळे तुम्हाला अनेकविध प्रोजेक्ट्सवर काम करता येईल. अत्यंत महत्त्वाकांक्षी अशी ही प्रोजेक्ट्स तुम्हाला आयुष्यात पुढे जायला मदत करतील.

**कोण होणार?**

देशभरातल्या विविध संस्थांमध्ये ॲस्ट्रोफिजिक्स विषयाशी संबंधित अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ ॲस्ट्रोफिजिक्समध्ये इंटिग्रेटेड एमएससी आणि पीएचडीचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. विविध शहरांमधल्या विद्यापीठांमधूनही तुम्ही हा अभ्यासक्रम पूर्ण करू शकता.

या क्षेत्रात करिअर करण्यासाठी तुम्ही प्रचंड मेहनतीसाठी तयार असायला हवं. सततचा अभ्यास आणि संशोधन करून तुम्ही पुढे जाऊ शकता.





# कोण करतंय फोन?

दोस्तांनो, बऱ्याचजणांच्या फोनमध्ये ट्रू कॉलर हे ॲप डाउनलोड केलेलं असतं. या ॲपचे बरेच फायदे आहेत. या ॲपवरची विविध फीचर्स खूप उपयुक्त ठरतात. एखादा कॉल येण्यापूर्वी ट्रू कॉलरच्या माध्यमातून त्याची आधीच सूचना मिळते. यामुळे आपल्याला कोण फोन करतंय हे आधीच कळतं. मग तो फोन उचलायचा की नाही हे आपण ठरवू शकतो. ट्रू कॉलरचं हे फीचर नेमकं कसं काम करतं याविषयी...

**स्मार्ट टेक**

ट्रू कॉलर ॲप असणाऱ्या फोनमधून तुम्हाला फोन आला तर फोन करणाऱ्याचं नाव फोनची रिंग वाजण्याआधीच कळतं. फोन करतेवेळी युजरच्या फोनमधल्या डाटा किंवा वायफायचा वापर होतो. यामुळे फोनची सूचना समोरच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवणं सोपं होतं. कोणत्याही सेल्यूलर नेटवर्कच्या तुलनेत डाटा किंवा वायफायची गती अधिक असते. त्यामुळे आपल्याला नेमकं कोण फोन करतंय हे आधीच कळू शकतं. ट्रू कॉलरच्या या फीचरमुळे दोन व्यक्तींना अगदी सुरक्षितपणे संवाद साधता येतो. हे फीचर अँड्रॉइड आणि आयओएस अशा दोन्ही ऑपरेटिंग सिस्टिम्सवर काम करतं.



# आनंदी राहण्यासाठी...

मित्रांनो, लोकांना आनंदी, मनमिळावू माणसं खूप आवडतात. दु:खी, उदास, सतत नकारात्मक बोलणाऱ्या लोकांना लांब ठेवलं जातं. म्हणूनच आयुष्यात आनंदी राहणं खूप गरजेचं आहे. आनंदी राहण्यासाठी नेमकं काय करायला हवं? जाणून घेऊ.

- आनंदी राहण्यासाठी निरोगी असणं खूप आवश्यक आहे. तुमची तब्बेत चांगली असेल तर काहीही करता येतं. पोषक आहार घ्या. भरपूर व्यायाम करा. खेळा. यामुळे तुमचं मनही आनंदी राहील.
- मित्रमैत्रिणींमुळे तुम्ही आनंदी राहू शकता. म्हणूनच चांगल्या मित्रमैत्रिणींच्या सोबत राहा. सकारात्मक विचार करणाऱ्या मुलामुलींशी मैत्री करा. इतरांच्या सकारात्मक विचारसरणीमुळे आपल्यालाही बरं वाटतं.

**वाचा तर खरं**

- आजच्या काळात फक्त अभ्यास करून भागणार नाही. तुम्हाला एखादी कला अवगत असायला हवी. तुम्ही चांगला छंद जोपासा. नवं काहीतरी शिका. यामुळे तुमचा उत्साह आणि आत्मविश्वास दोन्ही वाढेल.
- मुलांनो, नेहमी सकारात्मक विचार करत राहा. सकारात्मक विचारांमुळेच आपण पुढे जाऊ शकतो. स्वत:ची इतरांशी तुलना करू नका. इतरांबाबत असूया बाळगू नका.
- ताणतणाव हा आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. ताण दूर ठेवण्यासाठी बरेच उपाय करता येतील. योगासनं, ध्यान करून तुम्ही ताणाला लांब ठेऊ शकता. ताण कमी झाल्यावर तुम्हाला बरं वाटेल.



**ठिपके जुळवा**



**दोस्त हे मस्त**

## विश्व बिबट्यांचं



छोट्यांनो, तुम्ही बिबट्या बघितला असेल. विविध प्राणीसंग्रहालयांमध्ये बिबट्या असतो. जंगलातला बिबट्या मानवी वस्तीत आल्याच्या बातम्याही तुम्ही ऐकल्या असतील. बिबट्या भारतासह चीन आणि आफ्रिकेमध्येही आढळतो. आफ्रिकेत काळ्या रंगाचा बिबट्या आढळतो. त्याला ब्लॅक पँथर असं म्हटलं जातं. बिबट्याला छान पोहता येतं. तो नदी, तलावात अगदी सहज पोहू शकतो. बिबट्या झाडावरही चढू शकतो. बिबट्या १० ते १५ वर्षं जगतो.

**खादाडी**

## झक्कास पॉपकॉर्न बार



छोट्यांनो, तुम्हाला पॉपकॉर्न आवडत असतील. मग याच पॉपकॉर्नला ट्विस्ट देऊन तुम्ही मस्तपैकी पॉपकॉर्न बार बनवू शकता. यासाठी पाच कप पॉपकॉर्न, एक कप साखर, अर्धा कप पीनट बटर आणि अर्धा चमचा व्हॅनिला इसेन्स असं साहित्य लागेल. एक भांडं घ्या. त्यात पाणी आणि साखर घालून पाक तयार करून घ्या. आता गॅस बंद करून भांडं खाली काढून घ्या. त्यात पीनट बटर आणि व्हॅनिला इसेन्स घालून नीट मिसळून घ्या. मग या मिश्रणात पॉपकॉर्न घाला. आता एका ट्रेमध्ये किंवा थाळीत पॉपकॉर्न पसरवून घ्या. थोडं थंड होऊ द्या. मग पॉपकॉर्नचे हे बार कापून घ्या. मस्तपैकी खा. संध्याकाळचा खाऊ म्हणून असे बार बनवायला काहीच हरकत नाही.

**स्टडी टिप्स**

## मेंदूला द्या विश्रांती...



मित्रांनो, खूप अभ्यास करून तुम्ही दमता. खरं तर आपला मेंदू दमलेला असतो. या मेंदूला थोडा निवांतपणा हवा असतो. मग आपण मोबाईल हातात घेतो. गेम्स खेळतो. सोशल मीडिया बघतो. पण यामुळे मेंदूवरचा ताण जास्त वाढू शकतो. त्यामुळे घरी बसून मोबाईलवर गेम खेळण्यापेक्षा तुम्ही मैदानी खेळ खेळा. गाणी ऐका किंवा आवडीचं पुस्तक वाचा.

**योगा टाईम**

## योगा सुरू करताना...



मुलांनो, तुम्हालाही योगा करावासा वाटतो का? लहान मुलांसाठीही खास योगवर्ग असतात. पण योगा करताना काही नियमांचं पालन करावं लागतं. सर्वात महत्त्वाचं म्हणजे जेवल्यानंतर लगेच योगा करू नये. जेवल्यानंतर साधारण तीन तासांनी योगा करता येईल. जेवल्यानंतर आपण फक्त वज्रासनात बसू शकतो. त्यामुळे योगा क्लासला जात असाल तर क्लासच्या वेळेच्या तीन तास आधी जेवा.

### कसोटी, वनडे आणि टी-२० नंतर आता
# क्रिकेटचा नवीन डाव टेस्ट ट्वेंटी



| मुंबई | वृत्तसंस्था |

क्रिकेटमध्ये एका नवीन फॉरमॅटचा जन्म झाला आहे, ज्याचे नाव 'टेस्ट ट्वेंटी' असे आहे. हा फॉरमॅट टेस्ट क्रिकेट आणि टी-२० क्रिकेटचे मिश्रण आहे. वेस्ट इंडिजचे सर क्लाइव्ह लॉयड, दक्षिण आफ्रिकेचे एबी डिव्हिलियर्स, ऑस्ट्रेलियाचे मॅथ्यू हेडन आणि भारताचे हरभजन सिंग यांसारखे दिग्गज खेळाडू या फॉरमॅटच्या सल्लागार मंडळात सामील आहेत. राजस्थान रॉयल्सचे माजी सीईओ माइकल फोर्डहम मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त झाले आहेत. हा जगातील पहिला ८० षटकांचा फॉरमॅट असेल, ज्यात प्रत्येक संघाला २०-२० षटकांच्या दोन डावात फलंदाजी करण्याची संधी मिळेल. टेस्ट ट्वेंटीचा पहिला हंगाम जानेवारी २०२६ मध्ये सुरू होणार आहे, ज्यात सहा फ्रँचायझी सहभागी होतील.

टेस्ट ट्वेंटी हा फॉरमॅट टेस्ट क्रिकेटच्या पैलूंना टी क्रिकेटसोबत जोडण्याचा प्रयत्न करेल. हा जगातील पहिला ८० षटकांचा फॉरमॅट असेल. दोन्ही संघांना एकाच वेळी ४० षटकांचे सामने खेळण्याऐवजी, त्यांना २०-२० षटकांच्या दोन डावात फलंदाजी करण्याची संधी मिळेल. प्रत्येक संघ दोनदा फलंदाजी करेल, जसे टेस्ट सामन्यांमध्ये होते. या फॉरमॅटमध्ये टेस्ट आणि टी क्रिकेटचे नियम लागू होतील. यात विजय, पराभव, टाय किंवा ड्रॉ असे सर्व चार निकाल शक्य असतील.

टेस्ट ट्वेंटीचा पहिला हंगाम जानेवारी २०२६ मध्ये सुरू होईल. यात सहा फ्रँचायझी भाग घेतील. यापैकी तीन फ्रँचायझी भारताचे प्रतिनिधित्व करतील, तर उर्वरित तीन फ्रँचायझी दुबई, लंडन आणि युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकाचे प्रतिनिधित्व करतील. प्रत्येक संघात १६ खेळाडू असतील. या नवीन फॉरमॅटचे अधिकृत उद्घाटन १६ ऑक्टोबर रोजी झाले. टेस्ट ट्वेंटी हा द वन वन सिक्स नेटवर्कचे कार्यकारी अध्यक्ष गौरव बहिरवानी यांच्या कल्पनेतून साकारला आहे. या फॉरमॅटचे माजी क्रिकेटपटूंनी कौतुक केले आहे.

या नवीन फॉरमॅटमध्ये युवा खेळाडूंना संधी मिळेल, असे मत व्यक्त केले जात आहे. विशेषतः १३ ते १९ वयोगटातील खेळाडूंसाठी हा एक चांगला प्लॅटफॉर्म ठरू शकतो.

या फॉरमॅटमुळे क्रिकेटमध्ये नवीनता येईल आणि प्रेक्षकांनाही एक वेगळा अनुभव मिळेल अशी अपेक्षा आहे. टेस्ट क्रिकेटची पारंपरिकता आणि टी क्रिकेटचा वेग यांचा संगम या फॉरमॅटमध्ये पाहायला मिळेल.

## भारतामध्ये होणार टी-२० वर्ल्ड कप २०२६



| मुंबई | प्रतिनिधी |

टी-२० विश्वचषक २०२६ चे वेळापत्रक निश्चित झाले असून, भारत आणि श्रीलंका संयुक्तपणे या स्पर्धेचे आयोजन करणार आहेत. या मोठ्या स्पर्धेत एकूण २० संघ सहभागी होतील, ज्यापैकी काही संघांची निवड टी २० विश्वचषक २०२४ मधून झाली होती, तर उर्वरित संघ पात्रता फेरीतून आपले स्थान निश्चित करत आहेत.

ईस्ट-एशिया पॅसिफिक पात्रता फेरी २०२५ मधून तीन संघांची नावे निश्चित होणार होती. १५ ऑक्टोबर रोजी नेपाळ आणि ओमानने आपले स्थान पक्के केले होते, ज्यामुळे एकूण १९ संघांची नावे निश्चित झाली होती. आता संयुक्त अरब अमिरातीनेदेखील या मोठ्या स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले आहे. यासह, टी २० विश्वचषक २०२६ मध्ये भाग घेणाऱ्या सर्व २० संघांची नावे निश्चित झाली आहेत.

संयुक्त अरब अमिरातीने जपानला हरवून ईस्ट-एशिया पॅसिफिक पात्रता फेरी २०२५ मध्ये आपले स्थान पक्के केले. १६ ऑक्टोबर रोजी सुपर सिक्समध्ये यूएई आणि जपान यांच्यात अल-अमरात क्रिकेट मैदानावर सामना खेळला गेला. या सामन्यात यूएईने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर त्यांनी जपानला २० षटकांत ११६ धावांवर रोखले. यूएईकडून लक्ष्याचा पाठलाग करताना अलिशान शर्फू आणि कर्णधार मोहम्मद वसीम यांनी शानदार सुरुवात केली. त्यांच्यात पहिल्या विकेटसाठी ७० धावांची भागीदारी झाली. या भागीदारीच्या जोरावर यूएईने १२.१ षटकांत २ गडी गमावून लक्ष्य गाठले आणि टी विश्वचषक २०२६ साठी आपले स्थान निश्चित केले.

२० विश्वचषक २०२६ साठी पात्र ठरलेल्या संघांमध्ये भारत, श्रीलंका, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, अफगाणिस्तान, बांगलादेश, यूएसए, वेस्ट इंडिज, आयर्लंड, न्यूझीलंड, पाकिस्तान, कॅनडा, इटली, नेदरलँड्स, नामिबिया, झिम्बाब्वे, नेपाळ, ओमान आणि यूएई यांचा समावेश आहे.दरम्यान, टी-२० विश्वचषक २०२६ साठी सर्व २० संघांची नावे आता निश्चित झाली आहेत. या संघांमध्ये क्रिकेट जगतातील अनेक प्रमुख संघांचा समावेश आहे.

## निवडक

### राष्ट्रकुल स्पर्धांसाठी अहमदाबाद सज्ज

**अहमदाबाद** : राष्ट्रकुल स्पर्धा २०३० चं यजमानपद भुषवण्यासाठी अहमदाबाद सज्ज झालं आहे. राष्ट्रकुल स्पर्धा कार्यकारी मंडळाने अहमदाबादमध्ये स्पर्धांचं यजमानपद मिळावं अशी शिफारस करणार असल्याचं म्हटलं आहे. अहमदाबादला राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचं यजमानपद दिलं जावं यासाठी ही शिफारस केली जाणार आहे. या संदर्भातला अंतिम निर्णय २६ नोव्हेंबर २०२५ ला ग्लासगोमध्ये होणाऱ्या महासभेत घेतला जाईल. भारताच्या बाजूने निर्णय झाला तर भारताला दुसऱ्यांदा राष्ट्रकुल स्पर्धांचं यजमानपद मिळणार आहे. याआधी २०१० मध्ये दिल्लीत या स्पर्धा रंगल्या होत्या. त्यावेळी देशात काँग्रेसचं सरकार होतं. राष्ट्रकुल स्पर्धांमधल्या ढिसाळ नियोजनावरुन आणि भ्रष्टाचाराच्या प्रकरणावरुन तेव्हा केंद्र सरकारला टीका सहन करावी लागली होती. आता २०३० मध्ये यजमानपद जर भारताला मिळालं तर अहमदाबादमध्ये कसं नियोजन असणार? याकडे सगळ्या देशाचं लक्ष असणार आहे.

### रजत पाटीदारचे वादळी द्विशतक

**मुंबई** : इंडियन प्रीमिअर लीग आणि इराणी चषक स्पर्धा विजेता कर्णधार रजत पाटीदार याने रणजी करंडक स्पर्धेत द्विशतकी खेळी केली. रजतने सातत्य दाखवताना पंजाबच्या गोलंदाजांना चांगला चोप दिला. मध्य प्रदेशचा कर्णधार म्हणून खेळताना रजतने प्रथम श्रेणी क्रिकेटमधील त्याचे पहिले द्विशतक साजरे केले. त्याने या खेळीत २६ चौकार लगावताना मध्य प्रदेशला पहिल्या डावात आतापर्यंत २७६ धावांची आघाडी मिळवून दिली आहे. पंजाबच्या पहिल्या डावातील २३२ धावांच्या प्रत्युत्तरात मध्य प्रदेशने १४६ षटकांत ८ बाद ५१९ धावा केल्या आहेत. सारांश जैन ( ६-७५) याच्या दमदार गोलंदाजीने पंजाबच्या फलंदाजांना हतबल केले. त्यांचा संपूर्ण संघ ८४.३ षटकांत २३२ धावांत तंबूत परतला. पंजाबकडून उदय सहरण याने ७५ धावांची खेळी केली, तर कर्णधार नमन धीर ( ३९) व नेहाल वढेरा ( २३) यांनीही चांगला खेळ केला. पण, ते पंजाबला मोठी धावसंख्या गाठून देऊ शकले नाहीत.

### यू मुंबाचा तेलुगू टायटन्सवर विजय

**नवी दिल्ली** : प्रो कबड्डी लीग २०२५ स्पर्धेतील ८९ वा सामना यू मुंबा आणि तेलुगू टायटन्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात यू मुंबाने गेल्या सामन्यातील पराभवाची परतफेड करत दमदार विजयाची नोंद केली आहे. बचावपटू आणि चढाईपटूंच्या दमदार कामगिरीच्या बळावर यू मुंबाने हा सामना ३३-२६ च्या फरकाने जिंकला आहे..त्यागराज इनडोअर स्टेडियममध्ये पार पडलेल्या या सामन्यात यू मुंबाकडून अजित चौहानकडून ८ गुणांची कमाई केली. तर संदीप कुमारने ४ गुण कमावले. तर तेलुगू टायटन्सकडून विजय मलिकने आपलं सुपर १० पूर्ण केलं.या सामन्यात यू मुंबाकडून अजित चौहान पहिली चढाई करण्यासाठी आला. त्याने पाहिल्याच चढाईत बोनस गुण घेत संघाचं खातं उघडलं. दुसऱ्या चढाईत त्याने २ गुणांची कमाई करत गुणसंख्येत भर घातली. तर तेलुगू टायटन्सकडून भरतने १ गुण घेत संघाचं खातं उघडलं. सुरुवातीच्या ५ मिनिटांचा खेळ झाल्यानंतर यू मुंबाचा संघ ७-३ गुणांसह ४ गुणांनी आघाडीवर होता. सुरुवातीच्या १० मिनिटांचा खेळ पूर्ण झाल्यानंतर यू मुंबाचा संघ ८-७ गुणांसह केवळ १ गुणाने आघाडीवर होता.

### पॉवर लिफ्टींग स्पर्धेत डोंबिवलीचा डंका

**डोंबिवली** : नवी दिल्ली येथे नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय पॉवर लिफ्टींग स्पर्धेत डोंबिवलीतील तीन स्पर्धकांनी सुवर्ण पदकासह एकूण आठ पदके पटकावली आहेत. वर्ल्ड रॉ पॉवर लिफ्टिंग फेडरेशनच्या पुढाकाराने ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत देशाच्या तेरा राज्यांमधील एकूण ३० स्पर्धक सहभागी झाले होते. महाराष्ट्रातून ३१ स्पर्धक सहभागी झाले होते. त्यात डोंबिवलीच्या स्पर्धकांचा समावेश होता.ही स्पर्धा दिल्ली येथे बुरारी येथील जलसा सभागृहात पार पडली. वर्ल्ड रॉ पॉवर लिफ्टिंग फेडरेशनचे सुनील लोचब यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा पार पडली. यावेळी दिल्ली बुरारी विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजीव झा उपस्थित होते.या स्पर्धेतील मास्टर दोन ७६.५ किलो वजनी गटात डोंबिवलीतील समीर जोगळेकर यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेतील आव्हानात्मक परिस्थितीवर मात करून जोगळेकर यांनी चार सुवर्ण पदके पटकावली. उप कनिष्ठ गटात सर्वेश वंजारे यांनी ९० किलो वजनी गटात दोन सुवर्ण पदके मिळवली. कनिष्ठ १०५ किलो वजनी गटात अभिराज गिरकर यांनी एक रौप्य आणि एक कांस्य पदक पटकावले.महिला वरिष्ठ ७५ किलो वजनी गटात दीपाली घाग यांनी क्लासिकमध्ये दोन सुवर्ण पदके पटाकवली. एक स्ट्राँग वूमनच्या मानकरी त्या ठरल्या.

## भारत-पाक महिला विश्वचषक मॅचने मोडला प्रेक्षक संख्येचा विक्रम

### २.८४ कोटी प्रेक्षक, १८७ कोटी मिनिटे वॉच टाइम

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

महिला विश्वचषक २०२५ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्याने प्रेक्षकांचा एक नवीन विक्रम प्रस्थापित केला. आयसीसीच्या मते, ५ ऑक्टोबर रोजी कोलंबोमध्ये खेळल्या गेलेल्या या सामन्याला २.८४ कोटी प्रेक्षक मिळाले, एकूण १८७ कोटी मिनिटे वॉच टाइम. हा आतापर्यंतचा सर्वाधिक पाहिलेला महिला आंतरराष्ट्रीय सामना ठरला.



आयसीसीने म्हटले आहे की हा सामना प्रेक्षकांच्या संख्येच्या बाबतीत सर्वोत्तम होता, परंतु विश्वचषक लीग टप्प्याच्या पहिल्या सहामाहीत डिजिटल टीव्ही प्लॅटफॉर्मवर विक्रमी संख्या देखील पाहायला मिळाली. भारत-पाकिस्तान सामन्याने महिला विश्वचषक इतिहासात सर्वाधिक लीग स्टेज टीव्ही प्रेक्षकसंख्या गाठली. श्रीलंका, पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिका विरुद्ध भारताच्या सामन्यांसह पहिले ११ सामने एकूण ७२ दशलक्ष प्रेक्षकांनी पाहिले. २०२२ च्या विश्वचषकाच्या तुलनेत हे १६६% वाढ दर्शवते. या सामन्यांमुळे एकूण ६.३ अब्ज मिनिटे पाहण्याचा वेळ निर्माण झाला.

आयसीसीने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, स्पर्धेच्या पहिल्या १३ सामन्यांना आधीच ६ कोटी प्रेक्षक मिळाले आहेत. २०२२ च्या आवृत्तीच्या तुलनेत ही वाढ पाच पट आहे. पहिल्या १३ सामन्यांमध्ये एकूण ७ अब्ज मिनिटे पाहिली गेली. मागील स्पर्धेपेक्षा हे १२ पट जास्त आहे. आयसीसीने अहवाल दिला की १२ ऑक्टोबर रोजी भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील सामन्याला जिओहॉटस्टारवर एकाच वेळी ४८ लाख प्रेक्षक होते.

## अभिषेक शर्मा आयसीसी प्लेअर ऑफ द मंथ

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

अभिषेक शर्मा याला सप्टेंबर महिन्याचा आयसीसी प्लेअर ऑफ द मंथ म्हणून निवडण्यात आले आहे. गेल्या महिन्यात, टी-२० आशिया कप दरम्यान, त्याने भारतासाठी फलंदाजीची सुरुवात केली आणि सातपैकी सहा साम न्यांमध्ये दमदार सुरुवात केली. ३१४ धावा केल्याबद्दल त्याला प्लेअर ऑफ द सिरीज पुरस्कारही मिळाला.आयसीसीच्या मासिक पुरस्कारांच्या शर्यतीत अभिषेक शर्माने भारताचा चायनामॅन स्पिनर कुलदीप यादव आणि झिम्बाब्वेचा सलामीवीर फलंदाज ब्रायन बेनेट यांना मागे टाकले. कुलदीपने आशिया कपमध्ये १७ विकेट्स घेतल्या, तर बेनेटने टी-२० विश्वचषक पात्रता फेरीत शतक झळकावले. पुरस्कार मिळाल्यानंतर अभिषेकने आयसीसीला सांगितले की, हा पुरस्कार जिंकून खूप आनंद होत आहे.

## ग्रीन भारताविरुद्ध वनडे मालिकेतून बाहेर

| पर्थ | वृत्तसंस्था |

ऑस्ट्रेलियाचा अष्टपैडू कॅमेरून ग्रीनला पाठदुखीमुळे भारताविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतून बाहेर पडावे लागले आहे. त्याच्या जागी मार्नस लाबुशेनला संघात स्थान देण्यात आले आहे.टीम इंडिया सध्या ऑस्ट्रेलियादौऱ्यावरआहे, जिथे ते तीन एकदिवसीय आणि पाच टी-२० सामने खेळतील. पहिला एकदिवसीय सामना १९ ऑक्टोबर रोजी पर्थमध्ये खेळला जाईल. ग्रीन शेफील्ड शिल्डमध्ये खेळू शकतो



क्रिकेट ऑस्ट्रेलियाने जाहीर केले की स्टार अष्टपैलू कॅमेरॉन ग्रीन भारताविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत सहभागी होणार नाही. त्याला दुखापत झाली आहे. तथापि, ऑस्ट्रेलिया त्याच्यासोबत कोणताही धोका पत्करण्यास तयार नाही, कारण अ‍ॅशेस मालिका त्यांच्यासाठी अधिक महत्त्वाची आहे. अ‍ॅशेससाठी सज्ज राहण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून ग्रीनला वगळण्यात आले आहे. तथापि, तो २८ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या शेफील्ड शिल्डमध्ये खेळेल.

ग्रीनलाथोड्या काळासाठी पुनर्वसन करावे लागेल आणि शेफील्ड शिल्डच्या तिसऱ्या फेरीत त्याच्या प्रगतीचे मूल्यांकन केले जाईल, असे सीएने एका निवेदनात म्हटले आहे. मार्नस लाबुशेनला एकदिवसीय संघात स्थान देण्यात आले नाही. त्याला वगळण्याचे मुख्य कारण त्याची खराब कामगिरी होती.

### आशिया कपमधून बीसीसीआयला
## १०० कोटींचा नफा



| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

आशिया कप जिंकल्यानंतर भारताला ट्रॉफी मिळाली नसली तरी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला सुमारे १०० कोटींचा फायदा झाला आहे, असा दावा टीओआयच्या अहवालात करण्यात आला आहे.

आंतरराष्ट्रीय दौऱ्यांमध्ये बीसीसीआयला १०९.४४ कोटी रुपयांचा फायदा होईल. यामध्ये आशिया कप यजमान शुल्क तसेच टी २० विश्वचषक सहभाग शुल्कातून आंतरराष्ट्रीय दौऱ्याचे फायदे समाविष्ट आहेत. बीसीसीआयला २०२५-२६ आर्थिक वर्षात ६,७०० कोटी रुपयांचा नफा अपेक्षित आहे, जो २०१७-१८ मध्ये त्यांनी कमावलेल्या ६६६ कोटी रुपयांपेक्षा १० पट जास्त आहे.

### सुदेष्णाची तेलंगणात सुवर्ण कामगिरी

**सातारा** : वारंगळ येथे सुरू असलेल्या खुल्या राष्ट्रीय मैदानी स्पर्धेत २३ वर्षांखालील गटात साताऱ्यातील सुदेष्णा हणमंत शिवणकरने १०० मीटर धावण्यात सुवर्णपदक पटकाविले. या स्पर्धेत तिने ११.६६ अशी वेळ नोंदविली. सुदेष्णाने वर्षातील तीन महत्त्वाच्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदकांची हॅट्ट्रिक साधली आहे. खर्शी गावातील सुदेष्णा शिवणकर ही तेलंगण येथील नॅशनल अ‍ॅथलेटिक्स स्पर्धेत वेगवान धावपटू ठरली. तिने वर्षभरात उत्तराखंड येथे झालेल्या नॅशनल गेम्स स्पर्धेच्या १०० मीटरमध्ये सुवर्णपदक, रांची येथील सिनियर नॅशनल अ‍ॅथलेटिक्स चॅम्पियनशिपच्या १०० मीटरमध्ये रौप्यपदक आणि वारंगळ येथे सुवर्णपदक मिळवून दिले.

### आरडीसीए आयोजित क्रिकेट स्पर्धेत
## महाडच्या उमंग चौहानचे शतक

| महाड | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन आयोजित चौदा वर्षाखालील एकदिवसीय लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत एसबीसी महाड संघाच्या उमंग चौहान याने शतकी खेळी करत ९४ चेंडूचा सामना करत १६ चौकाराच्या सहाय्याने १०९ धावा काढून संघाला विजय मिळवून दिला.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या चौदा वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेतील साखळी फेरीच्या सामन्यात महाडच्या एसबीसी क्रिकेट अकॅडमी महाड संघाने आयडियल क्रिकेट अकॅडमी कामोठे संघावर १२९ धावाने विजय मिळवला.प्रथम फलंदाजी करतांना एसबीसी महाड संघाने ३८ षटकात ७ गडी बाद २४४ धावा धावफलकावर नोंदवल्या त्यामध्ये सलामीला आलेल्या उमंग चौहानने तुफान फलंदाजी करत शतक ठोकले त्याने १०९ धावा काढल्या त्याला अर्णव गायकवाड यांनी २५ व रोहित पाटील यांनी २४ धावा काढून साथ दिली. आयडियल कामोठे संघाकडून तनिष्क बिले यांनी २ फलंदाज बाद केले.प्रतिउत्तर देताना आयडियल क्रिकेट अकॅडमी कामोठे संघाने ३८ षटकात चार गडी गमावत ११५ धावा काढल्या त्यामध्ये तनिष्क बिले यांनी सर्वाधिक ३९ तर विनय चिकने यांनी २७ धावांचे योगदान संघाला दिले.महाड कडून रियान जोशी,शाहजीब नाईक,समर्थ वाडीले यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. एसबीसी क्रिकेट अकॅडमीचे प्रशिक्षक आवेश चिचकर,एसबीसी महाडचे संस्थापक अध्यक्ष बशीर चिचकर यांनी अभिनंदन केले आहे.



### महिला एकदिवसीय विश्वचषक | ऑस्ट्रेलियाचा उपांत्य फेरीत प्रवेश
# बांगलादेशचा १० गड्यांनी दणदणीत पराभव

| विशाखापट्टणम | वृत्तसंस्था |

गतविजेत्या ऑस्ट्रेलियाने महिला एकदिवसीय विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. गुरुवारी विशाखापट्टणम येथे झालेल्या सामन्यातऑस्ट्रेलियानेबांगलादेशचा १० विकेट्सने पराभव केला. डॉ. वाय.एस. राजशेखर स्टेडियमवर झालेल्या सामन्यात बांगलादेशने फलंदाजीचा निर्णय घेतला आणि नऊ बाद १९८ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाने २४.५ षटकांत एकही विकेट न गमावता लक्ष्य गाठले.

ऑस्ट्रेलियाची कर्णधार एलिसा हिलीने सलग दुसरे शतक झळकावले. तिचे शतक फक्त ७३ चेंडूत झाले, जे विश्वचषकातील दुसरे सर्वात जलद शतक ठरले. वेस्ट इंडिजच्या डिएंड्रा डॉटिनने ७१ चेंडूत तिचे शतक पूर्ण केले. ऑस्ट्रेलियाकडून फोबी लिचफिल्डने ८४ धावा केल्या.

**दमदार सुरुवातीनंतर बांगलादेशचा पराभव**

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेणाऱ्या बांगलादेशने ३२ धावांवर पहिली विकेट गमावली. फरगाना हक ८ धावांवर बाद झाली. तेथून रुबिया हैदरने शर्मीन अख्तरसह संघाला ७० धावांच्या पुढे नेले. रुबिया ४४ धावांवर बाद झाली. तेथून, संघाने स्थिर गतीने विकेट गमावण्यास सुरुवात केली.

शर्मीनने १९, कर्णधार निगार सुलतानाने १२, शोर्ना अख्तरने ७, रितू मोनीने २, फहिमा खातूनने ४, राबेया खानने ६ आणि निशिता अख्तरने १ धावा केल्या. शोभनाने शेवटपर्यंत ६६ धावा करत संघाला १९८ पर्यंत नेले.

ऑस्ट्रेलियाकडून लेग-स्पिनर जॉर्जिया वेअरहॅमने २२ धावा देत २ बळी घेतले. अलाना किंगने ४ मेडन ओव्हर टाकल्या, १० षटकांत १८ धावा दिल्या आणि २ बळीही घेतले. ऑफ-स्पिनर अ‍ॅशले गार्डनर आणि वेगवान गोलंदाज अ‍ॅनाबेल सदरलँडनेही प्रत्येकी २ बळी घेतले. डार्सी ब्राउनला विकेट मिळाली नाही, तर मेगन शटला १ बळी मिळाला.

१९९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, ऑस्ट्रेलिया महिला संघाच्या सलामीवीरांनी त्यांना विजय मिळवून दिला. एलिसा हिली आणि फोबी लिचफिल्ड यांनी १० षटकांत ७८ धावा केल्या. १४ व्या षटकात संघाने शतक पूर्ण केले. २० षटकांनंतर, १४५ धावा झाल्या आणि संघाने २४.५ षटकांत विजय मिळवला. बांगलादेशच्या गोलंदाजांना विकेट मिळाली नाही.

गतविजेत्या आणि सात वेळा विजेत्या ऑस्ट्रेलियाने बांगलादेशला हरवून पुन्हा एकदा उपांत्य फेरीत प्रवेश केला. श्रीलंकेविरुद्धचा सामना अनिर्णित राहिल्यानंतर, स्पर्धेतील पाच सामन्यांमधील हा त्यांचा चौथा विजय होता. दुसरीकडे, बांगलादेशने पाचपैकी चार सामने गमावले आहेत. आणखी एका पराभवामुळे बाद फेरीत पोहोचण्याच्या त्यांच्या आशा जवळजवळ संपुष्टात येतील.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)